

# भैरव

## विचार संक्रमण

मराठा विद्या प्रसारक समाजाचे

## कला व वाणिज्य महाविद्यालय

वडनेर भैरव, ता.चांदवड, जि.नाशिक

Scanned with CamScanner

**भैरव** २०१८-१९

### मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक

# आद्य संस्थापक व स्फूर्तिस्थान



कर्मवीर रावसाहेब थोरात



कर्मवीर काकासाहेब वाघ



कर्मवीर भाऊसाहेब हिरे



कर्मवीर अण्णासाहेब मुरकुटे



कर्मवीर गणपत दादा मोरे



कर्मवीर डी.आर.भोसले



कर्मवीर ॲड.बाबुराव ठाकरे



कर्मवीर ॲड.विठ्ठलराव हांडे



कर्मवीर डॉ.वसंतराव पवार

Scanned with CamScanner

॥ बहुजन हिताय बहुजन सुखाय ॥

मराठा विद्या प्रसारक समाज नाशिक

# कला व वाणिज्य महाविद्यालय वडनेर भैरव

ता. चांदवड, जि. नाशिक.

# 'भैरव'

## वार्षिक नियतकालिक

सन २०१६-१७

वर्ष - १ ले - अंक १ ला

*** अध्यक्ष संपादक मंडळ ***

मा. प्राचार्य ए. एल. भगत

*** प्रमुख संपादक ***

प्रा. रामेश्वर बी. उगले

*** संपादक मंडळ सदस्य ***

प्रा. एस. डी. फुगट, प्रा. एस. एस. कावळे, प्रा. एम. आर. शेबडे

प्रा. श्रीमती के. एल. शिंदे, प्रा. श्री. लोखंडे



Scanned with CamScanner

✲ प्रकाशन स्थळ : कला व वाणिज्य महाविद्यालय, वडनेर भैरव

✲ प्रकाशन कालावधी : वार्षिक

✲ प्रकाशक : प्राचार्य ए. एल. भगत

✲ राष्ट्रीयत्व : भारतीय

✲ पत्ता : कला व वाणिज्य महाविद्यालय, वडनेर भैरव,
ता. चांदवड, जि. नाशिक.

✲ प्रकाशक : प्राचार्य ए. एल. भगत

✲ अक्षर जुळवणी : श्री. विजय बोरखडे (श्री स्वामी समर्थ ऑफसेट)

✲ मुख पृष्ठ : श्री. भाऊसाहेब राजोळ (वक्रतंड आर्टस, नाशिक)

✲ मुद्रण : मराठा विद्या प्रसारक समाज प्रिंटींग प्रेस,
नाशिक - २.

✲ छायाचित्र : शिवप्रसाद फोटो स्टुडिओ, वडनेर भैरव

मी प्राचार्य ए. एल. भगत असे जाहीर करतो की,
वरील माहिती माझ्या माहितीप्रमाणे खरी आहे. - प्राचार्य ए. एल. भगत

फक्त खाजगी वितरणासाठी

'या नियतकालिकातील लेखांमध्ये व्यक्त झालेली मते व विचार संबंधित लेखकांचे आहेत. त्यांच्याशी प्राचार्य, संपादक मंडळ, संस्था किंवा महाविद्यालय सहमत असेलच असे नाही.' - प्रमुख संपादक



Scanned with CamScanner

# समाजगीत

जनकल्याणी देह झिजवुनी लाजविले चंदना
कर्मवीर हो ज्ञानवीर हो लाख लाख वंदना
तुम्हाला लाख लाख वंदना ।।धृ.।।

ऋषिराजाने राजर्षीने लावियली ज्योत
वसा ज्योतीचा घेऊनी साचा पेटविला पोत
दिशादिशांतून घराघरांतून आली नवजाग
दिसू लागला मनामनातला मुक्तींचा मार्ग
निद्रेतच होते दंग
अंतरातले स्फुलिंग
ते उठले उधळीत रंग
बहुजन हिताय, बहुजन सुखाय चेतविली चेतना
कर्मवीर हो, ज्ञानवीर हो लाख लाख वंदना ।।१।।

नांगर टाका, भाला फेका शिकवी शिवराया
त्याच मातीवर कसुनी कंबर करुया नव किमया
निरलस श्रमुनी काढू खणुनी रुतलेली शल्ये
निष्ठा शिंपून करु पेरणी हवी नवी मूल्ये
दृढनिश्चय ऐसा करुनी
कार्यात प्राण ओतुनी
आयुष्य दिले झोकुनी
ज्ञानप्रशाला उभारण्याला दिलीत हो प्रेरणा
कर्मवीर हो, ज्ञानवीर हो लाख लाख वंदना ।।२।।

मूक अडाणी फुलवू अग्रणी त्यातुनी ही जिद्द
मुळात अबला करु या सबला धन्य धन्य ब्रीद
दिव्य थोरवी कुठली ओवी गुंफावी गौरवा
नम्रपणाने एक मागणे हट्ट हाच पुरवा
निरपेक्ष अपुली कृती
ती सेवाभावी मती
ती निष्ठा तसली धृती
समाजदिन हा सार्थ कराया या हो या प्रेरणा
कर्मवीर हो ज्ञानवीर हो लाख लाख वंदना ।।३।।

- कै. प्रा. श्रीरंग गुणे



Scanned with CamScanner

# Our Vision and Mission

## - Vision

We envision a college of higher education ensuring conductive environment for teaching and learning, qualitites and skills of students making them into socially responsible, globally competent and excellent human resource.

## - Mission

1) To provide education to masses and first generation of learners.
2) Nuturing encouraging disciplines and the creation of new knowledge.
3) Expanding opportunities for all of our students to acquire understanding of the world as a place of different and diversity across time and culture through participation in study.
4) To develop socially responsible citizens with ethies and morals hence build the nation.
5) To under take activities for community orientation.
6) To empower women by providing right opportunities of higher education and make them self reliant.
8) To inculcate environmental awareness, save and conserve nature.



Scanned with CamScanner

मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक

## कार्यकारी मंडळाचे सन्माननीय पदाधिकारी



**खा.श्री.प्रतापराव नारायण सोनवणे**
अध्यक्ष



**ॲड. नितीन बाबुराव ठाकरे**
सभापती



**श्रीमती निलीमाताई वसंतराव पवार**
सरचिटणीस



**श्री. नानाजी नामदेव दळवी**
उपसभापती



**डॉ. सुनिल उत्तमराव ढिकले**
चिटणीस

Scanned with CamScanner

## मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक

## कार्यकारी मंडळाचे सदस्य


श्री.भाऊसाहेब खातळे
इगतपुरी


श्री.रविंद्र देवरे
कळवण व सुरगाणा


आ.शिरीषकुमार कोतवाल
चांदवड


श्री.श्रीराम शेटे
दिंडोरी


श्री.नामदेव महाले
नाशिक शहर


श्री.दिलीपराव मोरे
निफाड


श्री.दिलीप पाटील
नांदगांव


श्री.भरत कापडणीस
बागलाण


डॉ.तुषार शेवाळे
मालेगांव


श्री.अंबादास बनकर
येवला


श्री.कृष्णाजी भगत
सिन्नर


डॉ.विश्राम निकम
देवळा


श्री.मुरलीधर पाटील
नाशिक ग्रामीण

## सेवक सदस्य


श्री.भाऊसाहेब पाटील
प्राथ. व माध्य.विभाग


श्री.नंदू कोर
प्राथ. व माध्य.विभाग


डॉ.अशोक पिंगळे
महाविद्यालयीन विभाग

# भैरव २०१६-१७

कृतीशील युवा नेतृत्व.... !



प्राचार्य मा. श्री. अमोल लक्ष्मण भगत


Scanned with CamScanner



डॉ. बाबासाहेब जयकर
व्याख्यानमाले अंतर्गत अंधश्रद्धा निर्मुलन
जादूटोणा विरोधी कायदा
या विषयावर विद्यार्थ्यांना
एल.सी.डी. प्रोजेक्टरद्वारा मार्गदर्शन
करतांना मा. श्री. सुरेश घोडेराव

महाविद्यालयात सामाजिक शास्त्र
मंडळ उद्घाटन प्रसंगी
विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना
प्राचार्य डॉ. पी. व्ही. रसाळ
तसेच व्यासपीठावर उपस्थित
कार्यक्रमाचे अध्यक्ष
प्राचार्य भगतसर व प्रा. वडघुले




वाणिज्य मंडळ व राष्ट्रीय सेवा योजना
उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करतांना
प्रमुख अतिथी प्रा. पी. आर. सोहनी
व उपस्थित मान्यवर

Scanned with CamScanner

# भैरव २०१६-१७



महाविद्यालय इमारतीच्या भूमिपूजन
प्रसंगी मनोगत व्यक्त करतांना
म.वि.प्र. समाज संस्थेच्या
सरचिटणीस श्रीमती नीलिमाताई पवार
समवेत मान्यवर अतिथीगण



महाविद्यालयीन इमारत
जागेची पाहणी करतांना
सरचिटणीस श्रीमती नीलिमाताई पवार
समवेत - प्राचार्य ए. एल. भगत व
पदाधिकारी



महाविद्यालय इमारत बांधकामं प्रसंगी
बांधकामाचा आढावा घेतांना
श्रीमती नीलिमाताई पवार व
संचालक शिरीषकुमार कोतवाल तसेच
संस्थेचे सभासद

Scanned with CamScanner



महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व गुणांचा विकास व्हावा यासाठी यीन या कार्यक्रमांतर्गत मार्गदर्शन करतांना प्राचार्य भगत सर व उपस्थित मान्यवर




राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त जनजागृती करतांना महाविद्यालयाचे विद्यार्थी समवेत प्राध्यापक वृंद



डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक वृंद व विद्यार्थी.

Scanned with CamScanner

# मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक

## ※ कार्यकारी मंडळ ※

### कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | : | खा. प्रतापराव नारायणराव सोनवणे |
| सभापती | : | ॲड. नितीन बाबुराव ठाकरे |
| उपसभापती | : | श्री. नानाजी नामदेव दळवी |
| सरचिटणीस | : | श्रीमती नीलिमाताई वसंतराव पवार |
| चिटणीस | : | डॉ. सुनिल उत्तमराव ढिकले |

## ※ कार्यकारी मंडळाचे तालुका सदस्य ※

| | | |
|---|---|---|
| इगतपुरी | : | श्री. भाऊसाहेब लक्ष्मण खताळे |
| चांदवड | : | श्री. शिरीषकुमार वसंतराव कोतवाल |
| दिंडोरी | : | श्री. श्रीराम सहादू शेटे |
| नाशिक | : | श्री. नामदेव नभाजी महाले |
| कळवण | : | श्री. रविंद्र शंकर देवरे |
| निफाड | : | श्री. दिलीपराव तुकाराम मोरे |
| नांदगांव | : | श्री. दिलीप रघुनाथ पाटील |
| बागलाण | : | श्री. भरत माणिक कापडणीस |
| मालेगांव | : | डॉ. तुषार रामकृष्ण शेवाळे |
| येवला | : | श्री. अंबादास बालाजी बनकर |
| सिन्नर | : | श्री. कृष्णाजी गणपत भगत |
| नाशिक ग्रामीण | : | श्री. मुरलीधर देवराम पाटील |
| देवळा | : | डॉ. विश्राम मालजी निकम |

## ※ सेवक सदस्य ※

| | | |
|---|---|---|
| उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन विभाग | : | डॉ. अशोक पांडुरंग पिंगळे |
| प्राथमिक व माध्यमिक विभाग | : | श्री. भाऊसाहेब रघुनाथ पाटील |
| प्राथमिक व माध्यमिक विभाग | : | श्री. नंदू महादू कोर |



Scanned with CamScanner

मराठा विद्या प्रसारक समाज नाशिक

# कला व वाणिज्य महाविद्यालय, वडनेर भैरव

## ✼ स्थानिक व्यवस्थापन समिती ✼

| | | |
|---|---|---|
| १) श्री. दिलीपराव हरिभाऊ धारराव | : | अध्यक्ष |
| २) श्री. ॲड. पोपटराव दगुजी पवार | : | सदस्य |
| ३) श्री. डॉ. सुनिल मधुकर पाचोरकर | : | सदस्य |
| ४) श्री. शंकरराव बाजीराव भालेराव | : | सदस्य |
| ५) श्री. दौलतराव लुंकाजी पाचोरकर | : | सदस्य |
| ६) श्री. वसंतराव देवराम गवळी | : | सदस्य |
| ७) श्री. दत्तात्रय मधुकर माळी | : | सदस्य |
| ८) श्री. विजय ग्यानुजी निखाडे | : | सदस्य |
| ९) श्री. भाऊसाहेब देवराम भालेराव | : | सदस्य |
| १०) श्री. पोपटराव पंढरीनाथ पाचोरकर | : | सदस्य |
| ११) श्री. डॉ. नंदकिशोर भिमराव साब्दे | : | सदस्य |
| १२) प्राचार्य कला व वाणिज्य महाविद्यालय वडनेर भैरव | : | सचिव |
| १३) प्रा. निशांत डी. वडघुले | : | प्राध्यापक प्रतिनिधी |
| १४) श्री. संदीप भास्कर शिंदे | : | शिक्षकेत्तर प्रतिनिधी |



Scanned with CamScanner

# संपादकीय....

संपादक : प्रा. रामेश्वर बी. उगले

महाविद्यालयीन नियतकालिकाचा 'भैरव' हा वार्षिक अंक आपल्या हाती देतांना आज मला मनस्वी आनंद होत आहे.

बोलण्याचे हजरजबाबीपणा, वाचनाने बहुश्रुतता आणि लेखनातून वक्तशीरपणा व विचार स्पष्टता येते. ह्या गुणांची रुजवण महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये व्हावी, यासाठी या वार्षिक नियतकालिकाचे प्रयोजन महाविद्यालयीन भाषा मंडळ व विद्यार्थी कल्याण मंडळांतर्गत दरवर्षी करण्यात येते.

'भाषा' ही मानवी विचारांच्या अभिव्यक्तीचे साधन आहे. या साधनाद्वारे व्यक्ती आपल्या मनातील भावना व्यक्त करत असतो. ही मानवाच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंत चालणारी निरंतर प्रक्रिया आहे. या प्रक्रियेद्वारे भाषण, वाचन, लेखनातून व्यक्ती विविध अनुभवांच्या आधारे 'विचारांनी' घडत जातो. घडता घडता आपले अनुभव इतरांनाही सांगतो. यामध्ये लेखनातून व्यक्त केलेले अनुभव हे चिरकाल टिकणारे व जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचणारे असतात.

या हेतूने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना लेखनाद्वारे विचार प्रवृत्त करुन त्यांच्या दृष्टीकोनातून सामाजिक, सांस्कृतिक, राष्ट्रीय, शैक्षणिक, राजकीय व एकूणच जीवन विषयक क्षेत्रातील आपले स्वत:चे तसेच इतर विद्वानांनी मांडलेले विचार संकलित करुन स्वत: आत्मसात करणे व इतरांपर्यंत घेऊन जाणे हे महाविद्यालयीन शिक्षणाचे ध्येय आहे.

'भैरव' मध्ये विद्यार्थ्यांनी मांडलेले विचार हे स्वरचित तसेच संकलित स्वरुपाचे असून यामध्ये संकलित साहित्याचे प्रमाण जास्त आहे. असे असले तरी याद्वारे विद्यार्थ्यांमध्ये वाचन आणि शोधक वृत्तीचा विकास होण्यास मदत होईल.

महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. भगत सरांनी या वार्षिक अंकाच्या संपादनाची जबाबदारी माझ्यावरती टाकून जो विश्वास दाखविला त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. या अंकाच्या संपादनात संपादक मंडळ सदस्यांनी केलेल्या तसेच माझे सर्व सहकारी प्राध्यापक बंधू, शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या मदतीशिवाय हा अंक पूर्ण होणे शक्य नाही. म्हणून मी त्यांचेही मन:पूर्वक आभार मानतो. तसेच या अंकाच्या अक्षर जुळवणी व टंकलेखनाची जबाबदारी यशस्वीरित्या व अतिशय कमी कालावधीत पूर्ण करुन दिली ते आमचे स्नेही श्री. विजय बोरखडे (समर्थ प्रिंटींग प्रेस) तसेच श्री. भाऊसाहेब राजोळे (वक्रतुंड आर्टस्) व छपाईची जबाबदारी पूर्ण करणारे म.वि.प्र. प्रिंटींग प्रेस यांच्या मी कायम ऋणात राहू इच्छितो. या अंकासाठी ज्यांनी छायाचित्रे उपलब्ध करुन दिलेत त्या शिवप्रसाद फोटो स्टुडिओचे संचालक श्री. पुरकर साहेब व चि. सोनु यांचेही मन:पूर्वक आभार. तसेच या अंकाच्या संपादनास ज्या ज्ञात-अज्ञातांचे सहकार्य लाभले त्या सर्वांचे मी संपादक या नात्याने ऋण व्यक्त करतो... धन्यवाद.....!

**आपणा सर्वांना नववर्षाच्या हार्दीक शुभेच्छा...!**



Scanned with CamScanner

# प्राचार्यांचे मनोगत...

शिक्षण हा केवळ बौद्धिक व्यापार नसून समग्र मानवी जीवन उजळून टाकणारी एक दुर्मीळ प्रेरणा आहे. ही धारणा डोळ्यासमोर ठेवून १०० वर्षांपूर्वी ज्या कर्मवीरांनी मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेची स्थापना केली. 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' हे ध्येय समोर ठेवून तळागाळातील समाजाचा विकास करणे हा एकच ध्यास असणाऱ्या संस्थेचा 'मी' एक घटक म्हणून काम करताना मला सार्थ अभिमान वाटतो.

आमचे महाविद्यालय संस्थेचे हेच ब्रीद प्रत्यक्ष अंमलात आणून चांदवड तालुक्यातील वडनेर भैरव व आसपासच्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची गुणवत्तापूर्ण उच्च शिक्षणाची गरज भागवत आहे. यातूनच ग्रामीण व शहरी भागातील शिक्षणाची दरी कमी करुन उद्याचा एक चांगला व शाश्वत समाज घडविण्यासाठी आमचे महाविद्यालय सन २००९ पासून अविरतपणे कार्यरत आहे व हा प्रगतीचा आलेख येत्या काळात आणखी उंचावणे हा आमचा मानस आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक गुणांबरोबरच इतर कलागुणांचा विकास व्हावा. यासाठी महाविद्यालय विविध उपक्रमांचे आयोजन करुन विद्यार्थ्यांना संधी उपलब्ध करुन देते. महाविद्यालय नियतकालिकाचा 'भैरव' अंक आपल्या हाती देताना महाविद्यालयाचा प्राचार्य म्हणून मला मनस्वी आनंद होत आहे. कारण महाविद्यालय स्थापनेपासून प्रकाशित होणारा 'भैरव' हा पहिलाच अंक आहे.

या वार्षिक अंकात विद्यार्थ्यांनी आपले विचार, विविध लेख व काव्याच्या माध्यमातून मांडलेले आहेत. या नियतकालिकातून विद्यार्थ्यांच्या विचार प्रगल्भतेला चालना मिळणार आहे. दरवर्षी असाच दर्जेदार वार्षिक अंक आपल्यापर्यंत पोहचविण्याचा आम्ही प्रयत्न करु...

**धन्यवाद....!**

प्राचार्य
**मा. श्री. ए. एल. भगत**
कला व वाणिज्य महाविद्यालय,
वडनेर भैरव

# भैरव २०१६-१७





अुशास्त्र व वाणिज्य विभागाअंतर्गत
घेण्यात आलेल्या एकदिवसीय चर्चा सत्र
उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करतांना
डी.सी.यु.डी. संचालक
मा. श्री. डॉ. व्ही. बी. गायकवाड
तसेच व्यासपीठवर उपस्थित
इतर मान्यवर




अुशास्त्र व वाणिज्य विभागाच्या
चर्चासत्र शोधपर्व
या विशेषांकाचे प्रकाशन करतांना
सन्माननीय व्यासपीठ.

अुशास्त्र व वाणिज्य चर्चासत्रात विचार मंथन करतांना अर्थतज्ज्ञ डॉ. विनायक गोविलकर
समोर मंत्रमुग्ध झालेले विद्यार्थी.




Scanned with CamScanner

# भैरव २०१६-१७



विद्यार्थिनी व्यक्तीमत्व विकास
कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी
आपले विचार व्यक्त करतांना
संस्थेच्या सरचिटणीस
श्रीमती नीलिमाताई पवार
तसेच व्यासपीठावरील उपस्थित मान्यव

रेझिंग डे निमित्त
महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना
स्पर्धा परीक्षेसंदर्भात
मार्गदर्शन करतांना पोलीस उपअधिक्षक
मा. डॉ. राहुल खाडे,
उपस्थित मान्यवर व विद्यार्थी






महाराष्ट्र पोलीस दिना निमित्त
विद्यार्थ्यांना शस्त्रास्त्रांची ओळख
करुन देतांना मा. पोलीस अधिकारी
व उपस्थिती विद्यार्थी.



राष्ट्रीय सेवा योजना
श्रमदान संस्कार शिबीराच्या
उद्घाटन प्रसंगी बोलतांना
कार्यक्रमाचे अध्यक्ष
मा. श्री. शिरीषभाऊ कोतवाल तसेच
व्यासपीठावरील उपस्थित मान्यवर

राष्ट्रीय सेवा योजना
श्रमदान शिबीरात सहभागी झालेले
मान्यवर अतिथीगण





राष्ट्रीय सेवा योजना शिबीराच्या
समारोप प्रसंगी कार्यक्रमाचे
प्रास्ताविक करतांना प्राचार्य ए. एल. भगत
व कार्यक्रमाचे अध्यक्ष
मा. ॲड. पोपटराव पवार व
प्रमुख अतिथी ए.पी.आय. नितीन पाटील

राष्ट्रीय युवा दिनानिमित्त
स्वामी विवेकानंदाच्या प्रतिमेस
पुष्पहार अर्पण करतांना
प्रमुख वक्ते मा. श्री. रमेश गुरगुडे,
महाविद्यालयाचे प्राचार्य भगत सर,
प्रा. धेबडे व प्रा. वडघुले



Scanned with CamScanner

# भैरव २०१६-१७

## सांस्कृतिक युवा महोत्सव क्षणचित्रे ...









Scanned with CamScanner

# अनुक्रमणिका

## (गद्य विभाग)


| अ.क्र. | शिर्षक | | नांव |
|---|---|---|---|
| १) | स्वच्छ भारत अभियान – एक पाऊल स्वच्छतेकडे | : | निफाडे कामिनी उत्तम |
| २) | स्वच्छ भारत अभियान | : | धनाईत योगिता कैलास |
| ३) | स्वच्छ भारत अभियान | : | भालेराव पूजा भाऊसाहेब |
| ४) | स्वच्छ भारत अभियान | : | शिरसाठ गुलाब विश्वनाथ |
| ५) | स्वच्छ भारत अभियान | : | हिंगे भारती दत्तात्रेय |
| ६) | स्वच्छ भारत अभियान | : | भालेराव सागर बाळासाहेब |
| ७) | स्वच्छ व सुदृढ मन | : | प्रा. सारिका रा. दौंड |
| ८) | विमुद्रीकरण | : | पुरकर मोहिनी सुकदेव |
| ९) | स्त्री: भ्रूण हत्या | : | जाधव राजश्री सोमनाथ |
| १०) | माझ्या कल्पनेतील आदर्श, शिक्षण व्यवस्था | : | शेळके सोनाली संपत |
| ११) | स्त्री – पुरुष समानता फक्त कागदावरच | : | गांगुर्डे अश्विनी प्रविण |
| १२) | वयाच्या पाच वर्षापासून पन्नाशी पर्यंत | : | आहेर प्रियंका किशोर |
| १३) | सैनिकांचे माहेर घर | : | भालेराव सागर बाळासाहेब |
| १४) | माझ्या जीवनातील वेळेचा अनुभव | : | भालेराव सागर बाळासाहेब |
| १५) | भयंकर तो दिवस | : | भालेराव सागर बाळासाहेब |
| १६) | वाढती गुन्हेगारी व समाज | : | गचाले अर्चना बाळासाहेब |
| १७) | स्त्री जीवन | : | सलादे सोनाली शिवाजी |
| १८) | आई | : | पाटील ऋषिकेश कैलास |
| १९) | बाप | : | चौरे वृषाली रंगनाथ |
| २०) | आयुष्यातील गुरुचे महत्त्व | : | पवार पूजा राजेंद्र |
| २१) | एकाच नाण्याच्या दोन बाजू सुख-दु:ख | : | सरला सोनवणे |
| २२) | भूक | : | प्रा. सोमनाथ फुगट |
| २३) | आई | : | वैष्णवी आवारे |
| २४) | मराठी साहित्यातील ध्रुवतारा – तात्यासाहेब शिरवाडकर | : | निफाडे कामिनी उत्तम |
| २५) | भारत का वीर पूत्र – महाराणा प्रताप | : | परदेशी पूजा राजेंद्रसिंग |
| २६) | विद्यार्थी आणि राजकारण | : | शिरसाठ गुलाब विश्वनाथ |
| २७) | आयुष्य | : | परदेशी पूजा शिवपालसिंग |




Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| २८) आईवडीलांची सेवा हेच खरे जीवनाचे सार्थक | : | पवार गायत्री एकनाथ |
| २९) आई बापाची थोरवी | : | पाचोरकर प्रियंका रतन |
| ३०) कठोर परिश्रम | : | वाढवणे दिपाली सुरेश |
| ३१) आनंदी जीवन | : | चौरे कोमल रंगनाथ |
| ३२) आजचा स्वतंत्र भारत | : | भालेराव हर्षल सीताराम |
| ३३) रंग मैत्रीचे | : | वायकंडे पूजा नारायण |
| ३४) कर्तव्यदक्ष बाप | : | हिंगे भारती |
| ३५) स्वामी विवेकानंदांचे विचार | : | वाढवणे दिपाली सुरेश |

## (पद्य विभाग)

| | | |
|---|---|---|
| १) तू | : | सलादे निलिमा ज्ञानेश्वर |
| २) टिचर द रोल मॉडेल | : | निखाडे ज्योती रामदास |
| ३) काय असते डोळ्यांत | : | जाधव राजश्री सोमनाथ |
| ४) माय | : | आहेर काजल अरुण |
| ५) शोधा स्वत:ला | : | जाधव धनश्री भाऊसाहेब |
| ६) आई | : | आवारे वैष्णयी |
| ७) बापाचे दु:ख | : | आवारे वैष्णवी |
| ८) क्यु ना हम स्वच्छ भारत निर्माण करे | : | भोंगे रेणुका विष्णू |
| ९) श्रध्दांजली | | |
| १०) आत्महत्या कशासाठी | : | निखाडे ज्योती रामदास |
| ११) रक्षाबंधन | : | पाचोरकर पूजा कोंडाजी |
| १२) आज आणि उद्या | : | शेळके सोनाली संपत |
| १३) स्वच्छता अभियान | : | काळे योगेश निवृत्ती |
| १४) मनुष्य जगतो कशासाठी | : | पाचोरकर पूजा अनिल |
| १५) स्वच्छ भारत अभियान | : | कुटे मोनाली रामराव |
| १६) आई | : | पटेल सोनम याकुब |
| १७) बाबा | : | पटेल सोनम याकुब |
| १८) गुरू | : | चव्हाण अर्चना अनिल |
| १९) शब्दांचे महत्त्व | : | चव्हाण अर्चना अनिल |
| २०) जिवंतपणा | : | गांगुर्डे मोहिनी मोतीराम |
| २१) आई-बाबा | : | गांगुर्डे निकिता लक्ष्मण |
| २२) साम्य आईचे-गाईचे | : | भालेराव पूजा |
| २३) आनंदाने जगणं हक्क आहे माझा | : | भालेराव पूजा |



Scanned with CamScanner

२४) बाळाला शाळेत घाल : भालेराव पूजा
२५) बहिणीची माया : भालेराव पूजा
२६) वन ट्री लेस : जाधव योगिता संपत
२७) बहिण भावाचे नाते : कुंभार्डे गितांजली संजय
२८) जगण्याची आस : कुंभार्डे गितांजली संजय
२९) मैत्री : निकम निलम सुभाष
३०) आई-वडीलांना कधी विसरु नका : गुमनार कांचन माधवराव
३१) बलिदान : पूरकर मोहिनी सुकदेव
३२) कोणाची चूक .... शिक्षा कोणाला.... : धनाईत योगिता कैलास
३३) मुलांनी वागावे तरी कसे : निखाडे सोनाली कैलास
३४) परवड : बावीस्कर सपना मोहन
३५) गांधीजींना पत्र : बावीस्कर सपना मोहन
३६) मैत्रीचा अर्थ : गांगुर्डे निकिता लक्ष्मण
३७) अतिरेक्यांनो... : पवार सौरभ संजय
३८) शिक्षक : जव्हेरी कांचन छबुसिंग
३९) गैरमार्गाशी लढा : तिडके पूनम संजय
४०) मैत्री : आहेर पूनम राजेंद्र
४१) माय इंडिया : धनाईत योगिता कैलास
४२) मुलगी : खैरनार प्रियंका सुरेश
४३) दु:ख : जाधव जना संतोष
४४) जीवन : जाधव जना संताष
४५) बाप : जाधव जना संतोष
४६) जीवन एक संघर्ष.. : पूरकर पूजा शिवाजी
४७) नवीन वर्ष : पगार पूजा परशराम
४८) आपल्या मैत्रीचा वृक्ष : आहेर अनुराधा रमाकांत
४९) काळीज : जाधव आशा
५०) स्वप्नं : कुंभार्डे गितांजली संजय
५१) वेळ : पगार पूजा परशराम
५२) आयुष्य : आवारे वैष्णवी बाळासाहेब
५३) प्रश्नचिन्ह : चव्हाण अर्चना अनिल
५४) म्हणून देश चालतोय : वाढवणे दिपाली सुरेश
* अहवाल विभाग..........



Scanned with CamScanner

# स्वच्छ भारत अभियान - एक पाऊल स्वच्छतेकडे

**निफाडे कामिनी उत्तम**, तृतीय वर्ष (बी.ए.)

**स्वच्छ आणि सुंदर गांव । समृध्दीचे दुसरे नांव ॥**

भारताला लाभलेल्या संत परंपरेने भारताला स्वच्छतेविषयी सांगितलेले आहे. संत तुकाराम, संत गाडगेबाबा साऱ्या संतांनी आंतरिक मनाच्या स्वच्छते बरोबरच पर्यावरणाची भौतिक परिसर स्वच्छ करण्याची शिकवण दिली. संत गाडगेबाबा ज्या गावात कीर्तनातून लोकांना उपदेश करीत, त्या गावात स्वच्छता करीत व इतर लोकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून सांगत.

आज सरकारने 'स्वच्छ भारत अभियान' ही एक योजना (उपक्रम) सुरु केला आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधीजींनी अहिंसा, सत्य, सत्याग्रह याचबरोबर स्वच्छतेचा मूलमंत्र दिलेला आहे. गांधीजींचा विचार केला असता त्यांनी देशातील स्वातंत्र्यपेक्षा 'स्वातंत्र्याइतकेच स्वच्छतेला' महत्त्व दिले आहे. 'स्वच्छ भारत' हे एक स्वप्न बनून राहिले आहे. त्यामुळेच भारतामध्ये निरोगी आणि शांततापूर्ण जीवन हे स्वातंत्र्यापासून एक स्वप्नच राहिले आहे आणि स्वातंत्र्यानंतरही इतकी वर्षे ते स्वप्नच राहिलेले आहे.

२६ मे २०१४ साली सत्तेवर आलेल्या भाजप सरकारने माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी निवडणुकी आधीच काही विचार मांडले होते. सर्वांनी एक चळवळ म्हणून स्विकारली. पहिले स्वच्छता मिशन २०१४ साली सुरु करण्यात आले. भारतामध्ये स्वच्छतेविषयी जनजागृती केली जात आहे. या योजने अंतर्गत हा विचार संपूर्ण भारतच नव्हे तर संपूर्ण जगाला एकवटण्यासाठीचे प्रयत्न केले जाताना दिसत आहे. यासाठी नव-नवीन योजना सुरु करण्यात आल्या.

२ ऑक्टोबर २०१४ पासून सुरु झालेल्या या मिशनचे लक्ष २ ऑक्टोबर २०१९ म्हणजेच गांधीजींच्या १५० व्या पुण्यतिथीपर्यंत संपूर्ण देश हा स्वच्छ झाला पाहिजे, असे लक्ष्य समोर असल्याचे दिसते. सरकारी किंवा सामान्य व्यक्तीपासून मोठमोठ्या व्यक्ती या अभियानामध्ये सामील होताना दिसतात. भारत सरकारने सुरु केलेल्या 'स्वच्छ भारत अभियानांतर्गत' ४०४१ अंतर्गत वैधानिक शहरे, रस्ते, फूटपाथ साफ करण्यात आले. मानवी जीवन निरोगी आणि आनंददायी करण्यासाठी टाकलेले हे एक पाऊल आहे. स्वच्छता हे या अभियानाचे लक्ष्य होते. नागरी विकास, जलस्त्रोत, शुद्धीकरण यासारख्या योजना या अभियानांतर्गत भारत सरकारच्या मंत्रालयामार्फत ग्रामीण व शहरी भागात लागू करण्यात येत आहे. सांडपाणी व्यवस्थापन इत्यादी सारख्या योजना सुरु करण्यात आल्या.

या स्वच्छतेच्या योजनेअंर्तगत भारतीय जनतेचे शारीरिक, मानसिक, सामाजिक बौध्दिक कल्याण साधण्यासाठी पूर्णपणे योजनेवर लक्ष दिले जात आहे. खरोखरच प्रत्येक व्यक्तीने या योजनेला प्रोत्साहन देवून प्रतिसाद दिला पाहिजे. पुर्नवापर यासारखे उपक्रम महानगरपालिका कचरा निर्मुलन करण्यासाठी शास्त्रशुध्द व्यवस्थापन यांची अंमलबजावणी करणे. भारतीयांच्या आरोग्य आणि विचार तसेच वर्तन यामध्ये बदल होणे



Scanned with CamScanner

गरजेचे आहे. ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांच्या आरोग्यामध्ये वाढ होण्यासाठी आणि सामान्य लोकांच्या आरोग्यात सुधारणा होण्यासाठी हा प्रयत्न केला जात आहे. स्थानिक पातळीवर स्वच्छतेसाठी एक नियोजन आराखडा तयार केला जातो. देशात स्वच्छतेच्या सुविधात वाढ होत आहे. खाजगी क्षेत्रातील सुविधांद्वारे शहर विकसित केले जात आहे. भारत स्वच्छ व पर्यावरण समृध्दी करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. ग्रामीण भागातील व्यक्तीच्या जीवनाची गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. महात्मा गांधींच्या स्वप्नांना उजाळा देण्यासाठी व ते प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रयत्न केले जात आहे. आरोग्य शिक्षण कार्यक्रम आणि पंचायत राज संस्था, समुदाय स्वच्छता इत्यादींची सतत जाणीव जागृत केली जात आहे.

भारतातील प्रत्येक शहरांमध्ये स्वच्छ भारत अभियानांतर्गत घनकचरा व्यवस्थापन करण्यासाठी प्रयत्न केले जात आहे. २.६ दशलक्ष शौचालय, बस स्टॉप, रेल्वे स्टेशन, बाजार इत्यादी ठिकाणी स्वच्छतागृह बांधले. तसेच ग्रामीण भागामध्ये स्वच्छ भारत अभियानांतर्गत घनकचरा व्यवस्थापन करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. ज्या ग्रामीण भारतात स्वच्छता सुधारणा मोहीम हाती घेतली आहे. या आधीही 'संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता' अभियान (१९९९) निर्मल ग्राम भारत सरकारच्या अभियानांतर्गत भारत सरकारने ग्रामीण भागातील लोकांचे आरोग्य सुधारण्यासाठी प्रयत्न करत आहेत. सरकारने ११ कोटी ११ लाख नियोजित मलविसर्जनच्या सोयी केल्या आहेत. सरकारी कचऱ्यांचे आणि सेंद्रिय पदार्थांमुळे वापरण्यायोग्य ऊर्जा रुपांतरीत केली जावू लागली आहे. ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, पंचायत समिती यांचा सहभाग महत्त्वाची भूमिका पार पाडत आहे. ग्रामीण भागातील लोकांच्या जीवनमानामध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले जावू लागले आहे. ग्रामीण भागामध्ये शाश्वत स्वच्छता आणि पर्यावरणीय सुरक्षिततेसाठी प्रोत्साहन दिले जात आहे.

ग्रामीण भागामध्ये फक्त सहकारी संस्था व पंचायतराज व्यवस्था या पर्यंत हा उपक्रम मर्यादित न राहता ग्रामीण भागातील शाळा, महाविद्यालयीन स्तरावर शिक्षण क्षेत्रात केंद्रीयस्तरावर कार्य करणाऱ्या केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाद्वारा शालेय व महाविद्यायीन स्तरांवर स्वच्छते विषयी मोहीम राबविली जात आहे. या 'स्वच्छ भारत' अभियानांतर्गत विविध स्वच्छता उपक्रमांचे विद्यार्थ्यांनी आयोजन केले होते. यामध्ये अनेक केंद्रीय शाळा आणि नवोदय संघटना स्वच्छताविषयी विविध चर्चा यामध्ये महात्मा गांधी स्वच्छता आणि आरोग्य विज्ञान संबंधित शिक्षण चर्चा तसेच वर्ग, ग्रंथालय, प्रयोगशाळा, स्वयंपाकघर, दुकान इत्यादी ठिकाणी स्वच्छता केली गेली. द्विसप्ताहामध्ये सर्व शिक्षक व विद्यार्थी यांनी यात सक्रीय सहभाग नोंदवला आहे.

२०१४ साली आयोजित 'स्वच्छ भारत अभियान' ही योजना वरदान ठरली आहे. येत्या काही वर्षांमध्ये स्वच्छ भारत अभियान यशस्वी होईलच. स्वत:चा आत्मविश्वास प्रभावी करुन फक्त सरकारची जबाबदारी म्हणून या योजनेकडे न पाहता देशातील प्रत्येक व्यक्तींनी दुसऱ्या व्यक्तींना स्वच्छतेचे महत्त्व सांगितले पाहिजे. स्वच्छतेची ही सुरुवात स्वत:पासून



Scanned with CamScanner

केली पाहिजे. निरोगी समाज, नागरिकांना दीर्घ आयुष्यप्रधान करतो. त्यासाठी स्वच्छतेला महत्त्व दिले पाहिजे.

'स्वच्छ भारत अभियान' यामध्ये पर्यावरणाच्या स्वच्छतेबरोबरच देशात असणाऱ्या भ्रष्टाचारासारख्या अस्वच्छतेला स्वच्छ करण्यासाठी मोठी पावले उचलली जात आहे. भ्रष्टाचार आज भारतापुढील एक गंभीर समस्या आहे. एकूणच अनेक कारणांमुळे भारत अस्वच्छ झालेला आढळतो. भ्रष्टाचार ही तर मोठी समस्या देशापुढे आहे. आज भ्रष्टाचाराचा रोग दिवसेंदिवस वाढत आहे. 'भ्रष्ट असा अचार' म्हणजे भ्रष्टाचार देशाला पोखरत चाललेला आहे. सध्या भ्रष्टाचार समाजात सर्वत्र दिसत आहे. पैसे, शक्ती आणि पैशाचे अमिष यामुळे भ्रष्टाचाराला गती मिळत आहे.

भ्रष्टाचार तर आज शिष्टाचार, आजच्या कलयुगात समजला जातो.'प्रमाणिक जीवन मुल्यांची पायमल्ली करणे म्हणजे भ्रष्टाचार होय' लाच घेणे, असत्य वर्तन, तस्करी करणे, स्वार्थ साधण्यासाठी अमानवी आचरण करणे, अफरातफरी करणे, संपत्ती मिळवण्यासाठी अनैतिक मार्गाचा अवलंब करणे. ही भ्रष्टाचारांची रुपे आहेत. आणि या भ्रष्टाचारी रावणाचे दहन करणे आज अत्यंत गरजेचे आहे.

औद्योगिक क्रांती झाली. देशात यंत्राचे वारे वाहू लागले. मानवी जीवनाच्या सर्वच क्षेत्रात लक्षणीय परिवर्तन घडून आले. अनेक सोयी, सुविधा उपलब्ध झाल्या. माणसाला चैनीचे जीवन, उपभोगाची दुनिया विकत घेता येवू लागली आहे. कमी कष्टात जास्त पैसा हातात येवू लागला. साहजिकच पैशाची हाव वाढतांना दिसू लागली आहे. आणि पैशासाठी सर्व नीतिमुल्ये पायदळी तुडवली जाऊ लागली. भ्रष्टाचारी सरकारी लोकांना मुठभर श्रीमंत लोकांमुळे बळकटी मिळू लागली आणि हे भ्रष्टाचारी लोक समाजात प्रतिष्ठित म्हणूनही फिरु लागले आहे. बहिणाबाई चौधरी यांनी अशा लोकांसाठी कवितेत सांगितले आहे.

'माणसा माणसा कधी होशील रे माणूस
लोभासाठी झाला माणसाचा रे काणूस'

या कवितेत लोभासाठी, पैशासाठी व्यक्ती भ्रष्ट होत चालला आहे. भारतीय समाज हा भ्रष्टाचाराने पोखरला जात आहे. सध्या तरी भारताचे राजकीय भवितव्य अंधारात आहे. प्रामाणिक व विश्वसनीय नेत्यांची निवड व्यक्तींनी केली, तर भ्रष्टाचाराला आळा बसू शकतो. भ्रष्टाचाराचे उच्चाटन झाले पाहिजे. पुन्हा भारताला वैभवाचे दिवस दिसायला वेळ लागणार नाही आणि त्यासाठी ठोस अशी पावले उचलली गेली पाहिजे. भ्रष्टाचार ही व्यक्तीविकासातील एक अडथळा म्हणून उभा राहिला आहे. तो देशाला अपंग बनवत आहे. तो मानवी जीवनातील सामजिक, आर्थिक, राजनैतिक, भौतिक जीवनांशी खेळत आहे. जगात भ्रष्टाचाराच्या बाबतीत भारताचा ८५ वा क्रमांक लागतो.

भ्रष्टाचाराचा जन्म हा स्वार्थानि झालेला आढळतो. आज सरकार जरी गरिबांसाठी वेगवेगळ्या योजना कायद्याची अंमलबजावणी करत असले, तरी त्या सुविधा आज देशातील गरिबांपर्यंत पोहचत नाही. आज समाजात भ्रष्टाचारांची अनेक कारणे आढळतात. राजकारणी धोरणासाठीचे धोरण आज जनतेला नावापुरतेच माहीत आहे. प्रशासकीय व्यवस्थेची एक भ्रष्टाचारांची साखळीच तयार झाली आहे.

आज प्रत्येक व्यक्ती आपल्या जबाबदाऱ्या पैसा



Scanned with CamScanner

व फायद्यासाठी विसरला आहे. मूल्याधिष्ठीत जीवनापेक्षा लोक लोभ व स्वार्थाने जगण्यासाठी प्रयत्न करतांना दिसत आहे. आज शैक्षणिक क्षेत्रातही मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होताना दिसत आहे. मानवाचे आज तर पैसाच हेच दैवत बनलेले आहे. आणि नीतिमूल्ये पायदळी तुडवली जात आहे. चांगल्या-वाईट मार्गाने पैसा गोळा केला जाऊ लागला आहे. हे समाजातील काही वर्गाचे ध्येय ठरलेले आहे. भ्रष्टाचार हा भस्मासूर भासत आहे. या राक्षसाच्या तावडीतून एकही क्षेत्र सुटलेले दिसत नाही. याने गरीब ते गरिबांपासून, राजकारणी, पुढारी, कलाकार, अशिक्षितांपासून उच्चशिक्षितांपर्यंत या सर्वांना पैशाने भुरळ घातली आहे.

आज भ्रष्टाचारांची एक चढाओढ सुरु झालेली आहे. आणि त्यासाठी अशा व्यक्ती राष्ट्रहित व स्वतःचे कर्तव्य विसरतांना दिसतात. राष्ट्रहिताची होळी करुन सण साजरे करतात. समाजहितापेक्षा व्यक्तीगत हिताला जास्तीत जास्त महत्त्व देताना व्यक्ती दिसत आहे. आज देशाची परिस्थिती बिघडतांना दिसत आहे भ्रष्टाचार वाढताना दिसत आहे.

८ नोव्हेंबर या दिवशी नोटबंदी सुरु करण्यात आली आणि भारत भ्रष्टाचारामुळे अस्वच्छ झालेला आहे म्हणून हे एक पाऊलच समजू शकतो. भ्रष्टाचाराविरुध्द अण्णा हजारे यासारख्या व्यक्तींनी केलेल्या कार्याला उजाळा मिळाला आहे. आणि अभियानाअंतर्गत स्वच्छ भारत करण्यासाठी प्रयत्न केलेला आहे. अस्वच्छता, भ्रष्टाचार यासारख्या देशातील बरबटलेल्या विषयाला कमी करण्यासाठी प्रयत्न केले जात आहे. ही आनंदाची गोष्ट आहे.

दीपस्तंभासारखे मार्गदर्शक गांधीविचार प्रेरक आहे. त्यापासून प्रेरणा घेवून नवतरुणांनी. स्वच्छ भारताचे स्वप्न व भ्रष्टाचार मुक्त भारत होण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे. आपले प्रभावी कर्तव्य निष्ठेने केले, तर संपूर्ण भारत हा स्वच्छ झालेला असेल. 'स्वच्छ भारत अभियान' अंतर्गत खरोखरच महान विचार असणाऱ्या महान अशा आत्म्याला खरी श्रध्दांजली ठरेल. स्वच्छता ही एक दिवसासाठी नाही, एका व्यक्तीसाठी नाही, तर ती शासनाची एकट्याची जबाबदारी नाही, तर ती प्रत्येक व्यक्तीची जबाबदारी आहे. २०१९ पर्यंत संपूर्ण भारत हा स्वच्छ झाला पाहिजे. त्यासाठी प्रयत्न करणे गरजेच आहे.

। स्वच्छ भारत, सुंदर भारत ।

----***----

## तू....

कोकीळेसारखा आवाज तुझा ।
फुलासारखा चेहरा तुझा ॥
इंद्रधनुष्यासारखे रुप तुझे ।
वाहणाऱ्या धबधब्यासारखे बोलणे तुझे ॥
फुलपाखरासारखा रंग तुझा ।
सूर्यासारखा प्रकाश तुझा ॥
चांदण्यासारखे हसणे तुझे ।
चंद्रासारखे लाजणे तुझे ॥
सागरासारखा स्वभाव तुझा ।
कळ्यांसारखा नाजूकपणा तुझा ॥
निसर्गासारखे प्रेम तुझे ।
पृथ्वीसारखे हृदय तुझे ॥

– सलादे निलिमा ज्ञानेश्वर, तृतीय वर्ष (बी.ए.)



Scanned with CamScanner

# स्वच्छ भारत अभियान....

धनाईत योगिता कैलास, एफ.वाय.(बी.कॉम)

आजच्या युगात स्वच्छतेचा विनाशच करायचे लोकांनी ठरवलेले आहे. कारण स्वच्छता ही कोठेही दिसतंच नाही. ती अगदी अदृश्य स्वरुपाचीच लोकांनी करुन टाकली आहे. सध्याच्या पिढीला तर अगदीच स्वच्छतेचा कंटाळा आलेला दिसतो. जिकडे-तिकडे चॉकलेटस्ची घाणंच घाण दिसून येते. स्वच्छतेचा अगदी भंगच झालेला आहे. सगळीकडे अस्वच्छता जाणवू लागली आहे आणि या अस्वच्छतेचे परिणाम हे माणसाला भोगावे लागतात. मानवालाच ही अस्वच्छता घातक ठरणार आहे. कारण याला एकमेव जबाबदार दुसरा कोणताही प्राणी नसून फक्त मनुष्य प्राणीच आहे. लोक घरातील कचरा बाहेर रस्त्यावर, नदीकाठी किंवा नदीच्या पात्रात टाकतात. या कचऱ्याची योग्य ती विल्हेवाट न लावता तो असाच फेकून देतात. फळांच्या साली, कागदाचे तुकडे, प्लास्टिकच्या पिशव्या, कितीतरी प्रकारचा हा कचरा असतो. हा कचरा असाच रस्त्यावर फेकला तर माणसालाच याची हानी पोहोचणार आहे व वेगवेगळे आजार होणार. हे चित्र तर आता दिसतेच आहे. मग यावर काहीतरी पर्याय निवडावा लागणार आहे.

'भारत' हा एकमेव देश असा आहे की, या देशात लोकसंख्येचे प्रमाण अधिक आहे. लोकसंख्या जास्त व सोईसुविधा कमी ही आपल्या देशाची कमतरता आहे; परंतु ज्या सुविधा आहे त्याची जपणूक करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. यानुसार एक स्वच्छतेचा कानमंत्र आपल्याला घेणे काही महाग नाही. भारत जर स्वच्छ करायचा असेल तर सर्वांनी थोडी मेहनत तर घेतलीच पाहिजे. कारण कष्ट घेतल्याशिवाय फळ मिळत नाही. सर्वांनी एकत्र येवून एक अभियान राबवून अस्वच्छता दूर करण्याचा प्रयत्न करायचा आहे. या अभियानातंर्गत अनेक परिश्रम करावे लागणार आहे. हे काही विशेष नाही, पण आवश्यक त्या कामाचा विचार आपण करणार आहोत.

'स्वच्छ भारत अभियान' ही मोहीम अतिशय सोप्या पद्धतीची आहे. फक्त आपल्याकडून परिसर घाण होऊ द्यायचा नाही व इतरांनाही घाण करु द्यायची नाही. एवढीच खबरदारी आपल्याला घेणे आवश्यक आहे. जर कोणीही रस्त्यावर घाण टाकत असेल तर त्याला स्वच्छतेचे महत्त्व पटवून देणे व अस्वच्छता दूर करणे एवढेच कर्तव्य आपल्याला पार पाडायचे आहे.

मनुष्य हा समाजप्रिय प्राणी असल्याने तो समाजाचे काहीतरी देणे लागतो. हे आपण विसरायचे नाही व अस्वच्छतेवर मात करुन जास्तीत जास्त स्वच्छता कशी वाढेल याचाच विचार आपण करायचा आहे. 'स्वच्छ भारत अभियान' या योजनेअंतर्गत माणसाने आपले माणूसपण जगाला दाखवून देवून या मोहिमेचा प्रसार करावा असे मला वाटते. स्वच्छतेचा ध्यास जर माणसाने बाळगला, तर खरोखरच आपला भारत देश हा स्वच्छ झाल्याशिवाय राहणार नाही.

पुढील पानावर....



Scanned with CamScanner

# स्वच्छ भारत अभियान

भालेराव पूजा भाऊसाहेब, प्रथम वर्ष (बी.कॉम)

**' स्वच्छता जिथे वसे, लक्ष्मी तिथे.'** अशा सुवाच्य वाक्याप्रमाणे पूर्वीपासून पुर्वजांनी घरातील वडील माणसांनी हा चालवत आणलेला वसा आहे. मोठे माणसं लहान किंवा नवीन व्यक्तींना नेहमी स्वच्छतेचे महत्त्व पटवून देत असतात. यामागे काहीतरी हेतू असावा अशा रितीने हा वसा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित केलेला आहे. स्वच्छतेची गरज म्हणजे धार्मिक ठिकाणी जास्त प्रमाणात भासते. स्वच्छता करणे हे मानवहितासाठी कर्तव्य मानले जाते.

आज माणुसकीची गरज प्रत्येक ठिकाणी प्रत्येक क्षणाला जाणवते. आज धार्मिक क्षेत्राच्या ठिकाणी वृध्द किंवा इतर लोक जास्त प्रमाणात जातात. पुण्य करण्याच्या हेतूने काहीतरी पुण्य करावे. मोठ्या प्रमाणात केले जाणारे अन्नदान, उत्तमरित्या दिल्या जाणाऱ्या सुख-सुविधा. एकासाठी दुसऱ्याने केलेल्या मदती, अनेक प्रकारे काहीतरी दान करुन सर्वजण आपल्या पदरात पुण्याचा साठा वाढवत असतात, पण कोणत्या व्यक्तीला आपण मदत करत आहोत, खरंच त्या व्यक्तीला मदतीची गरज आहे का ? याचा विचार केला जात नाही. त्यामुळे उरलेले अन्न तसेच पाण्यात सोडला जाणारा वस्त्राचा साठा, चालिरिती परंपरानुसार होणारा कचरा. कारण प्लॅस्टिक पत्रवाळ्या, वाट्या, दिवे, वाट्या अशा प्रकारच्या वस्तुंमुळे स्वच्छता भंग पावते आणि त्यामुळे अशा धार्मिक ठिकाणी स्वच्छतेची गरज खऱ्या अर्थाने भासते आणि चिंतेची बाब अशी की, अशा ठिकाणी जागोजागी कचरा टाकण्याची व्यवस्था केलेली असूनही बाथरुम, शौचालये बांधलेले असूनही त्याचा वापर न करणे म्हणजे गुन्हेगारीस प्राप्त ठरणे. तेथील दुर्गंधी थांबवण्यासाठी स्वच्छता अभियानाची गरज आहे.

स्वच्छता ही घराबाहेर, गावातील स्वच्छता, देशातील स्वच्छता त्यासाठी काही उपाय सुचवले पाहिजे. हे खरचं चांगले कर्तव्य आहे. उगीच नाही का मोदीजींनी स्वत: हातात झाडू घेऊन देश स्वंच्छ करायला सांगितला. हे उपक्रम अनेक संस्था, शाळा, महाविद्यालय, गाव स्वच्छता अशा प्रकारचे उपक्रम राबविले जाऊन, भारत स्वच्छ केल्यानंतर स्वच्छ भारत अभियानांतर्गत संडास, बाथरुम निर्मिती केली जाते. गरीब लोकांसाठी सरकारतर्फे मदत करुन रेडिमेड बाथरुम निर्मिती करुन दिली जाते. त्यामुळे होणारे

मागील पानावरुन....

स्वच्छता ही माणसाच्या ध्यानी-मनी जर रुजली तर खरोखरच अस्वच्छतेचा नाश होऊन सगळीकडे स्वच्छता दिसून येईल आणि एक स्वच्छ भारत देशाचा विकास होण्यात भर पडेल. स्वच्छतेचे प्रसारक संत गाडगेबाबांनी जसा स्वच्छतेचा ध्यास घेतला होता. त्याप्रमाणे आपणही गाडगेमहाराजांचे शिष्य आहोत असे समजून थोडे फार योगदान या मोहिमेसाठी दिले तर योग्य ठरेल. आपला देश 'स्वच्छ भारत अभियान' या मोहिमेचा खरा शिल्पकार ठरेल.



Scanned with CamScanner

विनाशकारी आजार थांबवलेले जातात. कारण घरात येणारे डास, माशा येणे थांबल्याने आजारावर नियंत्रण राहते.

'स्वच्छ भारत अभियान' यासाठी नुसते घाण काढणे नव्हे तर भारतातही अशा गोष्टी आहेत की, त्यांना स्वच्छ करण्याची गरज आहे. त्यामुळे कुणावरही अन्याय होणार नाही. एकोप्याने राहण्याचे साधन बनू शकते आणि म्हणून भारताचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदींनी काळा पैसा वर स्ट्राईक केले. कारण पैशाचा गैरवापर थांबण्याचा एक प्रकारचा मार्ग आहे. पैसाच सर्व काही आहे. पैशामुळेच सर्व होते. गरीब व श्रीमंतात भेदभाव केला जातो. पैसाच असामान्यत: असंतोष निर्माण करण्याचा मार्ग आहे. भारताचे आर्थिक़ चलन निर्मिती काही सरकारमान्य ठिकाणी केली जाते. आणि काही ठिकाणी नकली नाणी, नोटा भारतात आणल्या जातात. कारण 'सर्व पैसा चलन नसतो, परंतु सर्व चलन हा पैसा असतो.' या व्याक्याप्रमाणे व्यवहार व्हावेत. या हेतूने आता कॅशलेस व्यवहाराची नवीन प्रणाली करण्यात आली आहे. त्यानंतर प्रत्येकाचे खाते चेकींग करण्यात आले आहे. पैसे (काळापैसा) हा भारताला लागलेला खतरनाक किडा आहे. कारण यात गरीब व श्रीमंत हा दुजाभाव, दरी निर्माण केली जाते. घाण - कचरा हा माणसाला घातक आहे. तसेच पैशाचा किडा माणसाला पोखरुन टाकतो. काळापैसा काढण्यासाठी मानव-मानवाला फसवून कमी दर्जाच्या वस्तू देण्यात येतात. जसे कमी दर्जाचे तेल, कापड, साखर. भारतात येणाऱ्या वस्तूंवर जास्त प्रमाणात किंमत दिली जाते.

सोन्या-चांदीचे अलंकार. स्त्रीचे अभूषण त्यावरही मर्यादा आणल्या जातात. अतिशय महत्त्वाचे निर्णय घेतले जाऊन देशाला मोठ्या आजारापासून वाचवण्याचा प्रयत्न केला जातो. सोन्याची खरेदी करण्यात जगात भारताचा २ नंबर लागतो. म्हणजे सर्वात जास्त प्रमाणात पैसा सोन्याच्या आयातीवर खर्च केला जातो.

मनाची स्वच्छता अतिशय महत्त्वाची आहे. मनाची अस्वच्छता म्हणजे कुठलीही वाईट प्रवृत्ती होय. कारण स्वच्छता अभियानाची गरज मानवास कुठलाही आजार जडू नये किंवा कोणतीही समस्या येऊ नये म्हणून राबविली जाते. कित्येक परिवार उध्वस्त होतात. कॅन्सर, क्षय, टिबी, मधुमेह, स्वाईन फ्ल्यू यासारख्या आजारांमुळे पाण्यासारखा पैसा दवाखान्यात ओतला जातो. त्याऐवजी तो कुठल्या अभियानासाठी वापरणे योग्य नाही का ? असे आजार नष्ट करण्यासाठी आपण कोणत्याही प्रकारचे व्यसन न केलेले बरे. त्यामुळे पैसाही वाचेल व आपले आरोग्यही चांगले राहील. गुटखा, सिगारेट अशा प्रकारच्या अनेक आम्लजन्य पदार्थावर लिहिले जाते की, यापासून कॅन्सरचा धोका आहे. तरीही त्याचे सेवन केले जाते. याचा अर्थ असा की, आपला आपल्या मनावर ताबा नाही. मनावर कोणत्याही प्रकारचे नियंत्रण नाही. स्वच्छ मनाने निर्धार केला की, या पदार्थांना हात लावायचा नाही. तर कशाला शासनाला गुटख्यावर जप्ती आणावी लागेल. बिचाऱ्या दुकानदारांची दुकाने फोडून ते अमली पदार्थ जमा करावी लागणार नाही. तुम्ही घेतलीच नाही तर दुकानदार आणतील कशाला. यावर कारवाई करत पूर्वीपासून चालत आलेल्या रिवाजांना मोडून कशाला गुटख्याची होळी करावी लागेल. आलेला परंपरेनुसार गोवरी, लाकडीची होळी का होऊ शकत नाही. स्त्रीयांना



Scanned with CamScanner

का अन्यायाविरुध्द लढा द्यावा लागतो. दारुबंदीसाठी रॅली, दारुबंदीच्या सभा, शासनाला दिले जाणारे अहवाल, तुमचे होणारे नुकसान जर समजत नसेल तर त्याला शासन तरी काय करणार ? किती अभियान काढणार. यासाठी तुम्हाला तुमच्या मनावर नियंत्रण ठेवण्याची आवश्यकता आहे.

'पर्यावरण वाचवू या, जीवन घडवू या' पर्यावरण तर जीवन पर्यावरणा शिवाय काहीच नाही. पाऊस नाहीतर शेती नाही, शेती नाहीतर मानव नाही, मानव नाहीतर प्राण्यापक्षांना आधार नाही. म्हणजे ही सर्व साखळी आहे. जी एकमेकांवर अवलंबून असते. हवामान, मानव, पशुपक्षी, पिके पाणी यातील एक घटक सुध्दा कमी पडला तर पर्यावरणाचा समतोल बिघडतो. पाऊस नाही तर मराठवाड्याला दुष्काळग्रस्त संबोधले जाते म्हणून शासनाने २०१५ सालापासून जलयुक्त शिवार योजना काढण्यात आली, दिग्गज अभिनत्यांनी 'नाम फाऊंडेशन योजना' काढली पर्यावरणावर कोणते घटक प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरित्या परिणाम करत असतात ? पर्यावरण म्हणजे जलचर, भूईचर, हवेत उडणारे पक्षी, हवा या सर्वांचा समतोल पर्यावरण. आज प्राण्यांची संख्या कमी दिसतेय. काही प्राण्याचे अस्तित्वंच मिटलय अगदी लहान मुलांना चित्रात, फोटोत दाखवण्याची वेळ येते. यापेक्षा वाईट गोष्ट ती कोणती ? आणि याचा विचार केलाय का, हे कधी कशामुळे होत असेल, या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न कधी केला आहे का ? शोधला असता, तर उत्तर नक्कीच मिळेल. याचा संबंध पर्यावरणाशी येतो. पहिल्या मानवास शेपूट होती, आणि त्याला पर्यावरणातील हवामानाचा परिणाम होत होत त्याने स्वत:ला जुळवून घेऊन स्वत:मध्ये बदल केला, परंतु डायनॉसरसारख्या प्राण्याला तो परिणाम सहन न झाल्याने त्याने त्याचे अस्तित्व मिटवले गेले.

आज अनेक प्रकारच्या कंपन्या, कारखाने, घरगुती कार्यालये आहेत, की ज्यातून पर्यावरणाचे अस्तिव आज धोक्यात येते. कारण त्यातून काही आम्ल पदार्थ, विषारी घटक निघतात ते नदीत सोडले जातात. कदाचित या प्रकारचे पाणी माणूस पितो. त्यामुळे मानवाचे अस्तित्व धोक्यात येते. त्यानंतर तेच पाणी शेती, बागेला मिळते आणि त्याचा परिणाम पर्यावरणांशी येतो. त्या शेतीचे अन्न मानव ग्रहण करतो. त्यानंतर ते पाणी नदी, नाल्यांना मिळाल्याने जलचर प्राण्याचे अस्तित्व धोक्यात येते. कारण ते पाणी सेवन केल्याने प्राण्यांना आजार होतात व ते मरतात. तशाच प्रकारचे प्राणी मांसाहारी लोक सेवन करतात. त्यामुळे माणसांनाही आजार होतात. जास्त करुन तेलाचे कारखाने, साखर कारखाने यासारखे अनेक कारखाने जल प्रदूषण करतात.

शासनाने पर्यावरण रक्षणासाठी अनेक सुविधा, स्कीम काढल्या आहेत. या मागे काही हेतू असावेत. २०१५ पासून शासनाने 'प्लॅस्टिक पिशव्या बंद' पिशव्यांच्या वापरावर बंदी आणली आहे. कारण अशा पिशव्यात काही तरी पदार्थ ठेवले असतात. ते प्राणी खातात त्या प्राण्यांच्या पोटात ते प्लास्टिक जाते आणि त्यामुळे ते प्राणी मरण पावतात. त्या पिशव्या स्वत:हून नष्ट होत नाहीत म्हणून त्यावर केमिकल मारतात. किंवा त्या जाळल्या जातात. त्यातून निघणाऱ्या धुराने प्रदूषणात वाढ होते.

पुढील पानावर...



Scanned with CamScanner

# स्वच्छ भारत अभियान

**शिरसाठ गुलाब विश्वनाथ**, तृतीय वर्ष (बी.कॉम.)

भारत हा जगातील सर्वात जास्त लोकसंख्या असलेला देश आहे. भारतात सन २०१४ मध्ये पंतप्रधानांच्या महत्त्वाकांक्षेतून 'स्वच्छ भारत अभियान' हा उपक्रम भारत सरकार मानव संसाधन विकास मंत्रालयाकडून सुरु करण्यात आला.

देशातील नागरीकांना, विद्यार्थ्यांना, महिलांना, मुलींना, आरोग्यसंपन्न, निरामय, आनंदी जीवनाचा लाभ व्हावा या दृष्टीकोनातून भारतामध्ये स्वच्छ भारत अभियानाची सुरुवात करण्यात आली. भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाही असलेला देश. भारताची लोकसंख्या ही आजमितीस सव्वाशे कोटीच्या आसपास आहे. इतक्या महाकाय देशात आरोग्य व स्वच्छतेच्या बाबतीत मोठ्या प्रमाणात लोकांमध्ये अनास्था दिसून येते.स्वच्छतेच्या बाबतीत भारतीय लोक हे अतिशय निष्काळजी आहे. याचा प्रत्यय आपणास ग्रामीण खेड्यापासून शहराच्या झोपडपट्टीपर्यंत येत असतो. याचे मुख्य कारण म्हणजे भारतीय लोकांमध्ये मुळातच शिक्षणाचा असलेला अभाव, शिक्षण कमी असल्याने स्वच्छतेबाबत जागरुकता कमी दिसते. त्यामुळेच भारतीय माणसाचे आरोग्य हे खालावलेले आहे. भारतीय माणसांची आर्युमर्यादा देखील या अस्वच्छतेमुळे घटली आहे. आज आपण बघतो भारतातील नागरिकांची मानसिकता अशी आहे की, आपण स्वतः स्वच्छ रहायचे, आपले घर स्वच्छ ठेवायचे. मात्र आपल्या घरातला कचरा मात्र गटारीत, रस्त्यावर, सार्वजनिक ठिकाणी फेकायचा. त्यामुळेच सार्वजनिक बस स्टॅण्ड, सार्वजनिक कार्यालये, नद्या मोठ्या प्रमाणावर अस्वच्छ झालेल्या दिसतात.या सर्वपरिस्थितीवर मात करण्यासाठी 'स्वच्छ भारत अभियानासारखी' अभियाने उपयुक्त आहेच,परंतु समाजात प्रबोधन करणे आवश्यक आहे. शासकीय पातळीवर उपाय योजना होतात, परंतु अंमलबजावणी योग्य पध्दतीने होत नाही. त्यामुळे स्वच्छतेची समस्या जैसे थे आहे.महाराष्ट्र सरकारने २००६ साली 'संत

---

मागील पानावरुन....

यासाठी 'स्वच्छ भारत अभियान' हे एक माध्यम आहे आणि यातून अनेक प्रकारच्या सेवा दिल्या जातात. आज दूरदर्शनवर अनेक जाहिराती दाखवल्या जातात. या जाहिरातीच्या माध्यमातून शासनाने काढलेल्या योजना, त्यामुळे होणारे परिणाम या हेतूने दाखवल्या जातात. हे अभियान एखाद्या कौटुंबिक कार्यक्रमासारखे आहे. जर कुटूंबावर काही समस्या आल्यात ? तर त्याचे निरसन सर्व परिवारातील सदस्य मिळून करतात. त्याप्रमाणे जर पर्यावरण समस्या भारतावर (परिवारावर) आल्या असतील तर त्यातील जनतेने लोकांनी (सदस्य) त्याचे निरसन कले पाहिजे. त्याचे परिणाम, फायदे जाणून घेतले पाहिजे.

'स्वच्छ भारत अभियान' यासारख्या योजनांना पाठिंबा दिला पाहिजे.

----***----



Scanned with CamScanner

गाडगेबाबा ग्रामस्वच्छता' अभियान सुरु केले होते. 'स्वच्छ भारत अभियाना'प्रमाणेच ते देखील एक सुंदर अभियान होते. त्या अभियानाने मोठ्या प्रमाणात राज्यातील ग्रामपंचायतींना पुरस्कार मिळाले. त्यातून अनेक गावांची उन्नती झाली. स्वच्छतेचा प्रयोग काही प्रमाणात यशस्वी झाला. अशाच प्रकारे स्वच्छ भारत अभियानांतर्गत गाव, शाळा, शासकीय विभाग यांना स्वच्छतेच्या यशस्वी प्रबोधनाबाबत पुरस्कार अथवा आर्थिक प्रेरणा दिल्यास हा उपक्रम सफल होईल. 'स्वच्छ भारत अभियान' यशस्वी करण्यासाठी शासकीय पातळीवर उपाय योजनेबरोबरच महाविद्यालयातून प्रबोधन, सामाजिक संघटनांकडून समाज प्रबोधन होणे आवश्यक आहे. आपल्या भारतीय शिक्षणात स्वच्छतेचे महत्त्व सांगणारा अभ्यासक्रम अतिशय कमी प्रमाणावर शिकवला जातो. त्याचा अंतर्भाव मोठ्या प्रमाणावर होणे आवश्यक आहे.

गंगा नदीच्या स्वच्छतेसाठी शासनाने सोळाशे कोटींची तरतूद केलेली आहे. ही बाब चांगली आहे, परंतु त्याचबरोबर गंगेच्या अस्वच्छतेला मानवच जबाबदार असल्याने अशा सार्वजनिक ठिकाणी कचरा, अस्वच्छता न टाकण्याची जबाबदारी प्रत्येक भारतीय नागरिकाने पार पाडली पाहिजे व सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता करणाऱ्या व्यक्तींवर कायदेशीर कारवाईची तरतूद शासन दरबारी पाहिजेत. तरच भारताच्या पुढील पिढीला आरोग्यसंपन्न जीवन मिळेल. महाराष्ट्राच्या जनतेच्या आरोग्याबाबत, स्वच्छतेच्या जागरुकतेबाबत विदारक सत्य सांगणारा एक प्रसंग नुकताच घडला. डॉ. पवन गुलाबराव पाटील हा विद्यार्थी आपले वैद्यकीय शिक्षण पूर्ण करुन फेलोशिपसाठी गडचिरोलीतील एका आदिवासी पाड्यावर गेला असता. त्याचे असे लक्षात आले की, त्या गावातल ३६ कुटूंबातील फक्त सहा कुटूंबच हात स्वच्छतेसाठी साबण वापरत होते. तेथील बऱ्याच कुटूंबांना साबणाचा वापराबाबत परिपूर्ण माहितीही नव्हती. ही देखील खरोखर एक खेदजनक गाष्ट आह. यासाठी नागरिकांमध्ये समाजप्रबोधन घडवून डॉ. पवन पाटलांनी अगदी ३५ रु. किमतीचा एक हात स्वच्छ करण्याचे उपकरण बनवले आणि अशी ८६ उपकरणे तेथील सोळा आदिवासी पाड्यांवर लावली. खऱ्या अर्थाने डॉ. पवन पाटील हे त्या सोळा आदिवासी खेड्यांसाठी स्वच्छतेचे अग्रदूत बनले.

महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून खऱ्या अर्थाने हे 'स्वच्छ भारत अभियान' सफल करण्यासाठी सुशिक्षित युवकांनी, तरुणांनी पुढे येण्याची गरज आहे. तरच बदल होणे शक्य आहे. तरुणांनी पुढाकार घेतल्यास प्रत्येक तरुण योग्य पध्दतीने स्वच्छतेचे महत्त्व प्रत्येक कुटूंबापर्यंत, व्यक्तीपर्यंत पोहचवू शकतो. हे फक्त एका यंत्रणेने करण्याचे काम नसून यात समाजाचा सहभाग असणे अतिशय आवश्यक आहे व त्याचबरोबर देशसवेचा, राष्ट्रभक्तीच्या भावनेतून हा बदल घडणे आवश्यक आहे. स्वच्छ भारत अभियान ही संकल्पना केवळ रस्त्यांची स्वच्छता, सार्वजनिक स्वच्छता एवढ्या गोष्टींपुरती मर्यादित नसून ती कौटुंबिक स्वच्छता विचारात घेणारी संकल्पना असल्याने भारतातील प्रत्येक घरामध्ये स्वच्छतागृहे असणे आवश्यक आहे. भारतातील ५०% च्या आसपास घरांमध्ये ग्रामीण भागात आजही स्वच्छतागृहांची व्यवस्था नाही. ती व्यवस्था होणे आवश्यक आहे. ही व्यवस्था झाल्यास स्वच्छ भारत अभियाना हे बऱ्यापैकी यशस्वी होऊ शकते व यातून मानवी आरोग्य देखील सुदृढ होईल.

----***----



Scanned with CamScanner

# स्वच्छ भारत अभियान

**हिंगे भारती दत्तात्रेय**, एफ.वाय. (बी.कॉम)

'स्वच्छ भारत अभियान' ही संकल्पना स्वच्छतेच्या बाबतीत लागू होते. या संकल्पनेचा विचार सर्वप्रथम स्वत:पासून सुरु केला तरच योग्य ठरेल. कारण आपले अंत:करण स्वच्छ असेल, तर आपण देशाच्या स्वच्छतेच्या दृष्टीने विचार करु शकतो.

'संत गाडगे महाराज' हे महान समाज सुधारक संत होऊन गेले. दारिद्र्य, अंधश्रध्दा, देवधर्म, कर्मकांड, देवभोळेपणा, जात-पात व व्यसने यामध्ये बुडून गेलेल्या समाजाला त्यांनी नवा मार्ग दाखविला. खराटा हेच त्यांचे साधन होते. गावातील गलिच्छ वस्त्या ते झाडून स्वच्छ करत. त्यांनी जन मानसातील कचरा साफ करण्याचे अखंड व्रत आयुष्यभर चालविले. गरिबीचे मुळ अज्ञानात, व्यसनात, गलिच्छपणात व आळसात आहे. हे त्यांनी लोकांना पटविले. सार्वजनिक जीवनात आर्थिक व्यवहार सांभाळणारा माणूस किती स्वच्छ असावा याचा गाडगेबाबा हे एक अत्युच्च आदर्श आहे.

'स्वच्छ भारत अभियान' म्हटले की, नुसती स्वच्छताच नव्हे, तर देशात चाललेले भ्रष्टाचार, तसेच स्वकर्तृत्वासाठी चाललेली अमानुष्या हत्या हे देखील विचारात घेतले पाहिजे. देश स्वच्छ असला की, उन्नतीच्या मार्गावर येतो. आजुबाजूला असणारी घाणेरडी अस्वच्छता थांबवली पाहिजे यात सर्वांनी सहकार्य केले पाहिजे.

वातावरण स्वच्छ असले की, किती आल्हाद -दायक वाटते. अलिकडे अनेक कारखान्यांचे सांडपाणी नदीमध्ये सोडले जाते. अस्वच्छता ही मानवाच्या जीवनाचा एक अविभाज्य भाग बनला आहे.

देशाचा स्वच्छतेच्या दृष्टीने विचार केला तर ७५% लोक स्वच्छतेचे मूल्यमापन योग्यप्रकारे करतात. उरलेले २५% लोक हे देशाला विघातक गार्टीकडे नेतात. आता तर प्लास्टिक पिशव्यांवर बंदी आलेली असूनही प्लास्टिकचा जास्त वापर होत आहे. रस्त्याच्या कडेला चॉकलेटचे रॅपर्स, प्लास्टिक पिशव्या, बॉटल इ. चे ढिगारे साचलेले आहे. का देशाला विघातक ठरणाऱ्या गोष्टींकडे वळावे?

अलिकडे भ्रष्टाचार इतका वाढलेला आहे की, सत्यवाद ही संकल्पना विसरत चालले आहे. यामुळे गरीबवर्गीयांना जीवन जगणे असह्य झाले आहे. लोक पैशांसाठी एकमेकांचा जीव घेतात. तसेच शिक्षणाचाा बुध्दीमत्तेशी व हुशारीशी असलेला संबंध तुटून तो फक्त पैशाशी जोडलेला आहे.

नुसता भारत देश स्वच्छ करणे म्हणजे देशाला वाईट गोष्टींपासून परावृत्त करुन सकारात्मक दृष्टीने विचार केला, तर आपोआपच हे अभियान योग्य ठरेल असे म्हणता येईल. या अभियानांतर्गत स्वच्छतेशी निगडित सर्व गोष्टींचा सखोल विचार केला पाहिजे.

----***----



Scanned with CamScanner

आपला भारत देश अस्वच्छतेतून मुक्त होईल. यामध्ये कचऱ्यासाठी कचरा गाडी आणि हा कचरा वेगवेगळ्या प्रकारात विभागून त्यावर प्रक्रिया करुन खते निर्मिती व त्याचप्रमाणे इंधन निर्मिती असे अनेक प्रयोग राबविण्यात येत आहे. त्याचप्रमाणे ग्रामीण भागातील रस्ते सुध्दा व्यवस्थित असावे. यासाठी प्रयत्न केले जात आहे. यामध्ये स्वच्छ पाणी देण्यात येत आहे. त्यासाठी लागणारा खर्च सरकार पूर्णपणे करत आहे. या भारत स्वच्छ अभियानात वेगवेगळ्या विषयांवर हे अभियान राबविले जात आहे. यामध्ये पाच वर्षांमध्ये संपूर्ण भारत देश गंदगीपासून मुक्त करण्यात येईल. ग्रामीण आणि शहरी भागात सामुदायिक व सार्वजनिक शौचालय बांधले जातील. रस्त्याच्या कडा व वस्ती साफ ठेवण्यात येतील. खराब पाण्याला स्वच्छ व चांगले बनवले जाईल. अशाप्रकारे २०१४ ते २०१९ पर्यंत या अभियानात लागणार खर्च १,९६,००९ करोड रुपये इतका होणार आहे. त्यासाठी वेगवेगळ्या मंत्रालय व विभाग कडून प्रतिसाद मिळत आहे. त्यामध्ये शहर विकास मंत्रालय, ग्रामीण विकास मंत्रालय, पाणी व स्वच्छता मंत्रालय, राज्य सरकार, सार्वजनिक क्षेत्र या सर्वांनी प्रतिसाद दिला आहे.

देशातील सर्व नागरिकांनी या भारत स्वच्छ अभियानास सहकार्य करुन सहभागी व्हावे.

----***----

## Teacher.... ! The Role Model

I don't care for praise of balme
I try my best
without carring for gain
I take it as a challenge
To serve my friends
I want them all tobe
Wounderful gems
I prepare my notes with lots of pain
To give something new
Is always my aim
I love my students
And never use a cane
No cheap talk
For personal fame
I use my time to enlighten them
I put moral values
In teacher brains
I don't know why
Students respect me well
I feel proud seeing them
Hearty and hale
Without a role model teaching is in
vain only what I practise that's
All I tell them
I am proud to be called
A 'torch be arer' 'nation builder'
On my sincere efforts
Depends India's future
I am grateful to God for making me a
teacher A teacher is comparred to
Brahma, Vishnu, Maheshwar.

- Nikhade Jyoti Ramdas, S.Y.B.Com.



Scanned with CamScanner

# स्वच्छ सुदृढ मन...!

प्रा. सारिका रा. दौंड (मानसशास्त्र विभाग)

मन चंचल आणि विचार भरकटलेले असले की, मग व्यक्तिमत्व भरकटण्यासाठी शक्यता अधिक. स्वत:च्या भावनेकडे आणि विचारांकडे आयुष्यभर लक्ष द्यावे लागते. म्हणजे वर्तमानात जगावे लागते. चुका घडल्या तरी त्या सुधारुन पुन्हा मन व विचार चांगल्याकडे ओढ घ्यायला हवेत. व्यक्ती म्हटली की, गुणदोष आलेच. स्वत:चे दोष स्वत:ला न दिसणे आणि गुण मात्र भिंगाखाली बघणे हे सुदृढ मनाचे लक्षण नव्हे. सुदृढ मनाला 'मी कोण आहे ?' हा प्रश्न विचारला की, जे उत्तर मिळते त्याचा विचार करा. इतरांना 'मी कोण आहे ?' या बद्दल काय वाटते. यापेक्षा मला 'मी कोण आहे?' याचे जे उत्तर मिळते ते महत्त्वाचे आहे.

एका वयात कौतुक करुन घ्यायची सवय असते. पण एका टप्प्यावर आत्मभान वाढवावे लागते. त्यासाठी मनात डोकावून आत्मपरिक्षण करावे लागते. स्वत:ला कसोटीला उतरवावे लागते. अधिक उंचावर झेप घेण्यासाठी उमद्या व्यक्तिमत्वाची ओळख करुन घ्यावी लागते. त्यांच्याकडून शिकण्याची मनाची निर्मळ इच्छा असावी लागते. काही माणसे त्यांच्या क्षेत्रात मोठी असतात, पण ती कमालीची स्वार्थी आणि अहंकारी असू शकतात. त्यांना माणसांना जिंकण्यापेक्षा हरविण्यात रस असतो. अशा व्यक्ती दुसऱ्यांना ना आनंद देवू शकतात, ना प्रेम, आपुलकी. स्वत:ला समजून घेवून स्वत:च्या क्षमता विकसित करुन इतरांना प्रोत्साहन देणे. त्यांच्यावर प्रेम करणे, आपल्या सहवासाने इतरांना प्रोत्साहित करणे, आनंद देणे हे परिपक्व मनाचे लक्षण. 'मी त्याच्या जागी असतो तर...' हा आपल्याला दुसऱ्याबद्दल विचार करायला लावणारा प्रश्न. किंवा 'हे माझ्या बाबतीत घडले असते तर ?' या प्रश्नाने मनाची खोली आणि उदार व्यापकता लक्षात येते. यातून सहानुभूती किंवा अनुकंपा यांचा जन्म होतो. माणूस अधिक संवेदनशील, परिपक्व व सुदृढ मनाचा बनतो. आपल्यापासून कोणाला त्रास, वेदना, गैरसोय, मनस्ताप इ. होऊ नये असे वाटणे. त्यासाठी मनोमन प्रयत्न करणे ही उत्तम शिष्टाचाराची आणि चांगल्या व्यक्तिमत्वाची पूर्वअट आहे.आपले विचार चांगले आहे ना ? चांगल्यापेक्षा वाईटाचे पटकन आकर्षण वाटणे, त्याची भूरळ पडणे ही मानवी मनाची कमकुवत बाजू आहे. वाईट हे प्रयत्नाशिवाय आत्मसात होते. चांगल्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागते. आपली प्रकृती आणि प्रवृत्ती सतत चांगल्या - वाईटाच्या हिंदोळ्यावर हिंदळत असते. तिला योग्य मार्गावर ठामपणे ठेवण्याचे काम आपलेच आहे. म्हणून प्रकृती व प्रवृत्ती चांगल्याकडे नेणे हे मनाचे महत्त्वाचे काम आहे. महत्त्वाचे म्हणजे 'चांगले' म्हणजे काय हे निश्चित करावे लागते. म्हणजेच मुळात चांगले संस्कार आणि गुणवत्तेचा विकास साधावा लागतो. हे कोणत्याही वयात घडू शकते. पण संस्कारक्षम वयात अधिक प्रभावीपणे घडते.संस्कारक्षम वयात 'स्वच्छ सुदृढ मन' आपल्या विचार, आचारातून घडवावे. आत्मविश्वास, इच्छाशक्ती, संवाद, कौशल्य, श्रवण कौशल्य, साहस, धैर्य, संयम, चिकाटी, विनम्रता, सहृदयता, संवेदशनशीलता यांचा आणि अशा अनेक घटकांचा विकास म्हणजे सुदृढ मनाचा विकास.



Scanned with CamScanner

# विमुद्रीकरण

पुरकर मोहिनी सुकदेव, तृतीय वर्ष (बी.ए.)

विमुद्रीकरण याचा थोडक्यात अर्थ म्हणजे जुन्या चलनातील नोटा रद्द करुन नवीन नोटा चलनात आणणे असा होतो. यालाच सर्वसामान्य भाषेत नोटबंदी असेही आपण म्हणतो. जेव्हा कोणत्याही देशामध्ये काळा पैसा वाढतो तेव्हा काळा पैशाचा ओघ थांबविण्यासाठी विमुद्रीकरणाची प्रक्रिया केली जात असे. आपल्या देशामध्ये विमुद्रीकरणाची ही पहिलीच प्रक्रिया आहे असे नाही. या अगोदरही विमुद्रीकरणाची प्रक्रिया केली आहे. साधारणत: पहिल्यांदा १९४६ मध्ये हजार अणि १० हजार रुपयांच्या नोटा चलनातून बाद करण्यांत आल्या. १९८४ मध्ये हजार, ५ हजार व १० हजार च्या नोटा चलनातून बाद करत, परत घेण्यात आल्या. त्यानंतर १९७८ मध्ये या नोटा पुन्हा बंद करण्यात आल्या व तद्नंतर ८ नोव्हेंबर २०१६ रोजी राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या (एनडीए) मोदींच्या नेतृत्वखाली केंद्र सरकारने पुन्हा एकदा ५०० व १००० रुपयाच्या नोटा बाद करुन नवीन नोटा चलनात आणण्यासाठी हा ऐसिहासिक निर्णय घेतला. प्रत्येक वेळी नोटा बंदी करण्यामागे काळ्या पैशाला आळा बसणे हाच उद्देश होता. मोदींच्या या नोटा बंदीच्या निर्णयामागे कुणाचे डोके ? तर यामागे पुण्याच्या अनिल बोकिल या मराठी माणसाने मोदींना ५०० व १००० च्या नोटा रद्द करण्याचा सल्ला दिला होता. अनिल बोकिल हे अर्थक्रांती संस्थेचे सदस्य आहेत. भ्रष्टाचार व काळापैसा रोखण्यासाठी हाच एकमेव उपाय आहे.

विमुद्रीकरणाच्या प्रक्रियेत जुन्या नोटा रद्द होऊन नव्या नोटा चलनात येत असतात. यामुळे ज्यांच्याकडे काळा पौसा असतो. ते काळ्या पैशाच्या बदल्यात नवीन पैसा बदलण्याचे किंवा काळा पैसा हा पांढरा करण्याचे धाडस नाही करत. यामुळे साहजिकच काळापैसा सर्व नष्ट होतो. विमुद्रीकरणाचा प्रमुख उद्देश आणि फायदे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) सामान्य अर्थव्यवस्थेतून काळा पैसा नष्ट होतो.

२) दहशतवादी संघटना व अवैध हत्याराच्या तस्करीला फंडिंग बंद होते.

३) नकली नोटबंदवर नियंत्रण ठेवता येते.

४) सावकारीवर निर्बंध येतात.

५) भ्रष्टाचारावर नियंत्रण ठेवता येते.

मोदी सरकारचा हा निर्णय जितका प्रभावी व धाडसी होता तितकाच दीर्घ परिणामकारकही ठरणार आहे. हा निर्णय त्या पध्दतीने काळ्या पैशावर नियंत्रण आणू शकतो, तितके छोटे मोठे निर्णय नाही आणू शकत. ऑगस्ट, सप्टेंबर २०१६ च्या दोन महिन्यात अघोषित उत्पन्न तपशील सादर करण्याची मुदत संपल्यानंतर प्रधानमंत्री व वित्तमंत्र्यांनी आवाहन केले होते टी.डी.एस.नुसार जवळ जवळ ६६ हजार रुपयांचा काळा पैसा समोर आला, परंतु तरीही देशात लपून ठेवलेल्या काळ्या पैशांचा आकडा याहूनही जास्त आहे. ज्या लोकांचा काळा पैसा अजूनही समोर आलेला नाही त्यांना तो पांढरा करण्यासाठी सरकारने ठरवलेल्या

अटीनुसार जवळजवळ अशक्य आहे. ज्या लोकांना भारतीय अर्थव्यवस्थेचे ज्ञान आहे. त्यांना हा निर्णय महत्त्वपूर्ण वाटतो. तर काही टिकाकार नोटा बंदी प्रकरणाबाबत काही याचिकाकर्ते सर्वोच न्यायालयात गेले. मात्र यावर केंद्र सरकारने याबाबत कोणतेही आदेश देण्यापूर्वी आमची बाजू ऐकून घ्यावी असे केंद्र सरकारने दाखल केलेल्या कॅन्व्हेटमध्ये म्हटले आहे. त्यामुळे आता केंद्र सरकारची बाजू ऐकल्या शिवाय न्यायालयाला आदेश देता येणार नाही.

सदर निर्णयाचे काही परिणामही भारतीय अर्थव्यवस्थेवर दिसून येणार आहेत. जसे की, सध्या जागतिक स्तरावर आर्थिक मंदीचे सावट असतांना भारताचा जीडीपी विकास दरात घसरण होईल असे सांगण्यात येते. २०१७ मध्ये देशाचा जीडीपी ७.५% विकास दराने वाढ घेत होता. प्रथम देशाचा जीडीपी इतक्या वेगाने वाढला आहे. कारण यापूर्वी २०१२-१३ मध्ये ३.५% २०१३ मध्ये ४.९% व २०११-१५ मध्ये ५.८% तर २०१५ मध्ये ६.२% होता. तर विदेशी मुद्रा भांडार (मिलीयन डॉलर मध्ये) २०१२-१३ ला २९२.०, २०१३-१४ मध्ये ३०४.२, २०१४-१५ मध्ये ३४१.७ तर जाने. २०१५ मध्ये ३४९.६ होते. साहजिकच यावर येत्या काळात परिणाम दिसून येईल. तसेच नोटा छापण्यासाठी लागणाऱ्या खर्चातही वाढ होईल. उत्पादन खर्चाच्या ४०% खर्च कागदावर ९.४२१ कोटी रु. खर्च झाला. यामुळे २०१८ मध्ये विकास दर जी.डी.पी ५.८% वर घसरण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. हा निर्णय काळापैसा रोखण्यासाठी असला तरी त्याचे परिणाम अनेकांवर होत आहे. सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था अशी जगात ओळख असणाऱ्या अर्थव्यवस्थेवर परिणाम होण्याची शक्यता अर्थतज्ञ व्यक्त करीत आहे. वस्तू विनिमयासाठी नाणी व नोटांचा वापर रोमन, ग्रीक तसेच हडप्पा संस्कृतीच्या काळापासून केला जातो. भारतामध्ये महमद तुघलकाच्या काळापासून नाणी अस्तित्वात आली. भारतामध्ये नाणी बनविण्यासाठी टाकसाळ व नोट छापण्यासाठी प्रिंटींग प्रेस अस्तित्वात आहेत. मध्यकाळामध्ये १६ व्या शतकात रुपया अस्तित्वात आला. सुरीच्या काळात (१५४०-१५४५) मध्ये चांदीचा रुपया १७८ टन वजनाचा बाजारावर आला आणि आधुनिक रुपया त्याच नाण्याचे प्रतिरुप आहे. १८६१ नंतर रुपया कागदी नोटामध्ये बदलला. १८६१ ला १० रुपयाची नोट बाजारात आली.

१८६४ मध्ये २० रु., १८७२ - ५ रु., १९०० ला १०० रु. नोट, १९०५ ला ५० रु. १९०७ ला ५०० रु. तर १९०९ मध्ये १००० रु. ची नोट अस्तित्वात आली. ३० वर्षानंतर पुन्हा १ रु. च्या नोटेची छपाई करण्यात येणार आहे. मोठ्या नोटा बंद झाल्यानंतर कमी किंमतीच्या नोटा जास्त प्रमाणात छापण्याचे आदेश सरकारने सर्व प्रेसला (आरबीआय) (भारतीय रिझर्व्ह बँक). नव्या नोटांची छपाई नाशिक (महाराष्ट्र) व देवास (मध्यप्रदेश) सालबोनी (पश्चिम बंगाल) येथील सिक्युरिटीप्रेसमध्ये केली जाते. वर्षाला २२ हजार मेट्रिक टन हा कागद व ८८ लाख रिम, वर्षाला ५, २७,८९५ झाडे कापावी लागतात. देशातील ४ प्रेसमधील छापलेल्या नोटांना जास्त झाडे कापावी लागू शकतात.

सध्या भारतीय अर्थव्यवस्थेमधील धोरणामध्ये नव्याने स्पष्टता व समरुपता आणण्यासाठी



Scanned with CamScanner

आर.बी.आय. गर्व्हनर उर्जित पटेल यांच्या अध्यक्षतेखाली ठसठशीत चलनविषयक समिती नेमली. (मनी पॉलीसी कमिटी) ची स्थापना झाली. तिची पहिली बैठक ३/१०/२०१६ रोजी झाली. चलन विषयक धोरणाचे निर्णय या समितीद्वारे घेतले जातात. पुढील ५ वर्षासाठी असे चलनविषयक धोरण ठरवले जाते. या समितीतील ६ सदस्यांमध्ये आर.बी.आय. गर्व्हनर, डेप्युटी गर्व्हनर, आर.बी.आय. ३ सदस्य व सरकारने निवडलेले ३ इतर स्वतंत्र सदस्य असतात. आर.बी.आय. ला चलनविषयक निर्णय महागाई वाढ, रोजगार, बँकिंग स्थिरता व एक स्थिर विनीमय दरासाठी अपेक्षित सल्ला घेण्यासाठी एम.पी.सी. मदत करेल.

चलनातून रद्द झालेल्या नोटांचे नंतर काय होते. या नोटांचे कागदाचे ठोकळे विकत फाईल्स, कॅलेंडर्स टी कोस्टर्स, स्मरणचिन्हे म्हणून वापरतात. काही बाद नोटा इंपिज साऊंडसाठी जातात. बाद नोटांवर प्रक्रिया करण्यासाठी आर.बी.आय. कडे (करन्सी व्हेरिफिकेशन अँण्ड प्रोसेसिंग सिस्टीम) आहे. प्रत्येक केंद्रात ६० हजार नोटावर प्रक्रिया केली जाते. खराब फाटलेल्या नोटा, मळक्या नोटा नष्ट करण्यासाठी १९ कार्यालयात २७ मशिन आहेत. चांगल्या नोटांचा कागद परत नव्या नोटा बनविण्यासाठी वापरला जातो. २००७ पर्यंत चलनातून बाद केलेल्या नोटा जाळल्या जातात. चीन नंतर भारत दुसरा सर्वाधिक मोठ्या चलनाचा उत्पादक व ग्राहक देश आहे. आर.बी.आय. या नोटा उद्योगाच्या खर्चाच्या १.५% आहे. एकावर एक बंडल लावले असतात. २३ अब्ज नोटांची उंची माऊंट एव्हरेस्टच्या उंचीच्या ३०० पट होईल, असा ब्लुमबर्गचा दावा आहे.

नोव्हेंबरच्या या निर्णयाचा डॉलरच्या तुलनेत रुपयाची किंमतीही जास्त होईल. रुपयाचे अवमुल्यन १९४७ आजतागायत होतच व वाढत चालले आहे. यावरुन म्हणता येईल डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्या ' द प्रॉब्लम ऑफ रूपी' या प्रबंधात म्हटले होते की, दर १० वर्षांनी चलन बदलायला हवे, कारण रुपयाचे अवमुल्यन कमी होईल व काळापैसा व भ्रष्टाचाराला आळा बसेल. असो उशीरा का होईना सरकारला बाबासाहेबांच्या दूरदृष्टीची जाणिव झाली एवढेच भाग्य समजावे.

----***----

## काय असते डोळ्यांत ?

आईच्या डोळ्यांत – वात्सल्य
वडिलांच्या डोळ्यांत – कर्तव्य
भावाच्या डोळ्यांत – आधार
बहिणीच्या डोळ्यांत – प्रेम
मैत्रिणीच्या डोळ्यांत – साहाय्यता
गुरुच्या डोळ्यांत – ज्ञान
कविच्या डोळ्यांत – कल्पना
गरिबांच्या डोळ्यांत – दुःख
श्रीमंतांच्या डोळ्यांत – गर्व

**जाधव राजश्री सोमनाथ,**
द्वितीय वर्ष (बी.ए.)

# स्त्री : भ्रूण हत्या

जाधव राजश्री सोमनाथ, द्वितीय वर्ष (बी.ए.)

समाजामध्ये स्त्री:भ्रूण हत्येचे प्रमाण फार वाढत आहे. का वाढत आहे स्त्री:भ्रूण हत्येचे प्रमाण ? स्त्री ही एक मुलगी आहे म्हणून तिची हत्या केली जाते. ती आई - वडीलांना सांभाळू शकत नाही म्हणून किंवा ती कुटूंबामध्ये ओझे आहे म्हणून, पण आधुनिक काळामध्ये मुलांपेक्षा ह्या मुलीच आपल्या आई-वडीलांचा सांभाळ करतांना दिसून येतात. तरी त्यांची हत्या का होत आहे. आणि प्रत्येक क्षेत्रामध्ये मुलीच पुढे आहेत तरी त्यांची हत्या होतांना दिसत आहे. स्त्रीयांना जन्माला येण्याच्या आधीच त्यांची हत्या केली जाते आणि नाहीतर गर्भ तपासणी करुन तो पाडून टाकला जातो. आणि तो कोठेही फेकून दिला जातो. काय चूक आहे या मुलींची की, ती एक मुलगी आहे ही चूक आहे. तिची ती जन्माला आली तरी त्यांना अनेक प्रसंगांना सामोरे जावे लागते.

उदा. आताच घडलेल्या कोपर्डी गावाचा सत्य प्रसंग आणि त्यानंतर चार वर्षाच्या मुलीवर झालेला अत्याचार, बलात्कार हा एक आश्रमशाळेतील शिक्षकाच्या मुलाने केलेला दिसून येतो. त्यामुळे या मुली जीवनास कंटाळून आत्महत्या करतात.

यामुळे स्त्रियांचे जीवन विस्कळीत झालेले दिसून येते. आणि या प्रसंगामुळे स्त्रिया स्वत:ची आत्महत्या करुन घेतात. समाजामध्ये मुलीकडे पाहण्याचा दृष्टीकोनच वेगळा आहे, जर एखादी मुलगी एखाद्या मुलाशी बोलली तरी ती वाईट आहे असे समजले जाते. मुला प्रमाणे मुलीला पण स्वातंत्र्य आहे. तरी तिला समाजाच्या बंधनाखाली रहावे लागते. जे व्यक्ती मुलींवर अत्याचार, बलात्कार करतात त्यांना आई-बहीण नसतात का ? त्या व्यक्तींना आई, बहिण, पत्नी असतात तर ते व्यक्ती असे का करतात. त्यांनी हा विचार केला पाहिजे की, आपली पण बहिण, आई, पत्नी आहे. जर प्रत्येकाने हा विचार केला तर हे थांबवता यईल. आणि अशा अनेक घटना घडत असतात. दररोज एका तरी मुलीवर अत्याचार, बलात्कार होताना दिसते. अशावेळी मुली जिवनास कंटाळून आत्महत्येच्या मार्गाकडे वळतात आणि दररोज पेपरला आणि बातम्यांना अत्याचार आणि बलात्कार यावर एकतरी बातमी असते. त्यामुळे मी म्हणते.

'लेक वाचवा लेक'
मुलीची हत्या करु नका कारण
'एक मुलगी, दोन्ही घरांना प्रकाश देते.'
म्हणून मी म्हणते.
आई हवी, बहिण हवी,
पत्नी हवी, आत्या हवी,
मामी हवी, मावशी हवी,
मग मुलगी का नको !

मुलगी जन्माला आली, तर प्रत्येकाला आई, बहीण, पत्नी, आत्या, मामी, मावशी मिळेल, जर मुलगी जन्माला आलीच नाहीतर ही सर्व नाते आपल्याला मिळणार नाही.



Scanned with CamScanner

# माझ्या कल्पनेतील आदर्श शिक्षणव्यवस्था

शेळके सोनाली संपत, प्रथम वर्ष (बी.ए.)

'छडी लागे छमछम, विद्या येई घमघम'' माझ्या कल्पनेतील शिक्षण व्यवस्था या गीतापेक्षा नक्कीच वेगळी नाही.

प्रभू रामचंद्र, छत्रपती शिवाजी महाराज या सारखे आपले आदर्श, पूर्वज ज्या शिक्षण व्यवस्थेत शिकले ती म्हणजे गुरूकुल, थोर, लहान, गरीब-श्रीमंत असा भेद नव्हता. तिथे स्वयंपाकापासून ते बिछाना तयार करण्यापर्यंत आपली कामे स्वत: करत म्हणजेच स्वावलंबन पध्दतीचा अवलंब असल्यामुळे ते आदर्श जीवन जगायचे. या गुरूकुलात कुठल्याही प्रकारचा भेद भाव नव्हता किंवा राजकारण नव्हते.

असाच काहीसा माझ्या कल्पनेतील पहिला घटक आहे आदर्श शिक्षक.

'गुर्रुब्रम्हा गुर्रु विष्णू गर्रू देवो महेश्वरा'

माझ्या मते गुरू वंदनीय आहेत आणि त्यांचा आदर्श, सन्मान राखायलाच हवा नाहीतर आजचे विद्यार्थी खुशाल शिक्षकांची टर उडवतांना दिसतात, 'अरे यार, क्या बोअर करता है, ये टकला !' अशी वाक्य ऐकायला मिळतात. मात्र गुरूचा आदर माझ्या शिक्षण व्यवस्थेत असेल आणि शिक्षक सुध्दा स्वचछ पद्धतीनेच गुणदान करणारा तसेच शिकवतांना शिकण्याची गोडी लावणाराच असावा.

ज्या प्रमाणे भगवान श्रीकृष्णाने गीतेत अर्जुनाला सांगितले आहे.

'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन। अगदी त्याच निरपेक्ष भावनेने जर शिक्षकाने कार्य केले तर नक्कीच आदर्श विद्यार्थी घडेल आणि आदर्श विद्यार्थी घडला म्हणजे आदर्श शिक्षणव्यवस्था समजा व्यवस्था घडेल.

आता माझ्या शिक्षण व्यवस्थेतील दुसरा घटक म्हणजे पालक व विद्यार्थी.

''नको दप्तराचे ओझे
नको ती अभ्यासाची कटकट आई
नको त्या क्लासेसच्या चकरा
मला वाटते आई
मुक्त पक्षी व्हावे, मनसोक्त गगन विहारावे,
थकून घरी यावे, तुझ्या कुशीत शिरावे
शांत निजावे.
मला वाटते, मी मुक्त पक्षी व्हावे !''

खरंच, माझ्या शिक्षण व्यवस्थेथील विद्यार्थी हा दप्तराच्या ओझ्यापासून मुक्त होऊन मनाप्रमाणे आपले क्षेत्र निवडीचे स्वातंत्र्य असणारा हवा किंवा असेल.

पालकांच्या डॉक्टर, इंजिनियर, वकील या अपेक्षेपेक्षा त्याला काय व्हावेसे वाटते ते करायचे स्वातंत्र्य असणारा असेल, पण फक्त अभ्यासच का करायचा ? लिखाण, अभिनय, काव्य, वाचन, विनोद, संगीत यांनी परिपूर्ण असलेला असेल. माझा आदर्श विद्यार्थी. 'प्रयत्न वाळूचे कण रगडिता तेलही गळे' असा ठाम असेल व तो ग्रहणार्थी न बनता ज्ञानार्थी बनेल.

आता आदर्श शिक्षण व्यवस्थेतील तिसरा घटक म्हणजे शिक्षण पध्दती. माझी शिक्षण पध्दती ही स्वच्छ असेल, ती राजकारण आणि भ्रष्टाचाराने बरबटलेली नसेल. 'बाप बडा ना भैय्या, सबसे बडा रुपय्या' 'डोनेशन भरा, मन चाहे क्षेत्र मे ॲडमिशन पाओ' या गोष्टीच माझ्या शिक्षण व्यवस्थेत नसतील म्हणजेच प्रामाणिक, हुशार विद्यार्थी आपोआपच पुढे येतील. तसेच मुलांना मनस्पताप न घडू देणारी असेल किंवा आत्महत्या रोखणारी असेल माझी शिक्षणपध्दती !

आता माझ्या शिक्षणव्यवस्थेतील चौथा घटक म्हणजे अभ्यासक्रम. माझ्या अभ्यासक्रमात खेळाला महत्त्व असेल. कारण आजचा विद्यार्थी हा दिवसभर अभ्यासातच गुंतलेला असल्यामुळे मैदानी खेळ विसरुन गेला आहे. जुने खेळ जे आपल्या दृष्टीसही पडत नाही. त्यांना पुढे आणेन, जसे कबड्डी, खो-खो, तलवारबाजी, दोरीउडी, कुस्ती यासारखे आपले राष्ट्रीय खेळ मागे पडत चालले आहेत. त्यांना प्रथम प्राधान्य असेल.

शास्त्रीय संगीत, शास्त्रीय नृत्य, श्लोक, गीता अध्ययन, धार्मिक ग्रंथ वाचन हे कलागुण जोपासण्याचे उपक्रम या शिक्षण व्यवस्थेत अंमलात आणलेले असतील. माझ्या कल्पनेतील शिक्षणव्यवस्थेचा विद्यार्थी तणावाखाली जाऊन आत्महत्या न करता मनासारखे छंद जोपासून एक उत्कृष्ट नागरिक, कारागीर, शेतकरी, वकील, कुस्तीगीर, नेमबाज बनलेला दिसेल, पण या सर्वांसाठी सुसंगती घडून आणून 'एकमेका सहाय्य करु अवघे धरु सुपंथ'' या उक्तीप्रमाणे वागून एक आदर्श शिक्षण व्यवस्था घडून येईल., शिक्षण व्यवस्था ही सर्व जीवनाचा व देशाचा पाया आहे म्हणून पाया भक्कम असेल, तर देश उज्वल व प्रगत बनेल,तरच आपण सगळे अभिमानाने म्हणू शकू.

'सारे जहाँ से अच्छा, हिंदोस्ता हमारा ।
हम बुलबुले हे इसकी ये गुलिस्ताँ हमारा ॥

हे मोठ्या अभिमानाने सर्व जगाला सांगू शकू.

शेवटी मला एवढंच सांगायचे आहे. माझ्या आदर्श व्यवस्थेतील विद्यार्थी हा दडपण विरहीत शिक्षण घेईल, पालक बालक सुसंवाद असेल. महत्त्वाचा दुवा शिक्षक असेल.

**स्पर्धा** – माझी आणि तुमची एकच आहे. व्यथा आपल्या अस्तित्वाला असते, जीवघेणी स्पर्धा, शिक्षणाच्या दाराशी ताटकळत उभे राहण्याची स्पर्धा, एकेक गुणासाठी जीव देण्याची, अन् घेण्याची स्पर्धा नोकरीच्या फसव्या मृगजळामागे फिरण्याची स्पर्धा, बेकारीचे जुलमी घाव सोसणाऱ्या असहाय्य युवकांची स्पर्धा, फाटक्या शिखाला कुरवाळीत मन मारुन जगण्याची स्पर्धा, फसव्या सुखासाठी हतबल करणाऱ्या वाईट मार्गांची स्पर्धा, वर्षानुवर्षे लोकांना फसवून खोऱ्याने पैसा ओढण्याची स्पर्धा, जगताना स्वत:ला टिकवण्याची स्पर्धा मेल्यावर स्मशानात पुरण्याची स्पर्धा. आता करायची एकच स्पर्धा, स्पर्धेत टिकण्याची स्पर्धा.

त्याहीपेक्षा खेळ, गोष्टी, वाचन, अंध्ययन, आध्यात्म, संगीत, परंपरागत कला, सण व उत्सव यांचे महत्व जपणारी तसेच पिझ्झा, पावभाजी या संस्कृतीपेक्षा घरी बनवलेल्या आईच्या प्रेमळ हाताने वरण-भात, भाजी, पोळीची ही सात्विकता पटवून देणारी माझी ही शिक्षणव्यवस्था असेल. 'हम युवाओं का नारा है, आदर्श शिक्षण व्यवस्था को लाना है.। यही संकल्प हमारा है 'बस्स अशी असेल माझ्या कल्पनेतील आदर्श शिक्षण व्यवस्था !



Scanned with CamScanner

# स्त्री-पुरुष समानता फक्त कागदावरच

गांगुर्डे अश्विनी प्रविण, द्वितीय वर्ष (बी.ए.)

काही वर्षापासून विशेष प्राचीन काळापासून स्त्रीयांवर अनेक बंधने होती. स्त्रीला कधीच कोणत्या गोष्टींचे स्वतंत्र्य नव्हते. चूल आणि मूल हे तिचे कार्यक्षेत्र ठरवून तिला चार भिंतीच्या आत अडकवले गेले होते. दुबळी, कमजोर, अडाणी असा तिच्यावर बोलबाला केला जाई. तर काही ठिकाणी मुरळी, गृहदेवता अशा गोंडस शब्दांच्या सहाय्याने तिला बंधनात टाकले जाई. गेल्या काही शतकापासून स्त्रीला कधीच पुरुषाप्रमाणे मानाचे स्थान दिले नाही व आजच्या नवयुगात ही तेच घडतांना दिसते.

उदा - खेडेगावातील एक स्त्री सरपंच झाली, पण तिचे सरपंच पद हे फक्त नावापुरते ! कागदापुरतेच असते. संपूर्ण गावचा कार्यभार तिचे पती पहात असतात. तिच्या निर्णयाचा, विचारांचा, अधिकारांचा कोणत्याच गोष्टींचा विचार केला जात नाही. तसेच विज्ञान, शिक्षण, राजकारण, समाजकारण, क्रीडा, साहित्य, कला या सर्व क्षेत्रांत स्त्रीयांना पुरुषापेक्षा कमी लेखले जाते. काही ठिकाणी तर स्त्रीचा जगण्याचा हक्क हिरावून घेतला जातो. काही स्त्रीयांची विक्री केली जाते. मग तुम्हीच सांगा. स्त्री-पुरुष समानता हा कायदा समाजात रुजलेला आहे का ? का फक्त कागदावरच.

आयुष्य घडवण्याचा पुरुषांइतकाच स्त्रीलाही अधिकार आहे. ही दृष्टी समाजात रुजवली पाहिजे. पण शिक्षणाचा प्रसार झाल्यामुळे तिला स्वतःच्या पायावर उभे राहण्याची संधी मिळालेली आहे. स्वतःचे क्षेत्र निर्माण केलेले असते व ती ते क्षेत्र गाजवत असते. हे सर्व फक्त घरदार सांभाळत असते. मुलांच्या विकासासाठी धडपडत असत; परंतु तिला मोकळीक, मुक्ती मिळालेली नसते. तिला ही आपले घर टिकवण्यासाठी तडजोडी कराव्या लागतात. तसेच काही वेळा स्वतःच्या मतांना, इच्छांना, आचार-विचारांना मनात कोंडून ठेवावे लागते. स्वतःचे आयुष्य जगतांना नेहमी प्रत्येक क्षणी दुसऱ्याचा विचार करावा लागतो.

गेल्या शतकात अनेकांच्या तसेच स्वतःच्या प्रयत्नातून स्त्री थोडी-थोडी बंधनातून बाहेर पडत आहे. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, म. फुले, डॉ. भिमराव रामजी आंबेडकर, टिळक, आगरकर, भाऊराव पाटील, काकासाहेब वाघ, सयाजीराव गायकवाड इ. समाजकर्त्यांनी शिक्षण क्षेत्रात मोठ्या प्रमाणात प्रगती घडवून आणली. स्त्रीयांना शिकवण्याचे कार्य विद्येची देवी सावित्रीबाई फुले यांनी केले. सावित्रीबाई फुले या पहिल्या स्त्री शिक्षिका म्हणून गणल्या गेल्या. सावित्रीबाई फुले यांना अनेक संकटांना सामोरे जावे लागते.

जर सावित्रीबाई फुले शिकल्या नसत्या तर भारताची पहिली महिला राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील झाल्याच नसत्या. शिक्षण नसते तर स्वतःचा जीव अडचणीत टाकून फक्त भारत देशाच्या स्वातंत्र्याचा विचार करणारी पहिली महिला शुर रणांगणा झाशीची राणी झालीच नसती. स्त्री शिकावी म्हणून



Scanned with CamScanner

मायावतीसारखी स्त्री एका राज्याची मुख्यमंत्री म्हणून काम करताना आज आपल्याला दिसते. सुनिता विल्यम्स सारखी महिला अंतराळवीर झाली. सानिया मिर्झा या स्त्री ने बॅडमिंटन या क्षेत्रात नाव कमावले व भारत देशाचेही नाव उज्वल केले. हे फक्त एक स्त्री शिकल्यामुळे घडले.

शिक्षणाची दारे खुली झाल्यावर स्त्रीने आपल्या प्रगतीचा मनोरा रचला आहे. मानवी जीवनातील कोणतेही क्षेत्र तिला अशक्य राहिलेले नाही. राजकारण, समाजकारण, कला, क्रीडा, साहित्य, वैज्ञानिक, शिक्षण इ. अशा अनेक क्षेत्रात स्त्री मोलाची कामगिरी पार पाडत आहे. पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करत आहे. पुरुषांच्या बरोबरीने रणांगणावरही आपली कर्तबगारी गाजवत आहे. तरी पण आजही स्त्री मुक्त आहे असे तुम्हाला वाटते का ?

स्त्रीयांनी शिक्षण घेतल्यामुळे त्या आता अडाणी, निरक्षर राहिलेल्या नाही. अगदी बंगल्यातील आणि झोपडीतील स्त्री याही आपल्यावर होणाऱ्या अत्याचार सहन करत नाही, पण म्हणून तिच्यावर बलात्कार, अन्याय, दडपशाही होत नाही असे नाही. झोपडीत राहणाऱ्या गरीब स्त्रीया आज शहरात जाऊन किंवा शेतीची कामे करुन २-३ हजार रुपये कमवतात व आपल्या मुलाबाळांचा, कुटूंबाचा सांभाळ करतात. प्रसंगी काही स्त्रिया स्वत: उपाशी राहून पोटाला चिमटा घेऊन मुलांना चांगल्या शाळेत घालतात. त्यामागे त्या आईचा एकच हेतू असतो की, माझ्या मुलांचे भवितव्य उज्वल व्हावे. त्याचे आयुष्य सुखी व्हावे. पण खेडेगावात कष्टकरी महिलांचे दारुडे पती कामधंदा न करता या स्त्रियांना मारहाण करुन दारुसाठी पैसे उकळतात. मग तुम्हीच सांगा ही स्त्री स्वत:चे निर्णय स्वत: घ्यायला समर्थ आहे कां ?

बदलत्या युगानुसार समाजातील घटस्फोटाचे प्रमाण वाढलेले आहे. घटस्फोटाचे प्रमाण वाढण्याचे कारण असे आहे की आज ही समाज स्त्रीकडे थोड्या अधिक वाईट नजरेने, वृत्तीने पाहतो. समाजाची ही दृष्टी बदलायला हवी. स्त्रीचा आदर केला पाहिजे. पुरुषांच्या बरोबरीने तिला अधिकार दिले पाहिजे.

आजच्या या धावपळीच्या युगात हुंडा ही एक गंभीर समस्या म्हणून उभी राहिली आहे. हुंड्यासाठी स्त्रीला जाळण्यात येते, तिची हत्या केली जाते. काही वेळा तर तिच्यावर बलात्कारही केला जातो. स्त्रीवर अन्याय करणाऱ्या एखाद्या नराधमाला शिक्षा करुनही स्त्रीवरील अन्याय संपणार नाही.

मुलगा म्हणजे वंशाचा दिवा. म्हातारपणाची काठी आणि मुलगी म्हणजे परक्याचे धन. कर्जाचे ओझे तसेच पुरुष श्रेष्ठ व स्त्री कनिष्ठ हा मुळातील अन्यायकारक दृष्टीकोनच दूर नाही का केला पाहिजे. स्त्री-पुरुष समान आहे. या तत्वाचा विचार प्रत्येक व्यक्ती करेल किंवा स्त्री-पुरुष समान आहे. या तत्वाला प्रत्येकाच्या मनात, जीवनात मानाचे स्थान मिळेल. तेव्हाच स्त्रीला सुध्दा मानाचे स्थान मिळेल. स्त्रीचा दर्जा उंचावेल व मुक्त, आत्मनिर्भय, पराक्रमी, धाडसी, कर्तृत्ववान स्त्री निर्माण होईल व त्यातून चांगला व विकसित समाज निर्माण होईल.

----***----



Scanned with CamScanner

# वयाच्या पाच वर्षांपासून ते पन्नाशीपर्यंत...

आहेर प्रियंका किशोर, द्वितीय वर्ष (बी.ए.)

आपले दैनंदिन जीवन हे यंत्राच्या आधारावर आहे. आपण यंत्रावर जास्तच विसंबून आहोत. पण देवाने दिलेल्या सुंदर हाताचा वापर करुन आपण नवनवीन गोष्टी शिकून आपला वेळ, पैसा वाचवून काहीतरी स्वत:चे कार्य केले याचे समाधान मिळवू शकतो. आपले प्रोफेशन सांभाळून एक नवी ओळख निर्माण करु शकतो.

अष्टपैलू व्यक्तीमत्व असणाऱ्या राजे शिव छत्रपतींच्या महाराष्ट्रातले आपण सारे. फक्त मी, माझे घर, माझे कुटूंब आणि शिक्षण व ते पूर्ण झाल्यावर जॉब आणि त्यानंतर रिटायरमेंट बस... इतकाच लाईफचा ट्रॅक... त्यापेक्षा दैनंदिन आयुष्यातील मोकळ्या वेळेत. मोबाईलमध्ये गेम खेळत बसण्यापेक्षा एखादे वाद्य वाजवायला शिकणे, गायला शिकणे, बागकाम करणे, धार्मिक स्थळांवर जाऊन श्रमदान देणे, गरीब होतकरु विद्यार्थ्यांना विनामूल्य शिक्षण देणे. कॅलीग्रॅफी, फोटोग्राफी, हस्तकला, कलाकुसरीच्या वस्तू बनवून गृह सजावट करणे किंवा नवनवीन गोष्टी शिकणे किंवा शिकवणे इत्यादी कामासाठी जर आपण आपला मोकळा वेळ दिल्यावर मानसिक समाधान नक्की मिळते. कुठलीही गोष्ट शिकण्यासाठी कुठल्याही प्रकारची मर्यादा नसते व या साऱ्या गोष्टी मुलींनी किंवा स्त्रीयांनी कराव्यात असे नाही, मुलेही अशा गोष्टी करु शकतात. उदा. एखाद्या कुशल कारागिराच्या हाताखाली राहून त्याला मदत करुन त्याचे काम शिकून उदा. गवंडी, वायरमन, प्लंबर, मॅकेनिक त्याचा वापर दैनंदिन जीवनात करु शकतो. लहानपणापासूनच मुलांना स्वत:चे काम स्वत: करण्यास सांगितले म्हणजे देवाजवळ दिवा लावणे, कपबश्या विसळणे, स्वत:चे जेवणाचे ताट उचलणे अशा छोट्या मोठ्या कामाची सवय लावल तर अशी मुले मोठेपणी नम्र बनतात. आपल्या समाजात असे अनेक दिग्गज होऊन गेले आहेत. ज्यांनी आपल्य प्रोफेशन बरोबर स्वत:ची अजून एक ओळख बनवली आहे. शिवाजी महाराजांची कल्पकवृत्ती, कल्पनाशक्ती, कारागिरी, निर्णयक्षमता साऱ्या जगाला ज्ञात आहे. इंदिरा गांधी राजकारण करता करता एक उत्कृष्ट लेखिका ही होत्या. दिवंगत अभिनेता सतिश तारे ॲक्टर सोबत तो एक चांगला वाद्यवादक ही होता. अशी अनेक व्यक्तीमत्वे आपल्यात राहतात, परंतु सगळेच जण असे परिपूर्ण असू शकत नाही. फक्त आपण ज्या भागात राहतो. जिथे आपला वावर असतो. तेथे जरी स्वच्छता मोहीम राबविली तरी तो आपल्यातील वेगळेपणाचा व कलेचा भाग आहे.

## माय....



शेत मजूरीचं जीणं....
सटवाईनंच दिलं
वावराच्या पाठीवर
तिनं....खुरपं गिरवलं

माझ्या शब्दांत माईना
तिच्या दु:खाचं धरण
माईच्याच परिसानं झाली माझी
जिंदगी सोन्याची.

– काजल अरुण आहेर, द्वितीय वर्ष (बी.ए)

# सैनिकांचे माहेरघर...

भालेराव सागर बाळासाहेब, द्वितीय वर्ष (बी.ए.)

'भारत माता की जय' असाच आवाज देत असतात ते सीमेवर रात्रंदिवस आपल्या भारत मातेचे रक्षण करत असणारे जवान. आपल्या देशासाठी भारत मातेसाठी व देशातील नागरिकांचे संरक्षण करण्यासाठी हे जवान सीमेवर लढत असतात, पण यामध्य प्रत्येक जवान आपली जात आणि धर्म विसरुन आपल्या मातृभूमीसाठी लढत असतो आणि भारत मातेची सेवा करत असतो. या ठिकाणी कोणी हिंदू असो या मुस्लीम, शिख असो वा तेलंगू असो. प्रत्येक जवानाचा धर्म एकच असतो तो म्हणजे 'मी भारतीय' असे हे जवान आपल्या स्वत:च्या जन्मदेत्या आईची काळजी न करता व तिचे रक्षण कोण करते हे सर्व विसरुन आपल्या मातृभूमीसाठी भारत मातेसाठी सीमेवर लढत असतात.

या ठिकाणी प्रत्येक जवान भारत मातेचे रक्षण करण्यासाठी भारतातील कुठल्यातरी छोट्या-मोठ्या गावातून आलेला असतो, मग असाच एका गावातील एक दोन नाही तर १०० हून अधिक जवान आपल्या मातृभूमीच्या रक्षणासाठी, देशाच्या सेवेसाठी आज सीमेवर लक्षत आहे ते गाव खरोखरच महान आहे.

महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यातील चांदवड तालुक्यातील 'शिंदे भायाळे' हे छोटस् गाव. या गावाची लोकसंख्या १५०० इतकी असून या गावात सर्व गांवकरी शेती करतात, पण या गावाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक घरातील मुलगा हा सैन्यदलात देशाची सेवा करण्यासाठी गेलेला आहे. पण ही गोष्ट पहिल्यांदा कमी प्रमाणात होती, पण बघता बघता गावातील प्रत्येक मुलगा हा सैन्य दलात जाऊन देशासाठी व देशातील नागरिकांचे रक्षणासाठी जातो आहे. या गावातील मुलांमध्ये देशाबद्दल व भारतमातेसाठी एक वेगळेच प्रेम निर्माण झाले. त्यामुळे या गावातील आतापर्यंत शंभराहून अधिक जवान सीमेवर आपल्या देशासाठी व भारतमातेच्या रक्षण करण्यासाठी दिवस-रात्र लढत आहे. त्यामध्ये या जवानांना सीमेवर लढत असतांना आपल्या गावाबद्दल अभिमान वाटत असतो.

गावातील नागरिकसुध्दा आपल्या मुलांना सैन्य दलात जाण्यासाठी सांगत असतात. त्यामुळे गावातील नागरिकांना देशाबद्दल, भारतमातेबद्दल अभिमान व प्रेम वाटते. हे जवान आपल्या भारतमातेसाठी सीमेवर रक्ताचे पाणी करुन भारतमातेचे रक्षण करत असतांना अनेक सण, उत्सव, कार्यक्रम येत असतात, पण त्यांच्या जिवनात असणारा सण हा एकच असतो. तो म्हणजे भारतमातेचे रक्षण करणे आणि शत्रूला पराभूत करणे. यामध्ये या गावातील जवान आपल्या देशासाठी व भारतमातेसाठी अमरपण झाले आहेत. आणि या अमर झालेल्या जवानाचे स्मारक या गावात उभारण्यात आले आहे. त्यामुळे गावातील असणारा मुलांना भावी सैनिकांना प्रेरणा मिळतेच आणि त्याचप्रमाणे या गावात सैन्यात जाण्यासाठी प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यात आले आहे. या प्रशिक्षण केंद्रातून सैन्यामध्ये जाण्यासाठी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन मिळत आहे. आणि या



Scanned with CamScanner

ठिकाणी प्रशिक्षक जे आहे ते सैन्यदलातून सेवानिवृत्त झालेले जवानच आहे. त्यामुळे या ठिकाणी प्रशिक्षण घेणारा विद्यार्थी सीमेवर होणाऱ्या हालचाली व त्या सरांचे अनुभव या विद्यार्थ्यांना फायद्याचे ठरते आहे. त्यामुळे या गावातील विद्यार्थी ही सैन्य भरतीसाठी व देशभक्तीसाठी आणि देशाचा सेवेसाठी आपले कार्य चालूच ठेवतील आणि आज सीमेवर भारतमातेची सेवा करणाऱ्या या गावातील जवानांना माझा मानाचा सलाम, आणि जे भारतमातेसाठी अमर झाले त्यांना पण माझा सलाम आणि भारतमातेसाठी, देशाच्या सेवेसाठी ज्यांना जाण्याची इच्छा आहे. त्यांनापण माझ्याकडून अनेक शुभेच्छा...!

माँ तुमसे मिलने आया
कुछ पल साथ निभाने को
कुछ खुशियाँ देकर जानें को ॥

दुश्मन ने धावा बोला है,
माँ उसको धूल चटाना है,
अब तुम मुझको मत रोको,
मुझको सरहद्द पर जाना है, ।

याद बहुत आता है, पापा
कंधो पर जो आप घुमाते थे,
कभी मम्मी थप्पड लगाती थी,
चॉकलेट से हमें मनाते थे. ।

बहुत दिखाया गांधी हमने
भगतसिंह को अब दिखाना है,
पापा अब मुझे मत रोको
मुझको सरहद्द पर जाना है. ।

----***----

# शोध स्व:ला....

ना कोणासाठी आडले ना कोणासाठी घडले
जीवन मात्र एकट्यानेच शोधले
भिर-भिरणाऱ्या पाखरा सारखे जीवन आहे माझे
सांग रे माणसा कोण आहे तुझे
आयुष्यात असणाऱ्या ध्येयावर पाणी कसे फिरले
जग रे माणसा जग कसे आयुष्य घडले
कोणी-कोणाचे नसते, त्यात दु:खात जीवन घडते
ना कोणासाठी आडते, ना कोणासाठी घडते
जीवनाच्या वाटेवर भेटते, पण अर्ध्यावर सोडते
शोध माणसा शोध जीवन मात्र एकटेच असते.
जीवनात कितीतरी दु:ख येतात, सामोरे जाण्यास लढ
माणूस हा एकटाच आहे, ध्येय मात्र शोध
माणूस हा एकटाच असतो, साथ कोणाची नसते
जगताना विचार कर कोणी कोणाचे नसते.
माय-बाप जन्म देतात, त्यांचे ते कर्तव्य असते
जरा विचार करुन बघ सोबत कोण येते
माणूस पण कशासाठी दु:खात वेदना घडण्यासाठी
जीवन आहे अनमोल त्यात रडण्यासाठी
जगताना विचार कर कोण-कोणाचे असते
माझे माझे म्हणता एकटेच जीवन घडते
आपलं माणूस आपली नाती अर्धावरती सोबती
जरा विचार करुन बघ कोणी येत का सोबती.
नाती गोती ती प्रेमाची छाया असते
जगताना सोबतीन ती पण अर्धावर सोडते
प्रेमाच्या मायेपोटी जीवन ते जुळते
श्वास मिटू दे । तुझ्यासोबत कोण येते
शोध स्वत:लाच शोध कोण तू
लढ रे माणसा लढ एकटाच आहे तू.

– जाधव धनश्री भाऊसाहेब, प्रथम वर्ष (बी.ए.)

# माझ्या जीवनातील वेळेचा अनुभव...

भालेराव सागर बाळासाहेब, प्रथम वर्ष (बी.ए.)

मित्रांनो, आम्ही शाळेत असताना अशीच सत्य घटना माझ्या जीवनात घडली आहे, पण या घडलेल्या घटनेतील पात्राचे नाव बदल करण्यात आले आहे. त्यामुळे ही घटना एक आमच्याच सारख्या विद्यार्थ्याची व मित्राची आहे. कारण मित्रांनो माणसाकडे दोन गोष्टीचे खूप मापन पाहिजे ते म्हणजे पहिली गोष्ट 'वेळ' अणि दुसरी गोष्ट म्हणजे 'आत्मविश्वास' या दोन गोष्टी प्रत्येक माणसाच्या जीवनात असतात आणि येतात. पण त्याचा योग्य वापर करणे गरजेचे ठरते. कारण वेळ यातून होणारे नुकसान हे पुढे समजले आणि आत्मविश्वास तर इतका पाहिजे ना की, एखाद्याने कितीही डिलीट करण्याचा प्रयत्न केला तरी तो उरला पाहिजे. इतका आत्मविश्वास पाहिजे. त्यावेळी माणूस हा आपले शिखर सर करु शकतो.

आताच उन्हाळा संपला आणि पावसाळा सुरु झाला होता. जून महिन्याचा दिवस होता. बघता बघता जून महिन्याचा पहिला आठवडा सुरु झाला आणि काळजातील हालचाली वाढल्या. मन कावरे-बावरे होत होते आणि आम्ही सर्व मित्रांनी दहावीची परिक्षा दिलेली होती. त्यात आज दहावीचा निकाल ,समजणार होता.

अन्.... ! तो सोन्याचा दिवस उगवला. तो दिवस म्हणजे आमच्यासाठी एक ऐतिहासिक दिवस, क्षण असावा. कारण आम्ही सर्वजण बाहेरील शाळेत शिकण्यासाठी आलेलो. गावापासून दूर आणि मी माझा निकाल बघितला. मी तर चांगल्या गुणांनी पास होतो. आम्ही सर्व एकमेकांचे गुण बघत होतो व खूप उत्साहीत पण होतो. अशाचवेळी सर्वत्र अभिनंदन होत होते.

आता पुढील तयारीला आम्ही लागतो. आमच्यामधील दोन-तीन मित्रांनी विज्ञान शाखेथ प्रवेश घेतला आणि उरलेल्या आम्ही सर्वांनी कला शाखेत प्रवेश घेतला. आता २ जुलैला आमचे कॉलेज भरणार होते. आणि आई-बाबा प्रत्येकाला लागणारे अभ्यासाचे साहित्य घेऊन देत होते आणि खरेदी करत होते. माझा खूप जवळचा मित्र अर्जून यानी पण माझ्या बरोबर प्रवेश घेण्याऐवजी दुसऱ्या मुलांबरोबर प्रवेश घेतला आणि तो पण विज्ञान शाखेला, पण त्याचा आत्मविश्वास त्याला खूप होता की, मी हे पूर्ण करेल, पण आम्ही कला शाखेत प्रवेश घेऊन खूश होतो. आणि जसे जसे दिवसामागे दिवस निघून चालले आणि आम्ही अकरावी या वर्षातील वार्षिक परीक्षा देऊ लागलो. त्यातूनच एकामागून एक पेपर देत गेलो. आणि येथेपण चांगल्या गुणांनी पास झालो. आता आम्ही सर्व मित्र १२ वी या वर्षात व वर्गात प्रवेश केलेला होता. आमचे मित्र अर्जुन व बाकीचे पण पास झालेले होते आणि ते सर्वजण आपला बारावीचा अभ्यास व्यवस्थित करीत होते. पण यातून सर्वजण मज्जा, मस्ती पण करत होतो.

नदीवर आंघोळ करणे, विविध ठिकाणी फिरणे इ. हे सर्व माझा मित्र अर्जून व त्याचे मित्रही करत होते, परंतु ते नुसते मज्जा करत होते. कारण एखाद्याला



Scanned with CamScanner

वर्षाला चांगले गुण जास्त कालावधीनंतर लागतात, पण वाईट गुण लवकर लागतात. त्याचप्रमाणे अर्जुनपण होता. त्याला असे वाटले की, अकरावी पास झालो त्याचप्रमाणे बारावी पण पास होवू. आणि आमच्या बघता बघता पूर्व परिक्षा तोंडावर येऊन ठेपल्या आणि एक एक करुन पेपर सुरु झाले. सर्व पेपर संपले आणि बारावीचे मार्चमध्ये होणाऱ्या बोर्डाच्या परिक्षाचे वेळापत्रक मिळाले. या सर्वांचा मनावर दबाव पडला आणि सर्वजण अभ्यास करण्यास सज्ज होऊन अभ्यास करु लागले.

आमच्यामधील दोन तीन मित्र अभ्यास परिक्षेच्या वेळेस करु असे म्हणू लागले. त्यात माझा मित्र अर्जुनपण होता. आणि पेपर सुरु झाले. सर्व पेपर झाले. आता डोळे लावून बसलो फक्त निकालाकडे. त्यातून मनावर दबावपण यायचा आणि आनंदपण व्हायचा. पण आम्ही खूप मज्जा करत होतो. आणि मे महिन्याचा शेवटच्या आठवड्यात २९ मे हा दिवस उजाडला आणि ऑनलाईन निकाल बघण्यासाठी आम्ही सर्वजण एकत्र जमलो होतो.

बारा वाजेनंतर निकाल जाहीर होणार म्हणून मन कावरे बावरे होत होते. कोणीही कोणारोबर बोलत नव्हते मित्राने तर माझा आसन नंबर टाकून ठेवला आणि बारा वाजताच सर्च करण्यास सुरुवात केली. तर माझा निकाल माझ्या समोर आला आणि माझे मार्क न बघता मी पास आहे की, नापास ते बघितले आणि माझा मनात आनंद गगनात मावेनासा झाला. आता सर्वजण प्रत्येकाचा निकाल बघत होता आणि बघता बघता आमचा मित्र अर्जुनचा निकाल बघितला तर जितका आनंद सर्वांच्या आणि माझ्या मनात साचलेला होता.

तो एका क्षणात नाहीसा झाला. कारण अर्जुन नापास झालेला होता. सर्वांचे डोळे पानावलेले होते कारण आतापर्यंत आलेला आपला मित्र कोठेतरी सोडून जातोय असे वाटत होते, पण मित्रांनो अर्जुन खूप रडू लागला आणि आत्मविश्वास कमी पडायला लागला. कारण आमच्या सर्वांच्या डोळ्यासमोर अर्जुन होता, पण अर्जुनच्या डोळ्यासमोर त्यांनी केलेली मजा, मस्ती आणि नदीवरील आंघोळीचा आनंद या सर्व त्याच्या चेहऱ्यावर दिसत होता. ते म्हणजे दु:खाच्या स्वरुपात. कारण आजची मजा ही उद्याचे दु:ख बनू शकते. हे अर्जुनला समजून चुकले होते. आणि त्याचे एक वर्ष वाया गेले आणि त्याने विचार केला की, मी जर तुमच्या सारखा वागलो असतो, तर मला असे फळ मिळाले नसते. असे अनेक विचार त्याच्या मनातून आणि अश्रूंतून ओघळत होते, पण कितीही केले तर ते उशीरा सुचलेले शहाणपण होते. कारण त्याला प्रत्येक वेळी आपला भूतकाळ आणि भविष्यकाळ दर्शवित होता. त्यामुळे मित्रांनो वेळ ही खूप महत्त्वाची आहे. त्यामुळे तिचा योग्य वापर करा आणि आत्मविश्वाने वागा. कारण आत्मविश्वास हा माणसाला दिशा दाखवत असतो. पण वेळ ही मार्ग व आपले भविष्य दाखवत असते.

बिलगेटस् ने कधी लक्ष्मीपूजा केली नाही, पण तो जगतला श्रीमंत व्यक्ती आहे. आइस्टाईन ने कधी सरस्वती पूजा केली नाही, पण तो जगामध्ये बुद्धीवान होता. कामावर विश्वास ठेवा नशिबावर नाही. देवावर विश्वास ठेवा, पण अवलंबून राहू नका.

----***----



Scanned with CamScanner

# भयंकर तो दिवस....

भालेराव सागर बाळासाहेब, द्वितीय वर्ष (बी.ए.)

वेळ सायंकाळची होती. सगळीकडे आंधरलेले होते. रस्त्यावर लांबच लांब पर्यंत कोणीही दिसत नव्हते. जंगलातून जाणारा सुनसान रस्ता, कोणता होता हा दिवस, काय झालं या दिवशी, वाटतं तरी का असं होईल. या घटनेला कोण कारणीभूत राहील. समाजात का घडतात अशा घटना. या समाजात माणुसकी नावाचा शब्दच राहिला नाही का ? भयंकर असा हा दिवस काळोखाची रात्र आणि घेतलेला शेवटचा श्वास.

दि. १७ जुलै २०१६, वार - सोमवार, जि. अहमदनगर, ता. कर्जत कोपार्डी हे गांव. या ठिकाणी घडलेली ही घटना काय चूक या मुलीची, कोणती शिक्षा दिली या मुलीला. काय झालं होत मुली सोबत, नको असणाऱ्या घटना या समाजात का घडून येतात.

मानव जातीला व माणुसकीला काळिमा फासणारी ही घटना कोपार्डीतून या परिसरात अल्पवयीन मुलींवर घडून आली. रविवारचा दिवस होता. घरातील सर्वजण शेतात कामासाठी गेलेले होते. या मुलीची तब्येत खराब असल्याने ती घरीच थांबली होती. संध्याकाळी घरातले घरी आले. सायंकाळचे ७ वा. आईने तिला आजीकडून काही वस्तू आणण्यास पाठविले. तेव्हा ती आईला बोलली की, मी जाते आणि ती सायकलवर आजीकडे गेली. आजीकडे गेलेली ही मुलगी आजीला भेटून व सांगितलेली वस्तू घेऊन ती आपल्या घराकडे निघाली, पण तिला निघतानाच अंधार झाला होता. तिला भिती पण वाटत होती, पण ती निघाली, ती घरी पोहचली नाही. खूप वेळ झाला होता, पण ही मुलगी घरी अजून पण आली नव्हती म्हणून तिच्या आईने आजीकडे फोन केला तर त्यांचा फोन बंद आला. आता तर चिंता वाढू लागली होती. आणि सर्वत्र अंधारुन आले होते. म्हणून तिच्या घरातले सर्व तिला शोधण्यासाठी निघाले. तिची आई तर आजीकडे जाऊन आली. पण आजीने सांगितले की, भरपूर वेळापूर्वी ती गेली आहे. हृदयाचे ठोके वाढत होते. सर्व कुटूंब शोधण्यांसाठी घराबाहेर पडलले होते. तेवढ्यात तिच्या मावस भावाला तिची सायकल रस्त्याच्या कडेला पडलेली दिसली. सायकल तर होती, पण ही मुलगी का दिसेना म्हणून आजूबाजुला असणाऱ्या जंगलात बघितलं तर नको असणारी घटना त्या मुली सोबत घडून गेली. कोणते पाप केले होते या मुलीने? का घडली ही घटना, कोण होता तो नराधम. या पिडीत मुलीचा का झाला हा छळ, बलात्कार आणि अत्याचार या देशामध्ये का घडतात. या कोपार्डीतील घटनेमुळे त्या परिसरातील मुली शाळेत जाण्यासाठी घबरत आहे. या देशामध्ये कित्येक घटना बलात्कार व महिलांवर होणाऱ्या अत्यांचाराच्या आहेत. यावर समाज म्हणतो की, यावर बंदी घातली पाहिजे. यावर कडक कारवाई केली पाहिजे. पण परत परत या घटना घडतातच. यामध्ये अजून एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे बलात्कार, अत्याचार ह्या घटना अल्पवयीन मुलींवर जास्त प्रमाणात घडून येतात. वाटते की अशा या नराधमांना



Scanned with CamScanner

का असे वाईट विचार येतात. असे नको असणारे अत्याचार या चिमुकलीवर का होत असतात.

एका बाजूला बघितले तर इंग्रज काळापासून आतापर्यंत महिलासाठी व त्यांच्यात बदल करण्यासाठी प्रयत्न केले जातात आणि महिलेसाठी सक्षमता हवी असे आवाज एका बाजूला दिले जातात. समाजात मुलगी हवी असे संदेश दिले जातात आणि एका बाजूस असे होणाऱ्या अत्याचारास मुलींना बळी पडावे लागते. यातूनच महिलांसाठी प्रशासनाने भरपूर सुरक्षा वाढवली असून सुध्दा का घडतात अशा घटना? स्त्रियांसाठी दिलेली स्त्री-पुरुष समानता या घटनास कारणीभूत ठरु शकतात? अशा अनेक घटना या देशात दररोज घडतात. अशाप्रकारे अनेक प्रश्न या घटनेबद्दल व महिलेच्या सुरक्षिततेबद्दल निर्माण होऊ लागले आहे.

त्यामुळे स्त्रियांनी आपली स्वत:ची सुरक्षितता करायला हवी. आणि कोपार्डीमुळे सर्वत्र खळबळ निर्माण झाली. मुलींवर होणारे अत्याचार व बलात्कारामुळे अनेक प्रश्न निर्माण होतात. त्यामुळे या घटना कुठेतरी थांबल्या पाहिजेत.

----***----

## आई....



आई या दोन शब्दांत
संपूर्ण अखंड विश्वाचं
संस्कार मला तुझे
सामर्थ्य देती
भवसागर तरुण जाया...
आई तुझ्या मायेने घर बनले मंदीर
थकलेल्या, दमलेल्या मनाला
तुझे गोड शब्द देई धीर....
केवळ तुझ्याच आशीर्वादात
अद्भूत शक्तींचा श्वास
वाढविते आमचे सामर्थ्य
लागते आम्हाला संस्कारांची आस
आणि हलका वाटे कठीण कामाचा त्रास...
ईश्वर तुला देवो चांगले आरोग्य आणि सुखाचे दान
देवा, सतत आनंदात असू दे
आमचे आनंद धाम.... आनंद धाम....

– वैष्णवी आवारे, प्रथम वर्ष (बी.कॉम.)

## बापाचं दु:ख...



बाप नेहमीच कष्टात असतो,
परिस्थितीशी झगडत असतो,
मुलांना आनंद देण्यासाठी
जिवाचं रान करत असतो
पण आहे का जाण मुलांना याची,
बापाला थोडं का होईना सुख देण्याची,
आई म्हणजे माता, आई म्हणजे माऊली,
मग तो का नाही, दाता तो का नाही ?
चूक केवळ एक त्याची की तो नाई आई,
त्याला नाही मन, त्याला नाही भावना
आईवर कित्येकांनी पुस्तके लिहिली.
....पण बापाच्याच दु:खाला शब्दरुप देतांना
त्यांची शाई का संपली ?
उत्तर कुणाजवळ नाही या प्रश्नाचं
कारण बापाचं जीवन केवळ कष्टाचं...

– वैष्णवी आवारे, द्वितीय वर्ष (बी.कॉम.)



Scanned with CamScanner

# वाढती गुन्हेगारी आणि समाज

गचाले अर्चना बाळासाहेब

समाजातील बहुसंख्य लोकांवर मुठभर प्रवृत्तीच्या लोकांचे वर्चस्व असावे. सामान्य माणूस निर्भयतेने समाजात वावरतांना अडखळतो, सरळ आणि सहजतेने चालत असतांना ठेच लागावी. तसा स्वत:ची कमाई सुध्दा स्वतंत्रपणे उपभोगण्याचे स्वातंत्र्य त्याला नसावे? रात्रीची शांत झोप घेण्याचे धाडस त्याच्यात नसावे, अशी अवस्था माणसाची जर कुणी केली तर ती समाजातील वाढत्या गुन्हेगारीने. मग ती खुनाच्या स्वरुपात असेल, दरोडा, लूटमार, भ्रष्टाचार, अन्याय या स्वरुपातील असेल ही सर्व गुन्हेगारीची उदाहरणे आहेत.

अशा या वाढत्या गुन्हेगारींची अनेक कारणे आहेत. बेकारी, भौतिक सुखाची लालसा, समाजात होत असलेल्या नीतिमूल्यांचा ऱ्हास. राजकारण कमीत कमी श्रमात अधिकाधिक मोबदला मिळवून सुखी बनण्याची प्रवृत्ती, दहशतवाद आणि तरुणांमध्ये दिवसेंदिवस कमी होत चाललेली राष्ट्रभक्ती ही सारी कारणे समाजातील वाढत्या गुन्हेगारीला प्रवृत्त करणारी आहेत असे मला वाटते.

भारत हा लोकशाही प्रधान देश आहे. भारतात लोकशाही शासन प्रणाली आहे. ही एक सामाजिक सहजीवनाची पध्दती आहे. एखाद्या कुटूंबातील लोक जसे आपुलकीने आणि गुण्यागोविंदाने राहतात. त्याप्रमाणे समाजाने गुण्यागोविंदाने रहावे तरच तिला खरी लोकशाही म्हणता येईल. लोकशाही यशस्वी होण्यासाठी ती ज्या तिपाईवर उभी आहे. ती म्हणजे स्वातंत्र, समता, बंधुता ही तत्वे तर लोकशाही प्रधान समाजात रुजलेली असतील, तर तो समाज सुखाने राहू शकतो.

आज देशाला स्वातंत्र्य मिळवून पासष्टहून अधिक वर्षे उलटली, पण जगातील सर्वात मोठ्या लोकशाही प्रधान देशात खऱ्या अर्थाने सहजीवन दिसत नाही. त्याचे कारण लोकशाहीचे रक्षण करणारे तीन रक्षक खऱ्या अर्थाने सक्षम झाले नाही. ते म्हणजे शासन न्यायव्यवस्था, राजकारण. ब्रिटीश काळात राजसत्ता होती. त्यामुळे शासनाचा समाजातील दृष्ट प्रवृत्तीवर वचक होता. म्हणून गुन्हेगारीवर तोंड काढू शकत नव्हती. अधिकारी वर्ग लाचलुचपती पासून दूर होता. त्याला एक प्रकारची शिस्त होती. आज शासन यंत्रणेत भ्रष्टाचार बोकाळल्यामुळे गुंडांना फावते आणि गुन्हे करण्याची प्रवृत्ती सातत्याने बळावते. एक गुन्हा करुन सहज मोकळे सुटता येते. हे समजल्यावर गुन्हेगार अधिक मग्रूर बनतात.

जी गोष्ट शासन यंत्रणेची आहे. तीच राजकारण्यांची. आज राज्यकर्ते सुध्दा आपल्या सत्तेच्या खुर्चीवर बसण्यासाठी गुंडगिरीचा आधार घेतात व निवडून येतात. निवडून आल्यानंतर हेच आपल्या सत्तेचा वापर करुन गुंडांना साथ देतात. आपल्या वजनाचा वापर करुन शासन यंत्रणेवर दबाव टाकून समाजात गुंडांना मोकळे रान करुन देतात. जेणेकरुन पुढील निवडणूक सहज जिंकता येते.



Scanned with CamScanner

# स्त्री जीवन

**सलादे सोनाली शिवाजी**, प्रथम वर्ष (बी.ए.)

स्त्री हे घराचे मांगल्य असते. स्त्रीचे जीवन हे संकटांनी भरलेले असते. आजच्या युगात स्त्रीची खूप प्रगती झाली आहे असे फक्त म्हणतात, पण प्रत्यक्षात असे नाही. आज सुध्दा मुलगा हा वंशाचा दिवा असतो म्हणून मुलगा जन्माला आला का सर्वांना फार आनंद होतो, पण मुलगी जन्माला येते तेव्हा का होते दु:ख. स्त्रीयांना घरात खूप काम करावे लागते. सूर्य उगवतो तेव्हा तीचे काम सुरु होते. पण सूर्य मावळतो तरी तीचे काम संपत नाही. स्त्रीयांना आज सुध्दा घराच्या बाहेर पडायचे असेल, तर तिच्यावर काही बंधने लावलेले असते. मुलींना जास्त शिकू दिले जात नाही. ज्यांना शिकविले जाते,त्यांना नोकरीसाठी बाहेर पाठवले जात नाही. सर्वच क्षेत्रात मुलगी पुढे असून देखील त्यांना मुलापेक्षा मान-सन्मान कमी दिला जातो. मुलगी प्रत्येक क्षेत्रात काम करु शकतात तरी देखील का मुलगा पाहिजे ? सध्याच्या युगात स्त्रीभ्रूण हत्यामुळे मुलीचे प्रमाण कमी होत आहे. मुलगी जन्माला येण्याआधीच तिची हत्या का केली जाते ? असे का केले जाते. मुलगा व मुलगी यांच्यामध्ये का केला जातो भेदभाव ?

----***----

मागील पानावरुन - बिहारमधील राजकारण आणि गुंडगिरी हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. भारतीय न्याय व्यवस्थेवरसुध्दा ब्रिटीश न्याय व्यवस्थेची छाप असल्याने तत्वप्रणाली जर चांगली असली तर अनेक गुन्हेगार पुराव्य अभावी अथवा कायद्यातच युक्त्या लढवून सहज कायद्याच्या कचाट्यातून बाहेर येऊ शकतात. एकंदरीत भारतात खरी लोकशाही नांदायची असेल तर...

१) भारतीय कायदा न्यायव्यवस्था यांचे पुन्हा एकदा विश्लेषण करणे. काळानुसार त्यात बदल करणे आवश्यक आहे.

२) भारतीय लोकशाहीत निवडणुका अतिशय योग्य रितीने होणे आवश्यक आहे.

३) योग्य अशा व्यक्तीस निवडून द्यावे, जेणेकरुन ती व्यक्ती समाजातील वाढत्या गुन्हेगारीस आळा बसवेल.

## क्यू ना हम स्वच्छ भारत निर्माण करे....



क्यू ना हम एक स्वच्छ निर्मा
एक स्वच्छ भारत निर्माण करे
भारत माता को एक उपहार ३
एक स्वच्छ भारत निर्माण करे
परीवर्तन की इस डोर का
क्यू ना हम एक हिस्सा बने
आओ मिलकर
एक स्वच्छ भारत निर्माण करे ॥२॥
भारत को हम कहते है माता
इसका जरा खयाल करे
फिर क्यू इस माता के
आंचल को कूडे से खराब करे ॥३॥
आओ मिलकर एक स्वच्छ भारत निर्माण करे

- घोंगे रेणुका विष्णु , तृतीय वर्ष (बी.कॉम)

# आई....

पाटील ऋषिकेश कैलास, प्रथम वर्ष (बी.ए.)

''आई माझी मायेचा सागर, दिला तिने जीवनाला आकार....' आई ! खरंच काय असते आई ? एकमेव स्त्री जी आपला चेहरा बघायच्या आधीपासून आपल्यावर प्रेम करते. नऊ महिने ओझे वाहून आईच्या उदरातून इवल्याशा जीवाचा जन्म होतो. अगदी जन्मापासून ते स्वतःच्या शेवटच्या क्षणापर्यंत ती बाळाला जपत असते. बाळासाठी आळणी, खारट खाणारी आपल्या भाव-भावनांना आवर घालणारी अन् सुंदर जगाचे दर्शन घडवणारी आई. म्हणतात ना टाकीचे घाव सोसल्याशिवाय देवपण येत नाही. त्याचप्रमाणे आई झाल्याशिवाय आई काय असते ते कळत नाही. आई आत्मारुपी ईश्वर, आत्मा आणि ईश्वर यांचा मिलाप म्हणजे आई. प्रेम, माया, ममता, करुणा, दया यांचा अमाप भांडार म्हणजे आई. आईची आठवण यायला आईला कधी विसरायला हवं तर ना.. क्षणोक्षणी, पावलोपावली आठवते ती आई. आई अन् बाबा एकाच घरट्यातच विसावलेले दोन जीव; ,परंतु हृदयाच्या कप्प्यात खोलवर घर करुन राहणारी माऊली. कुठे थोडं खरचटलं, लागलं तरी सहज तोंडातून येणारा शब्द 'आई गं !

आईच्या पदराला धरुन चालणारी मुलगी केव्हा मोठी होते. हे आईला समजत ही नाही. लाडाकोडाने वाढवलेल्या मुलीवर आई योग्य संस्कार करते. प्रेम देते, वेगवेगळे पक्वान्न शिकविते, शिकवताना, समजावताना रागावते, मारते, चिडते, परंतु तितक्याच मायेने जवळही घेते. माहेरचा उंबरठा ओलांडून लग्न झाल्यावर मुलगी सासरच्या उंबरठ्यावर प्रवेश करते. आईने दिलेली शिदोरी घेऊनच. त्यामुळे कुठलीही अडचण दिला सासरी येत नाही. ज्याप्रमाणे नदी वाहत जाऊन सागराला मिळते. नदीच्या पाण्याबरोबर सांडपाणी, निर्माल्य वाहून जाते. त्याचप्रमाणे सासुरवाशीण मुलगी आपले सुख, दुःख, मनातील इच्छा-आकांक्षा सर्व आईला सांगते.

दुधापेक्षा जास्त दुधावरची साय प्रिय वाटते तसे अगदी खरं अनुभवलंय मी. माझ्या मुलींना मारलेलं, बोललेलं अजिबात आवडत नव्हतं. मला असं म्हणणारी ती म्हणजे आई होय. माझी आई परमेश्वरा एक सांगू तुला ? म्हणतात ना, आई जन्माला नाही पुरत, नाही हो समजलं मला तिने केलेल संस्कार, तिने केलेली माया, तिने दिलेली शिकवण सगळी शिदोरी आहे माझ्याकडे; परंतु परत तुला विचारते परमेश्वरा सर्व काही सुख सोयी देऊ नको, काही अपुरं राहू दे, पण कुणाचीही आई मात्र जास्त लवकर बोलावू नकोस. तुझ्याकडे गेलेली मूर्ती प्रत्यक्षात दिसत नाही. खूप शोधली तरी नाही दिसत. खूप बोलावसं वाटत. खूप काही मनात साठलेलं ठेवून रडावसं वाटतं. फक्त एकदा परमेश्वरा, फक्त एकदाच पाठवशील का माझ्या आईला माझ्याकडे भेटायला.....

----***----



Scanned with CamScanner

# बाप ....

चौरे वृषाली रंगनाथ, तृतीय वर्ष (बी.ए.)

बाप, वडील, पप्पा, डॅडी फक्त लिहायला, बोलायला... पण आपण प्रत्येकजण सहजपणे नेहमी जाणून बुजून शब्द उच्चारतो तो म्हणजे (बाप) होय. त्याच बापाविषयी थोडेफार....

आई घरात मांगल्य असते. तर बाप घराचं अस्तित्व असतो. घराच्या या अस्तित्वाला खरंच आम्ही समजून घेतल आहे का ? वडीलांना महत्त्व असूनही त्याच्याबद्दल जास्त बोलले जात नाही. लिहिलं जात नाही. कोणत्याही व्याख्यानात त्यांच्याविषयी जास्त बोलत नाही, पण कोणत्याही व्याख्यानांत आई विषयी जास्त बोलत राहतो.

संत महात्म्यांनी आईचंच जास्त महत्व सांगितले आहे. चांगल्या गोष्टींना आईचीच उपमा दिली जाते. पण बापाविषयी कुठेच फारचे बोलले जात नाही. काही लोकांनी बाप रेखाटला, पण तोही तापट, व्यसनी, मारझोड करणारा, समाजात असे बाप एक, दोन टक्के असतीलही पण चांगल्या पिताबद्दल काय ? चांगल्या वडिलांबद्दल काय ?

आईकडे अश्रूचे पाट असतात, तर बापाकडे संयमाचे घाट असतात. आई रडून मोकळी होते, पण सांत्वन वडीलांनाच करावे लागते. आणि रडण्यापेक्षा सांत्वन करणाऱ्यावरच जास्त ताण पडतो. कारण ज्योतीपेक्षा समईच जास्त तापते ना ? पण श्रेय नेहमी ज्योतीलाच मिळते. रोजच्या जेवणाची सोय करणारी आई, आमच्या लक्षात राहते, पण आयुष्याच्या शिदोरीची सोय करणारा बाप आम्ही किती सहज विसरुन जातो. आई रडते पण, वडिलांना रडता येत नाही. स्वत:चा बाप वारला तरी रडता येत नाही. कारण छोट्या भावंडांना जपायचं असत आई अर्ध्यावरच सोडून गेली. बहिणींना आधार व्हायचं असत, पत्नी अर्ध्यावरच सोडून गेली, पोरांसाठी अश्रूंना आवर घालावा लागतो.

जिजाबाईनी शिवाजी घडवला असे अवश्य म्हणाल, पण त्यावेळी शाहाजी राजांची ओठताण सुध्दा लक्षात घ्यावी. देवकी, यशोदेचे कौतूक अवश्य करा, पण पुरातून डोक्यावरुन मुलाला घेवून जाणारा वासुदेव लक्षात ठेवावा.

राम कौशल्याचा पूत्र अवश्य असेल, पण वियोगात तडपून मेला तो दशरथ होता. वडिलांच्या टाचा झिजलेल्या पाहिल्यावर त्याचं प्रेम कळतं, त्यांची फाटकी बनियान पाहिली की, कळतं की, त्यांच्या नाशिबाची भोंक त्यांच्या बनियानला पडली. त्यांच्या दाढी वाढलेला चेहरा, फाटका सदरा दाखवते, मुलीला गाऊन घेतील, मुलाला लुंगी घेतील पण स्वत:मात्र जुनी पॅन्ट वापरायला काढतील. मुलगा सलूनमध्ये २०-३० रु. खर्च करेल, पण त्याच घरातला बाप साबण संपला म्हणून अनेकदा दाढीसाठी आंघोळीचा साबण वापरतो.

बाप आजारी पडला की, लवकर दवाखान्यात

जात नाही.

तो आजाराला मुळीच घाबरत नाही. पण डॉक्टर महिनाभर आराम करायला सांगतील याची त्याला भिती वाटते. कारण पोरीच लग्न, पोराचे शिक्षण असते. ऐपत नसते. तरी पोराला, पोरीला मेडीकल/इंजिनियरिंगला ॲडमिशन मिळवून दिले जाते. ओढताण करुन त्याची पोरं पैसे उडवतात. पण सर्वच नसली, तरी काही मुलं अशी असतात की, तारखेला पैसे येताच मित्रांना परमीटरुममध्ये पार्ट्या देतात. आणि ज्या बापाने पैसे पाठवले त्याच बापाच्या नावाने एकमेकांना हाका मारतात. वडिलांची टिंगल करतात.

ज्या घरात बाप आहे त्या घराकडे कुणीही वाईट नजरेने पाहत नाही. कारण कर्ता जिवंत असतो. तो जरी काही काम करीत नसला तरी तो त्या पदावर असतो.

घरातील इतरांचे कर्म बघतच असतो. वडिलांना खऱ्या अर्थाने समजून घेते ती त्या घरातील मुलगी. सासरी गेल्यावर अथवा घरापासून दूर असलेल्या बापाशी फोनवर बोलतांना बदललेला आवाज लगेच कळतो.

ती लगेच प्रश्न विचारते. बाप म्हणतो तेव्हा आपल्या इच्छा बाजूला ठेवून लग्नाच्या बोहल्यावर चढते. मुलगी वडिलांना जाणते, जपते. इतरांनीसुध्दा आपल्याला जाणावं, जपावं हीच बापाची किमान अपेक्षा असते.

----***----

## श्रध्दांजली....

ज्या बापाला म्हातारपणात
आधार म्हणून काठी नाही दिली
त्या बापाला आज तुझी **श्रध्दांजली...**

ज्या बापाला जितेपणात
तु शिवीगाळ अर्पिली
त्या बापाला आज तुझी **पुष्पांजली....**

ज्या बापाला मिरची भाकरही
पोटभर मिळाली नाही
त्याच्या श्राध्दाला तू
गोड धोड पंगत दिली

ज्या बापानं फाटक्या
तुटक्यावर दिवस काढले
त्या बापाच्या प्रेतावर तू
नवे वस्त्र अर्पण केले

ज्या बापानं कधी तीर्थक्षेत्र
नाही पाहिले
त्या बापाची अस्थी
तू गंगेला वाहिली.

धन्य तो पिता आणि धन्य त्याचा पुत्र
कधी काही कमविले नसेल त्याने
पण हे जग तुला दाखविले मात्र.

# आयुष्यातील गुरूचे महत्त्व

पवार पुजा राजेंद्र, द्वितीय वर्ष (बी.ए.)

'विद्या नाम नरस्य, नरुपम्धिकम् विद्या विहिन:पशु'

माणसाचं पशुत्व जायचं असेल तर विद्या ही हवीच. विद्या हीच माणसाची खरी ओळख आहे. त्यासाठी गरू हवाच. मानवेत्तर प्राण्यांमध्ये नसलेलं नातं 'गुरू-शिष्य', इतर प्राण्यांना एकमेकांना शिकवताना कुणी पाहिलयं ? ज्ञान, कला, अनुभव यांचे आदान प्रदान फक्त मानवातच म्हणूनच मानवाच्या जीवनात गुरूचे अपार महत्त्व आहे.संत ज्ञानेश्वर गुरूचा महिमा विषद करताना म्हणतात.

गुरू हा संत कुळीचा राजा ।
गुरू हा प्राण विसावा माझा ॥
गुरू वीण देव दूजा । पाहता नाही त्रिलोकी ॥
गुरू हा धैर्याचा मेरु । कदाकाळी डळमळीना ॥

देह पिता देतो, संस्कार गुरू करतो म्हणूनच जगज्ञेता सिकंदर सगळ्यात जास्त महत्त्व आपल्या गुरूला देतो. ॲरिस्टॉटलला देतो. संत कबीर तर परमेश्वरापेक्षाही गुरूला श्रेष्ठ मानतात. सुगंधामुळे फुलाकडे लक्ष जाते. किरणांमुळे सूर्य भासमान होतो. त्याचप्रमाणे गुरूमुळे आपल्या आयुष्याला अर्थ लाभतो. एक गुरू आपल्या शिष्याचे ज्ञानभांडार वाढवत असतो. तो तर ज्ञानाचा अफाट समुद्रच असतो, परंतु ज्ञानदानाबरोबरच तो आपल्या शिष्याची अगदी आईप्रमाणे काळजी घेतो. गुरू शिष्याचे नेहमी भलचं चिंततो. श्रीसमर्थ म्हणतात 'जसा सूर्यामुळे अंधार दूर होतो, तसा गुरूमुळे ज्ञानाचा अंधार दूर होतो.' मुक्तीची वाट गुरू दाखवतो. गुरू आपल्या शिष्यासाठी सौभाग्याचेद्वार खुले करुन देतो. गुरू ज्या क्षेत्रात पारंगत आहे. त्या क्षेत्रातील ज्ञान तो समर्थपणे आपल्या शिष्याला देवू शकतो. तो समोरच्या विद्यार्थ्याचे वय, त्याची समजूत, बौध्दिक पातळी, मानसिकस्थिती, संस्कार त्याच्या भोवतालची परिस्थिती याचा विचार करुन न कळत ज्ञानाची गोडी लावत त्याची आवड निर्माण करतो. तो शिष्याच्या सुप्त गुणांची त्याला व इतरांना ओळख करुन देतो. गुरू शिष्याच्या चौफेर विकासाची काळजी घेतो. गुरुची शिकवण नेहमीच आपल्या उपयोगी येते. जसा वाल्मिकीचा आदर्शवाद, व्यासांचा व्यवहारवाद, वेदांची शिकवण हे आज अनंत काळानंतरही आपल्या उपयोगी पडते आहे. अशा प्रकारे गुरू अनंत काळचा वारसा देवून लघुत्व घालवतात. 'सा विद्या या विमुक्तये' हे त्यांचे ब्रीद वाक्य असते. ते जुनी मूल्ये जपतात आणि नवी आव्हाने पेलत शिष्यात स्फुल्लिंग पेटवतात. गुरू हे मानवतेच मूळ स्थान आहे. गुरू म्हणजे माणसाच्या विकासाचे रहस्यच आहे.

ह्या जगात गुरूविणा जगणे अशक्यच आहे. माणसास जसे प्राणवायूच्या अभावाने मरण येते. तसेच गुरूच्या अभावी मानवी प्रगती खंडीत होते. गुरूविना मनुष्य म्हणजे जणु आत्म्या विना देह. सूर्याविना सृष्टी आणि आईविना लेकरु, गुरु नसल्यास आपल्या आयुष्यात काही अर्थ राहणार नाही. गुरू शिष्याचे नाते काही वेगळेच असते. शेवटी मी एकच म्हणेन आत्मज्ञानाचा अग्नी देऊन जन्मात साठलेले कर्मरुपी इंधन जाळून टाका. तो त्या श्रीगुरुंना नमस्कार

गुरुविना ज्ञान नाही । गुरुविना विद्या नाही ॥

# एकाच नाण्याच्या दोन बाजू.... सुख - दुःख

**सरला सोनवणे**, प्रथम वर्ष (बी.ए.)

आयुष्य जगायला सुखाबरोबर दुःखही हवेच असते. कारण म्हणतात ना 'दुःखाची चव चाखल्याशिवाय सुखाचे मध मिळत नाही.' आणि का नसावे आयुष्यात दुःख, दुःख हे असायला हवे. नाहीतर आयुष्य जगण्याला काहीच अर्थ नाही. आपल्याला जीवनाचा कधी अर्थच कळणार नाही. आयुष्याच्या या वाटेवर दुःखाचे काटे, अवघड खड्डे आणि दुःखाचा भार सहन करण्याची ताकद असावी. त्यातूनच प्रत्येकाला आयुष्याच्या सुखाची किंमत कळते. ह्या सुख दुःखाच्या खेळात वेळेलाही मोलाचे स्थान आहे. कारण दुःखाच्या वेळेस दुःखालाच महत्त्व दिले पाहिजे आणि सुखाच्या वेळेस हसत खेळत जगले पाहिजे म्हणतात ना.

रात्र नाही, स्वप्न बदलते,  
दिवा नाही, वात बदलते,  
मनात असू द्या,  
नेहमीच जिंकण्याची आशा  
कारण नशीब बदलो ना बदलो,  
पण वेळ नक्कीच बदलते.

म्हणजेच सुख-दुःखा इतकेच वेळेलाही महत्व दिले पाहिजे. सुखाच्या मागे पळण्यापेक्षा आयुष्यातील दुःख शोधण्याचा प्रयत्न केला पाहिजे. सुख आपोआपच आपल्या आयुष्यात धावत येईल. दुःखातील काटे, हीच सुखाची फुले आहे.

'आयुष्यात पैसा हा नक्की हवा, पण पैशात आयुष्य नको.' कारण पैशात आयुष्य असले की, सुख आपल्यापासून दुरावते त्यामुळे सुखासाठी का होईना पैशाच मोह टाळा, दुसऱ्याच्या आयुष्यात कधीही दुःख देवू नका. अभिमानी होवू नका, पण आयुष्यात सुख मिळविण्यासाठी स्वाभिमानी अवश्य रहा. त्यामुळे आयुष्यातील मोजमापाच्या पारड्यात सुख आणि दुःख ही पारडे नेहमी समान ठेवा. सुख तुमच्या मागे धावतच येईल.

त्यामुळे आयुष्यातील मोजमापाच्या पारड्यात सुख आणि दुःख ही पारडे नेहमी समान ठेवा. सुख तुमच्या मागे धावत येईल.

'सवय आहे हसण्याची हीच तर एक कला आहे दुःख लपविण्याची' आपण नेहमीच सुखाच्या मागे धावतो, मात्र दुःखाला नेहमी घाबरतो. नेहमीच दुःखाच्या नावाने बोट मोडतो. दुःखात आपल्या वाट्याला असेल थोडे सुखंही आपण गमावून बसतो. 'कोऱ्या कागदावरचा बिंदू आपल्याला दिसतो, मात्र संपूर्ण कोरा कागद आपल्या समोर असूनही तो आपल्याला दिसत नाही असे का ? कारण....

'दुःखाचे सावट तोच सुखाचा आधार,  
दुःख नाही वाट्याला तेथे सुखाचा अभाव.''

----***----

# भूक.....

प्रा. सोमनाथ फुगट (मराठी विभाग प्रमुख)



तीन-चार दिवस झाले, पण हा पाऊस थांबण्याचं काही मनावरच घेईना ! जणू काही साऱ्या गावावर त्यानं आपल्या हुकूमतीचं साम्राज्य प्रस्थापित केलं की काय ? असेच मनाला वाटत होते. ह्या पावसाच्या पाण्याचा साऱ्या गावभर पानजंजाळ झाला होता. त्यामुळे गल्लीबोळात साधे कुत्रही दिसेना ! सगळेच्या सगळे अपाल्या खुराड्याला विसावली होती. एखाद्या झोपड्यातून म्हाताऱ्याच्या खाकरण्याचा आवाज येत होता. बाकी एखाद्या लहान मुलानं आईला पारखे व्हावे, तसे चार दिवसापासून सारे गाव सूर्याच्या दर्शनाला पारखे झाले होते. नदी, नाले दुथडी भरुन वाहत होती. हातमजुरी करुन पोट भरणाऱ्या ह्या गावाला पावसाने अगदी वैतागून सोडले होते.

गावकुसाला असलेले भिवा वेताळाचं, चिपटानं शेकारलेलं झोपडपण एवढ्या पावसाच्या तडाख्यात गळायला लागलं होतं. घरातली भांडी साऱ्या झोपडीभर पसरली होती. अन् भिवा रात्रीच्या गस्तीने जांभाळी देत कांबळ्यात अंगाची मुटकुळी करुन झोपला होता. तर लहान्या सखुनं भुकेच्या आकांताने टाहो फोडला होता. नजर कमी झालेली, कंबरेत वाकलेली भिवाची आई रखमा झोपडीच्या बंद कवाडाजवळ बसली होती. आणि भिवाची बायको चांगुना सहा महिन्याच्या तान्ह्या बाळाला मांडीवर घेवून चुलीच्या आळ्यातल्या गवऱ्या पेटवित होती. सखूचे रडणे ऐकून भिवा एकदम बायकोवर खेकसला.

'अगं ये भवाने, त्या पोरीला काही खायला दे कि.... ?'

रडक्या आवाजात चांगुणा बोलू लागली.

'काय देवू खायला... चार दिवसापास्न हा मेला उघडायचं नाव घेईना ! घरात होत नव्हत सारे संपले...! पसाभर दाणे भी नाय शिजवायला.

बायकोच्या डोळ्यात तरळलेलं आसवांचे आभाळ पाहून भिवा बेचैन झाला. अणि ताडकन उठून झोपड्याच्या बाहेर आला. शिवारभर त्याची नजर गरगर फिरु लागली. चार-पाच शेतापलिकडे राघूच्या शेतातले मक्याचे पिक दिसले. मागचा पुढचा विचार न करता शेत तुडवित भिवा मकईच्या दिशेने निघाला. आजूबाजूच्या काही शेतांनी नाल्याचे रुप धारण केले होते. भिवा राघूच्या शेतातली मकईची कणसं घेवून आला. अन् बायकोसमोर टाकत म्हणाला.



Scanned with CamScanner

'ही कणसे भाजून घाल पोरीला... अन् तुमीपण खावा.' म्या जरा चावडीकडं जावून येतो.

भिवाची आई भिंतीचा आधार घेत बोलू लागली.

आता या अशा वक्ताला काय काम हाय चावडीवर बाबा....'

शिवारभर पसरलेल्या पावसाच्या धुक्याला न्याहळत भिवा बोलू लागला. रातच्या पोटापाण्यासाठी पाटलाकडून काही दाणं घेवून येतो. काळुळतीच्या स्वरात आई म्हणाली.

'पर लवकर घराला ये बाबा ! यळकाळ काही चांगला दिसत नाय.'

भिवा काठी आणि घोंगड घेवून झोपडीबाहेर पडला, अन् रस्त्याचा चिखल तुडवत गावाकडची वाट चालू लागला. चिखलातून पाय वढ्त वढत भिवा वाण्याच्या दुकानासमोर आला. दाराची कडी वाजवली. आतून आवाज आला.

'कोण हाय ?'

'म्या हाय... शेठजी !'

'अरं म्या पर कोण ! काही नाव-गांव हाय का न्हाय !'

'म्या शेठजी, भिवा यताळ हाय.'

भिवा वेताळाचं नाव ऐकताच वाण्याच्या कपाळावर आढ्यांचे जाळे पसरले. दाराची आर्धी फळी उघडत वाण्यानं विचारलं.

'काय रं... भिव्या .... काय क़ाम काढलं एवढं पावसापाण्यात !'

भिवाने हात पसरुन विनवणीच्या स्वरात सांगितले.

'शेठजी चार दिस झालया, या पावसानं साऱ्यास्नी जेरीस आणलय बघा..' 'कुठं कामधंद्यालापण जाता येत न्हाय !' कारभारनीनं सकाळपास्न डोस्कं खालया... घरात अन्नाचा एक दाणा न्हायं ! तव्हा म्हणलं, शेठजी शेरभर तांदूळ द्या... चार-पाच दिसात म्या तुमचं पैकं चुकतं करीन... गळ्याशपथ सांगतो.'

'अरं... पण भिव्या चार-पाच दिसापास्न म्याच दुकानीत माल भरला न्हाय की, तालुक्यालापण गेलू न्हाय.'

भिवानं वाण्याकडं रागानं पाहिलं आणि पाण्यात काठी आपटत तो चावडीच्या रोखाने निघाला. पावसाच्या माऱ्याने भिवाच्या डोक्यावरचं घोंगड पुरतं ओलं झालं आणि त्या घोंगड्याबरोबर तोही ओलाचिंब झाला होता.

चावडीच्या वाटेनं असलेल्या दारुच्या गुत्त्याजवळ सखारामनं भिवाला आवाज दिला, पण भिवाचं त्याकडं लक्षच नव्हतं ! त्याच्या डोळ्यासमोर फक्त दिसत होती ती भूकेच्या आकांताणं रडणारी सखू, डोळ्यानं आंधळी झालेली आई आणि आपल्या वंशाचा दिवा पोटाशी धरुन चुलीच्या आळ्याजवळ बसलेली बायको चांगुणा ! पावसाचा जोर चांगलाच वाढला होता. सगळीकडं धुकं पसरल्यागत पावसाची सर कोसळत होती. भिवा तोंडावरुन वघळणारं पावसाचं पाणी निपटीत चावडी जवळ करीत होता. गावाच्या मधोमध असलेली चावडी दिसताच भिवाचा चालण्याचा वेग वाढला. चावडी समोरच्या अंगणात उभं राहून भिवानं आरोळी मारली.

'पाटील... ओ पाटील....!'



Scanned with CamScanner

माडीवरुन आवाज आला

'कोण हाय ?'

आवाजावरुन तो चावडीवर काम करणारा दिवाण वाटत होता.

भिवा म्हणाला

'म्या हाय... भिवा यताळ.',

दिवानानं खिडकी उघडली... भिवाच्या चेहऱ्याला नेव्हाळत विचारलं

'का ऽऽ रं भिव्या,' 'काय काम काढलया या वक्ताला...!'

हातातली काठी पाण्याशी खेळवत भिवा बोलू लागला.

'धन्याकडं काम हाय..!'

दिवानानं खुनसी नजरेनं पाहात विचारलं

'काय काम हाय...!'

भिवा अंगणातल्या गढूळ पाण्यात स्वत:ला न्याहाळण्याचा प्रयत्न करीत बोलला,

'धन्याला सांगा की, पायली-दीडपायली दाणं भेटलं तर खूप उपकार व्हतील ह्या भिवा यताळावर...!' 'सकाळपास्न पोरीच्या पोटात अन्नाचा कण न्हाय...''सारं घरच भाकरीच्या तुकड्याला पारखं झालया...'

दिवाण दिनवाणी चेहऱ्यानं बोलू लागला.

'पर भिव्या', 'पाटील तर सकाळच्यालाच तालुक्याला गेलया !'

अन् दाण्याचं ऐव्हार तेच बघत्यात.' 'पाहिजीतर पाटील साहिबास्नी तुझा निरुप देतो.'

भिवाला बुचकाळ्यात पडल्यासारखं झालं, तो परत फिरणार तितक्यात भिवाल दाराच्या उंबऱ्याबाहेर पाटलाच्या वाहना दिसतात. भिवा वेताळाची तळपायाची आग मस्तकाला जाते. रागाने तो खिडकीत उभ्या असलेल्या दिवाणाकडं पाहतो आणि तरातरा चावडीच्या पायऱ्या उतरुन घराची वाट चालू लागतो.

इकडं घराच्या दारात चांगुना पावसाच्या धुक्यात भिवा येण्याची वाट पहात असते. भिवा दिसताच तिच्या चेहऱ्यावर हसू झळकतं, पण रिकाम्या हाती पाहताच पावसाच्या पाण्यात निथळून आलेल्या आपल्या दादल्याला विचारते.

'काय वं....!' चावडीवर गेल्ता ना !'

भिवा चवताळल्यावानी बोलू लागला.

'व्हय गेल्तो.... पर आपल्यासारख्या गरीबास्नी कोणी वाली न्हाई, त्या भुताटकीच्या चावडीवर !'

भिवाचा चेहरा आता रडकुंडीला आला होता.

'चावडीवर गेल्तो.... तर म्हणं पाटील तालुक्याला गेलाय.' 'खूप विणवण्या केल्या... हातापाया पडलु, पर कशाचाच उपेग झाला न्हाय.'

'आगं मांजराच्या जातीवाणी दडून बसलाय घरामधी !'

आता भिवानं पावसासारखचं रौद्ररुप धारण केलं होतं.

'म्या काही त्याकडं दाण्याचं पोतं नव्हतं मागितलं... ' 'पायली दीडपायली दाणंच मागितलं व्हत की ?' 'त्येपण माझ्याच कष्टाचं!' दोन दिस आगुदर घेतुया एवढंच...!' 'आन् तो वाणी साला भडवीचा दुकानीत तांदूळ असूनपण न्हाय दिलं... बघुन घेईन साऱ्यास्नी....!'

असं म्हणून बाहेर कोसळणाऱ्या पावसाला शिव्याशाप देत भिवा घुडघ्याची मुटकुळी करुन बसला



Scanned with CamScanner

होता. पावसाबरोबर साऱ्या गावंभर अंधाराचे सावट पसरु लागलं... अंधार वाढू लागला, अन् गावतल्या झोपड्यामधल्या पणत्या, दिवे एकएक करत भरपावसात चांदण्याच्या आभाळासारखे भासू लागले. बराच वेळ भिवा तसाच बसून होता. भिवानं गावाच्या दिशेने नजर भिरकावली....

आता झोपड्यांमधल्या पणत्या, दिव्याची मालवण सुरु झाली होती. अन् भिवाच्या डोक्यात वेगळ्याच विचारानं थैमान घातलं. त्यानं एकवार सगळ्यांचे चेहरे नेव्हाळले, साऱ्यांची चेहरे कोमजली होती. रखमानं सखुला पोटाशी घेवून जमिनीला फथुरलीवर अंग टाकलं होतं, तर चांगुना तान्ह्याला थोपटीत कसला तरी विचार करत होती, भिवा ताडकन् उठाल आन् गस्तीवरील कुऱ्हाड घेत तो झोपडी बाहेर पडला. कुपाटीचा आसरा घेत घेत तो वाण्याच्या दुकानासमोर आला. सगळीकडं अंधारच अंधार पसरला होता. पाण्याच्या डबक्यातून डराव ऽऽ डराव करणारा बेडकांचा आवाज मनात भिती निर्माण करत होता. विजांच्या कडकडाटात भिवाच्या हातातली कुऱ्हाडीचं पातं लखलख चमकत होतं. भिवानं आजुबाजूचा सुगावा घेत वाण्याच्या दाराला आतल्या बाजूनं लावलेलं जात्याच्या तळीचं आडकनं बाजूला केलं आणि उखळाजवळ ठेवलेलं तांदळाचं बाचकं पाठीशी टाकून तो घराला आला. चांगुणाला सांगून आल्या पावली पाटलाच्या माळावर गेला.

पाटलाच्या माळावरची गडी माणसं गाड झोपलेली होती. भिवानं गोठ्यात बांधलेलं बोकड काखेत आवळलं आणि तेथून पळ काढला..' पण बोकड्याच्या आवाजाने माळावरची कुत्री जागी झाली... कुत्र्यांनी भुंकून भुंकून सारा माळ जागा केला.... सारी मंडळी चोरऽऽ चोर म्हणत भिवा गेला त्या दिशेने काठ्या-कुऱ्हाडी घेवून पळू लागली. पण भिवा खूप दूर आला होता. पण कुत्र्यांनी त्याचा पाठलाग सोडला नव्हता. भिवा एका हातात कुऱ्हाड तर दुसऱ्या काखेत बोकड घेवून पळत होता. अन् कुत्री कधी हाताचे तर कधी पोटरीचे लचके तोडत होती. कसाबसा भिवा कुत्र्यांच्या तावडीतून सुटून घराला आला. शरीरभर झालेल्या जखमापेक्षा झोपडीतली आई आणि बायको-पोर यांची भूकच भिवाला अधिक यातना देत होती.

झोपडीत येताच भिवानं विळ्याच्या धारेखाली बोकडाचं मानगूट धडावेगळं केलं. भिवाच्या बायकोनं मास पातेल्यात शिजावला चुल्यावर ठेवलं. अन् साऱ्या घरादारानी भात आणि मासांच्या कालवणावर ताव हाणला.

दुसऱ्या दिवशी वाण्यानं भिवानं तांदूळ चोरल्याची बोंब ठोकली अन् पाटलाला घेवून तो भिवा वेताळाच्या दारात उभा ठाकला. पाटलानंपण आपल्या माळावरचा बोकड चोरल्याचा आरोप भिवावर लावला. पाटलानं तालुक्यावरुन पोलीस हवालदार बोलविलं, पोलीस आले, भिवाच्या घराची झडती घेण्यात आली. झडतीत बोकडाचं मांस आणि एका बाचक्यात असलेला तांदूळ सापडला. भिवा वेताळानं चोरी केल्याचा आरोप सिध्द झाला आणि चोरीच्या गुन्ह्यात भिवाला एक वर्षाची जेल झाली.

----***----



Scanned with CamScanner

# आई....

वैष्णवी आवारे, प्रथम वर्ष (बी.कॉम)



एका गावामध्ये एक बाई आपल्या छोट्या मुलाबरोबर एका छोट्या झोपडीमध्ये राहत होती. आपल्या मुलाला काहीही कमी पडू नये म्हणून ती नेहमीच कष्ट करत असे, परंतु त्या छोट्या मुलाला आईबद्दल नेहमीच तिरस्कार वाटत असतो, कारण एका डोळ्याने ती विद्रूप दिसते, त्यामुळे तो तिला शाळेतही येवू देत नाही.

एकदा एका कार्यक्रमासाठी आईला शाळेत जावे लागते. पण तिला बघून कुठे तोंड लपवावे हे त्याला कळतच नाही. रागाचा एक कटाक्ष तिच्यावर टाकून तो तिथून पळून जातो. घरी आल्यावर तो आपल्या आईला प्रचंड बोलतो कशाला आली. होतीस शाळेत ? तुझं काय काम होत ? मी उद्या शाळेत कसा जावू ? आता माझे सर्व मित्र मला चिडवतील ? तुला एक डोळा का नाही ? मला तू अजिबात आवडत नाहीस, वगैरे वगैरे आई काहीही बोलत नाही. मुलगा रागाने धुमसत असतो. जेवण न करता तसाच झोपतो. आपण आईला इतके बोललो याचे काहीही वाटत नाही व तो आईशी न बोलताच झोपतो.

रात्री कधीतरी त्याला जाग येते. तेव्हा दबक्या आवाजात त्याची आई रडत असते, परंतु याचेही त्याला काहीच वाटत नाही.

एका डोळ्याच्या आपल्या आईचा त्याला खूप तिरस्कार वाटायचा. त्याने त्याक्षणी निर्णय घेतला. शिकून खूप मोठे व्हायचे आणि इथून बाहेर पडायचे. त्याप्रमाणे तो खूप अभ्यास करुन उच्च शिक्षणासाठी मोठ्या शहरात येतो.

मोठ्या नामवंत विद्यापीठातून पदवी मिळवतो. मोठ्या कंपनीत मोठ्या पदावर काम करु लागतो. एका सुंदर मुलीशी त्याचे लग्न होते. त्याला लग्नानंतर एक मुलगा व एक मुलगी होते आता मात्र त्याचे कुटूंब पूर्ण होते. कारण हे सुंदर चित्र बिघडवणारी त्याची आई मात्र तिथे नसते. तो तिला पूर्णपणे विसरुन जातो. अचानक एक दिवस घराचा दरवाजा वाजतो. दारामध्ये एका माणसाबरोबर तीच एक डोळ्याची आई उभी असते. तिला बघून त्याची मुलगी घाबरुन आत पळन जाते. तो आधी चक्रवतो आणि मग स्वत:ला सावरत तिला म्हणतो, कोण आहेस तू ? इथे का आलीस? बघ माझी मुलगी तुला घाबरली.

मी बहुतेक चुकीच्या पत्त्यावर आले असे काहीसे पुटपुटत आई निघून जाते. तीने आपल्याला नाही ओळखले म्हणून मुलगा दार लावून घेतो.




Scanned with CamScanner

काही दिवसांनी माजी विद्यार्थी संमेलनासाठी त्याला त्याच्या शाळेतून पत्र येते, परत त्या गावात जाऊ नये असे वाटत असतांनाही तो संमेलनाला जायचा निर्णय घेतो. ऑफिसच्या कामासाठी जातोय असे बायकोला खोटेच सांगतो. संमेलन पार पडते. परंतु कुठल्या तरी ओढीने त्याची पावले नकळतपणे झोपडीकडे वळतात. दाराला कुलूप असते. शेजारची बाई त्याला ओळखते, आणि एक पत्र देते. ते पत्र त्याच्या आईचे असते. तो वाचू लागतो.

मी खूप आयुष्य जगले. तुझ्याकडे आता मी परत कधीही येणार नाही. पण तू कधीतरी मला भेटावे अशी माझी खूप इच्छा आहे. शाळेच्या संमेलनात तू येणार हे मला कळाले होते, परंतु तिथे येवून तुला भेटायचे नाही असे मी नक्की ठरविले. कारण मला माहीत आहे. एका डोळ्याची ही तुझी आई तुला आवडत नाही. मला एकच डोळा का असेही तू मला अनेकदा विचारले होते. तेव्हा तू खूपच लहान होता म्हणुन मी काहीच उत्तर दिले नाही.पण आज सांगते बाळा तू लहान असताना एक अपघात झाला. त्या अपघातात एक डोळा तू गमावलास. एका डोळ्याने तू संपूर्ण आयुष्य कसे घालवणार या विचाराने मी हैराण झाले आणि माझा एक डोळा मी तुला दिला. मला खूप अभिमान आहे. तुझे माझ्यावर खूप प्रेम आहे असेच मी समजते.

कधी काळी माझ्या भोवती खेळणारा तू नेहमी आठवतोस... पत्र वाचून मुलगा ढसाढसा रडू लागला... जी व्यक्ती त्याच्यासाठी जगली स्वत:चा सर्वात महत्त्वाचा अवयव तिने त्याला सहजपणे देवून टाकला. तिच्याशी आपण किती निर्दयपणे वागलो. त्याचा प्रचंड पश्चाताप झाला होता. तो आईला मोठमोठ्याने हाका मारु लागला, पण आता त्याचा काय उपयोग होता ?.....

---***----



## आत्महत्या...! कशासाठी....!!

– निखाडे ज्योती रामदास,
द्वितीय वर्ष (बी.कॉम.)

अभाग्यांनो नका करु आत्महत्या
कुटूंबाची हत्या मुळी नको
सर्व सुखी असा कोणी नाही जगी
जीवन ही सुगी दु:खाची
लुळ्या–पांगळ्याचे दु:ख पाहा जरा
मनाला आवरा शिकस्तीने
रोगांशी झुंजती धन्य रोगीवीर
पाहा त्यांना धीर प्राप्त व्हाया
झुंज द्या कडवी घेता का माघार
सोडी रणक्षेत्र नाम देता
काळ बदलतो होतो अनुकूल
सर्वही लाभेल थोडे सोसा
मरायचे तर एकट्याने मरा
नका पोरा सोरा विष पाजू
पिलांना दुबळे पक्षी भरविती
हे का न पाहती आई–बाप
मरणाचे प्रेम विक्रती वेड्याची
वृत्ती जगण्याची शूर लाभे



Scanned with CamScanner

# मराठी साहित्यातील ध्रुवतारा - तात्यासाहेब शिरवाडकर

**निफाडे कामिनी उत्तम**, द्वितीय वर्ष (बी.ए)

साहित्य म्हणजे 'जीवनाचा आरसा' असे म्हटले जाते. त्यामुळे साहित्यात समाज जीवनाचे प्रतिबिंब पडलेले असते. या साहित्यातील एक श्रेष्ठ कवी म्हणून कुसुमाग्रज किंवा वि. वा. शिरवाडकर जेवढे लोकप्रिय होते तितकेच एक उत्कृष्ट नाटककार व कादंबरीकार म्हणूनही लोकप्रिय आहे. त्यांनी कुसुमाग्रज या नावाने काव्य लेखन तर वि. वा. शिरवाडकर या नावाने कादंबरी व नाट्य लेखन केले.

**परिचय :-**

वि. वि. शिरवाडकर तथा तात्यासाहेब शिरवाडकर हे मराठी भाषेतील अग्रगण्य कवी, लेखक, नाटककार, समीक्षक होते. २७ फेब्रुवारी १९१२ रोजी पुण्यासारख्या सांस्कृतिक केंद्रस्थळी जन्म घेऊन नाशिकसारख्या शहरात स्थायिक असलेले शिरवाडकरांचे मुळगांव हे निफाड तालुक्यातील शिरवाडे (वणी) हे होते. तसा मराठी काव्याच्या अंतरंगात असलेला हा ग्रंथकार. त्याचे मुळ नाव गजानन रंगनाथ शिरवाडकर असे होते. पण त्यांचे काका वामन शिरवाडकर यांनी त्यांना दत्तक घेतल्याने त्यांचे नाव विष्णु वामन शिरवाडकर असे झाले.

**शिक्षण :-**

शिरवाडकरांचे प्राथमिक शिक्षण हे पिंपळगांव (बसवंत) येथे झाले. त्यानंतर माध्यमिक शिक्षण हे रुंग्टा हायस्कूल, नाशिक येथे झाले. १९२९ मध्ये ते मॅट्रीक परिक्षा उत्तीर्ण झाले. १९३० मध्ये हं.प्रा. ठाकरसी कॉलेजात प्रवेश घेतला. १९३४ मध्ये मराठी व इंग्रजी या विषयातून बी.ए.ची परिक्षा उत्तीर्ण झाले.

**शिरवाडकरांचा साहित्य लेखनाचा श्रीगणेश :-**

महाविद्यालयीन जीवनात महाविद्यालयात प्रसिध्द होणाऱ्या मासिकात कथा, कवितांचे लेखन केले आहे. बालबोध मेवामध्ये कुसुमाग्रजांनी कविता लेखन केले. त्यानंतर ठाकरसी कॉलेजात 'रत्नाकर' मासिकात कवितांना प्रसिद्धी मिळाली. १९३३ मध्ये त्यांनी ध्रूव मंडळाची स्थापना केली.

आशय व अभिव्यक्तीची नवीन तऱ्हा, यांची वेगळेपणाची वाट चोखाळणारे प्रतिभावंत कवी म्हणजे कुसूमाग्रज होय. सुरम्य कल्पना विलास, थोडक्या शब्दांत विचारधन आशय प्रकट करण्याचे कौशल्य हळूवार वा नाजूक भावनेचा संयमशील अविष्कार आणि क्रांतीचा उद्‌घोष या गुणांनी साहित्य समृध्द केले आहे. आपले पारंपारिक जीवन, आपले देवधर्म, आपली समाजरचना आणि नवीन काळाची हाक या परस्पर विरोधी भावनांचे मोठे विस्मयकारक दर्शन कुसुमाग्रजांच्या कवितेतून होते. त्यांचे साहित्यातील योगदान व भाषाप्रेम यांचा विचार करता जागतिक मराठी परिषदेच्यावतीने त्यांचा जन्मदिवस (२७ फेब्रुवारी) हा 'मराठी राजभाषा दिवस' म्हणून साजरा करण्यात येऊ लागला.

१९८९ मध्ये भारतातील साहित्य क्षेत्रातील सर्वोच्च असा ज्ञानपीठ पुरस्कार त्यांना देण्यात आला.



Scanned with CamScanner

ज्ञानपीठ पुरस्कार मिळवणारे ते मराठी साहित्यातील दुसरे साहित्यिक ठरले. त्यांना समग्र साहित्य लेखनासाठी हा पुरस्कार प्राप्त झाला.

**वि. वा. शिरवाडकरांची साहित्य संपदा :-**

**काव्य :-**

जीवनलहरी (१९३३), विशाखा (१९४२), समिधा (१९४७), किनारा (१९५२), मेघदूत (१९५६), मराठीमाती (१९६०), स्वगत (१९६२), हिमरेषा (१९६४) वादळवेळा (१९६९), बंदोमयी (१९८२) मुकतायन (१९८४).

**नाटक :-**

दूरचे दिवे (१९४६), दुसरा पेशवा (१९४७), वैजयंती (१९५०), कौतेय (१९५३), राजमुकूट (१९५४), ऑथेल्लो (१९६१), आमचं नावं बाबुराव (१९६६), ययाती व देवयानी (१९६६), वीज म्हणाली धरतीला (१९७०), बेकेट (१९७१), नटसम्राट (१९७१), विदूषक (१९७३), एक होती वाघीण (१९७५), आनंद (१९७६), मुख्यमंत्री (१९७९), चंद्र जिथे उगवत नाही (१९८१), महंत (१९५६), कैकयी (१९८७) इत्यादी.

**कथासंग्रह :-**

फुलवाली (१९५०) सतारीचे बोल (१९५८), काही वृध्द काही तरुण (१९६१), प्रेम आणि मांजर (१९६४), अपॉईंटमेंट (१९७८), बारा कथा (निवडक कथा) इत्यादी.

**कादंबरी :-**

वैष्णव (१९४६), जान्हवी (१९५२), कल्पनेच्या तिरावर (१९५६).

**ललित गद्य :-**

आहे आणि नाही (१९५७), विराम चिन्हे (१९७०), प्रतिसाद (१९७६), वाटेवरल्या सावल्या (१९८१), एकाकी तारा (१९८२), शोध सेक्सपीअरचा (१९८३), रुपरेषा (१९८४)

**एकांकिका :-**

दिवाणीवाडा (१९५४), देवाचे घर (१९५६), नाटक बसते आहे (१९६१)

**बाल वाङ्:मय :-**

जाईचा कुंज (१९३६), जादूची होडी (१९४२), छोटे आणि मोठे (१९५३), आवण (१९८५)

अशा प्रकारे शिरवाडकरांनी केलेले लेखन म्हणजे मराठीतील अभिजात साहित्य परंपरा व येणारे कालखंड यांना जोडणारा दुवा होता. शिरवाडकरांनी स्वराज्य, प्रभात, नवयुग, धनुर्धारी अशा विविध वृत्तपत्रांचे संपादक म्हणूनही काम केले. १९५० मध्ये शालेय पुस्तकांचे संपादन केले. कुसुमाग्रजांनी भूषविलेली प्रमुख पदे १९५६ मध्ये मुंबई उपनगर साहित्य संमेलन (मालाड) चे अध्यक्षपद, १९६४ मध्ये झालेल्या ४५ व्या मराठी साहित्य संमेलनाचे मडगांव (गोवा) येथे अध्यक्षपद त्यांनी भूषविले. १९६२-७५ मध्ये 'सार्वजनिक वाचनालय, नाशिक' चे अध्यक्ष होते. १९६२-७५ मध्ये पुणे विद्यापीठाचे / विधिमंडळाचे सदस्य, १९७० मधील मराठी नाटक संमेलन (कोल्हापूर) चे अध्यक्ष होते.

**कुसुमाग्रजांना प्राप्त झालेले काही पुरस्कार :-**

मराठी माती, स्वगत, हिमरेषा या काव्यसंग्रहाना



Scanned with CamScanner

१९६४ चा महाराष्ट्र राज्य पुरस्कार, ययाती व देवयानी काव्यसंग्रहात महाराष्ट्र राज्य पुरस्कार, नटसम्राट (शोकात्मिक) नाटकास १९७१ मध्ये महाराष्ट्र राज्य पुरस्कार व १९७४ मध्ये साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला. १९८५ मध्ये पुणे विद्यापीठाकडून 'डी.लीट' पदवी व साहित्य विश्वातील सर्वोच्च मानला जाणारा ज्ञानपीठ पुरस्कार प्रदान केला गेला.

शिरवाडकरांच्या या कार्यामुळे मराठी साहित्यप्रेमींसाठी साहित्याचा बहूमोल ठेवा निर्माण झाला आहे. ऐन रणसंग्रामाच्या वेळी दुर्दम्य असा आशावाद निर्माण करण्यासाठी हा क्रांतीवीर 'क्रांतीचा जयजयकार' करतो व म्हणतो.

'कशास आई भिजविसी डोळे, उजळ तुझे भाळ
रात्रीचा गर्भात उद्याचा असे उषःकाल
सरणावरती आज आमुची पेटतात प्रेते
उठतील त्या ज्वालांतून भावी, क्रांतीचे नेते'

अशा प्रकारे स्वातंत्र्योत्तर काळातील लिखाण असले तरी ते अतिशय संवेदनशील आहे. 'जालियनवाला बाग हत्याकांडाचा' निषेध शिरवाडकर आपल्या कवितेत करतात. कुसुमाग्रजांची 'कणा' कविता ही आयुष्यात आलेल्या संकटांशी सामना करण्याचे बळ देते. ती पुढीलप्रमाणे –

'ओळखलंत का सर मला '
पावसात आला कोणी,
कपडे होते कर्दमलेले केसावरती पाणी
क्षणभर बसला, नंतर हसला, बोलला वरती पाहून; 'गंगामाई' पाहुणी आली, गेली, घरट्यात राहून.
माहेरवाशीण पोरी सारखी चार भिंतीत नाचली
मोकळ्या हाती जाईल कशी – बायको मात्र वाचली.
भिंत खचली, चूल विझली होते नव्हते नेले
प्रसाद म्हणून पापण्यांमध्ये पाणी थोडे ठेवले
कारभारणीला घेऊन संगे सर, आता लढतो आहे.
पडकी भिंत बांधतो आहे, चिखलगाळ काढतो आहे
खिशाकडे हात जाताच हसत हसत उठला,
'पैसा नको सर, जरा एकटेपणा वाटला
मोडून पडला संसार, तरी मोडला नाही कणा
पाठीवरती हात ठेवून नुसते लढ म्हणा.'

अशा प्रकारे कविता व इतर साहित्याच्या माध्यमातून शिंरवाडकरांनी समाजप्रबोधन व सामाजिक विषमतेवर प्रहार केले. शिरवाडकरांना समाजात असणाऱ्या विषमतेची जाण होती. मानवता, बंधूता, समता, स्वातंत्र्य इत्यादी जीवन मूल्याविषयी प्रेम होते. प्रेमभावनेचे उत्कट चित्रण भव्य कल्पना विलास व जीवनमूल्याशी प्रेम होते. काव्याचे प्रमुख विशेषत्व समाज परिवर्तनाची दिशा घेवून केशवसूतांची कविता जेथवर जाऊन पोहचली त्यापुढील वाटचाल कुसुमाग्रजांनी केली. कुसुमाग्रजांच्या कविता व त्यांच्या नाटकांवर नवाकाळ कर्ते कृष्णाजी प्रभाकर खाडीलकरांच्या नाट वाङ:मयाचा प्रभाव पडलेला दिसून येतो. १० मार्च १९९९ मध्ये नाशकात भरदिवसा सूर्यास्त झाला व शिरवाडकरांची निधनाची बातमी संपूर्ण महाराष्ट्रात पसरली. एक साहित्य विश्वातील ध्रूवतारा असणाऱ्या या साहित्यिकाचे नाव मराठी साहित्यात



Scanned with CamScanner

# भारत का वीर पुत्र - महाराणा प्रताप

परदेशी पूजा राजेंद्रसिंग (तृतीय वर्ष, बी.ए.)

पूरा नाम - महाराणा प्रतापसिंह, जन्म - ९ मे १५४०, जन्मस्थान - कुम्भलगढ दुर्ग, पिता - राणा उदयसिंह, माता - महाराणी जयवंता कंवर, विवाह - महाराणी अजब्धे पंवार, संतान - अमरसिंह

बचपनसेही महाराणा प्रताप साहसी, वीर और स्वाभिमानी एवं स्वातंत्र्यप्रिय थे। सन १५७२ में मेवाड के सिंहासन पर बैठते ही उन्हें अभूतपूर्व संकटो का सामना करना पडा। मगर ध्यैर्य और साहस के साथ उन्होंने हर विपत्ती का सामना किया। मुगलो की विराट सेना से हल्दी घाटी में उनका भारी युध्द हुआ। वहां उन्होंने जो पराक्रम दिखाया। वह भारतीय इतिहास मे अद्वितीय है। उन्होंने अपने पूर्वजों के मानमर्यादा की रक्षा की। और प्रण किया की जबतक अपने राज्य को मुक्त नहीं करवा लेगें, तबतक राज्य सुख उपभोग नहीं करेंगे। तब से वह भूमी पर सोने लगे, वह अरावली के जंगलों में कष्ट सहते भटकते रहें। परंतू उन्होंने मुगल सम्राट की अधिनता स्विकार नहीं की। उन्होंने अपने मातृभूमी के रक्षा के लिए अपना जीवन लगा दिया। यदापि महाराणा प्रताप शक्तिशाली मुगलो को पराजित नहीं कर पाए। पर उन्होंने विरता का जो आदर्श प्रस्तूत किया वह अद्वितीय है। उन्होंने जिन परिस्थितीयों में संघर्ष किया, वे वास्तव मे जटील थी, पर उन्होंने हार नहीं मानी। यदी राजपूतों को भारतीय इतिहास मे स्थान मिल सकता, उसका श्रेय मुख्यत: राणा प्रताप को ही जाता है। उन्होंने अपने मातृभूमी को तो परतंत्र होने दीया, नही कलंकित, विशाल मुगल सेना को उन्होंने लोहे के चने चबाने पर विवश कर दिया था। मुगल सम्राट अकबर उनके राज्य को जितकर अपने साम्राज्यमें मिलाना चाहते थे, किन्तु राणा प्रताप ने ऐसा नहीं होने दिया, आर अजीवन संघर्ष किया। मुगल साम्राज्य का सूरज तो डूब गया, किंतू राणा प्रताप की गौरव गाथा आज भी गायी जाती है। कहा जाता है की, राणा के देहांत की खबर पाकर स्वयं अकबर की आंखे डबडबाई गई थी।

महाराणा प्रताप भारतीय इतिहास के एक अत्यंत गौरवशाली पात्र है। उनके त्याग, शौर्य, और राष्ट्रभक्ती की तुलना किसी से नहीं की जा सकती। वह आज भारत में शौर्य, साहस और स्वाभिमान का प्रतिक बन गए है। ऐसे महान शासक की मृत्यू सन १५९७ में ५७ साल की उम्र में वह स्वर्ग सिधार गए।

---

विश्वात अजरामर झाले. २७ फेब्रुवारी हा दिवस 'जागतिक मराठी भाषा दिन' म्हणून मान्य करण्यात आला. माणसा माणसात जिव्हाळा व आत्मियता निर्माण करणारी हृदयाची भाषा, पंचरंगी क्रांतीद्वारे मानवी जीवनाच्या सर्व क्षेत्रांतील प्रदूषण नष्ट करणारी, भक्तीनिष्ठ क्रांतीकारी प्रयोग या सगळ्यांचे माध्यम हे मराठी भाषा असल्याने मराठी भाषेला गती, उत्कर्षाला सामर्थ्य मिळणे गरजेचे आहे. श्रेष्ठ साहित्यकार कुसुमाग्रजांनी मराठीला सर्वोच्च शिखरावर नेऊन ठेवले. आजही असे अनेक सकारात्मक प्रयत्न दिसून येतात. अशा महान साहित्य परंपरा असलेल्या मराठी भाषेतील सुंदर ग्रंथाचे आपण भरपूर वाचन केले पाहिजे. शक्य तितके प्रयत्न करुन मराठी भाषेचा नावलौकिक वाढवला पाहिजे.



Scanned with CamScanner

# विद्यार्थी आणि राजकारण

शिरसाठ गुलाब विश्वनाथ, द्वितीय वर्ष (बी.कॉम)

विद्यार्थी मित्रांनो, भारत हा एक लोकशाही प्रधान देश आहे. या देशाचा कारभार लोकशाही मार्गाने चालतो.

त्यासाठी आपण मतदानाद्वारे आपले प्रतिनिधी निवडून देत असतो, परंतु एक गोष्ट मनाला नेहमी खटकते की, या राजकीय प्रक्रियेत विद्यार्थी तरुणांचा सहभाग किती ? त्यांना जाणीवपूर्वक या प्रक्रियेत मागे टाकले जाते का ? या देशाला नवीन विचारांची गरज असताना? तरुणांना राजकारणात स्थान का नको ? कारण नवीन विचार फक्त तरुणच देऊ शकतात.

डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी आपल्या 'अग्निपंख' या पुस्तकात असे म्हटले आहे की, भारत २०२० मध्ये महासत्ता बनणार आहे. कारण २०२० मध्ये भारत हा जगातील सर्वात तरुण देश असेल, परंतु या तरुणांनी स्वत:हून सत्तेत सहभागी झाल्याशिवाय या देशाला एक नवी दिशा मिळणार नाही. या देशात आज अनेक प्रश्न आहेत. भ्रष्टाचार, बेकारी, महागाई, दहशतवाद इ. प्रश्नांना वृध्द राजकारणी तोंड देऊ शकत नाही. भ्रष्टाचाराला ते लवकर बळी पडतात. ते नवीन विचार आणू शकत नाहीत.

तरुण विद्यार्थी आपल्या नवनिर्मितीतून नवीन विचार मांडू शकतात. देशाच्या प्रश्नांवर ठाम विचार मांडू शकतात, परंतु विद्यार्थ्यांना राजकारणात येण्यात नेहमी विरोध होतो. काही तरुणांनी राजकारणात येण्याचा प्रयत्न केला आणि ते यशस्वी होऊन त्यांनी आपल्या भागाचा कायापालट देखील केला. यामध्ये महाराष्ट्राचा विचार केला तर ग्रामविकास मंत्री - पंकजाताई मुंडे असतील तसेच हिंगोलीचे खासदार राजीवजी सातव असतील, सोलापुरच्या आमदार प्रणिती शिंदे असतील. हे लोक यशस्वी झाले.

विद्यार्थ्यांनी राजकारणात यावे, यासाठी अथवा त्यांचा राजकारण म्हणजे पैसा, भ्रष्टाचार हा दृष्टीकोन बदलण्यासाठी महाविद्यालयातून राजकीय धडे देणे आवश्यक आहे.

त्यासाठी अभ्यासक्रम तयार करुन महाविद्यालय निर्माण करणे हे काम त्यांनी हाती घेतले पाहिजे. उदा. 'यीन' सारख्या संस्था विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, पुढाकार यासारखे गुण विकसित करत आहेत.

महाराष्ट्र विधानसभेचा विचार केल्यास २० ते २२ तरुण आमदार या विधानसभेत आहे. ही एक चांगली सुरुवात म्हणावी लागेल. कारण देश बदलायचा असेल, तर विचार बदलणे गरजेचे आहे आणि विचार बदलण्याची ताकद, प्रश्न समजून ते सोडवण्याची ताकद, फक्त आपल्या तरुणाईत अर्थात आपल्या विद्यार्थ्यांत आहे.

----***----



Scanned with CamScanner

# आयुष्य....

परदेशी पूजा शिवपालसिंग, द्वितीय वर्ष (बी.ए.)

जिंदगी, लाईफ, आयुष्य.... शब्द तीन आहे, परंतु या तीनही शब्दांचा अर्थ एकच आहे आणि तो म्हणजे जर्नी. या आयुष्याला आपण जर्नी पण म्हणतो आणि कोणी याला डिस्टन्स (मुक्कामाचे ठिकाण) पण सांगू शकतो. याचा अर्थ एकच आहे, परंतु प्रत्येकाची विचार करण्याची पध्दत वेगवेगळी आहे. आपल्या आयुष्यातील लाईफ च्या जर्नी ला यशस्वी करण्यासाठी अनेक वाटा असतात, परंतु त्या वाटातून कोणतीही एक वाट निवडावी लागते. या सर्व वाटांतून कोणतीही एक वाट निवडणे ही सर्वात मोठी व अवघड परीक्षा असते. आणि या परीक्षेत यशस्वी होणे हेच आयुष्यातील सर्वात मोठे आणि पहिले कर्तव्य असते. या वाटेत येणारी अनेक संकटे जर्नीचाच एक भाग आहे. हसत हसत या संकटावर मात करणे हेच आपल्या आयुष्यातील ध्येयाकडे जाण्याचा मार्ग आहे.

प्रत्येक आयुष्य बदलून टाकण्यासाठी एखाद्या परफेक्ट अनुभवातून जाणे गरजेचे असते आणि असा अनुभव आपल्याला आजच्या जगातील व्यक्तीकडून, इतिहासामध्ये घडून गेलेल्या विविध घटना, व्यक्ती व अनुभव यांच्यावरुन येत असतो. तसेच आपल्या जीवनात आपण कोणत्या ना कोणत्या व्यक्तीला आदर्श मानत असतो. त्याचे सद्गुण, कार्य यांना समोर ठेवून जसे की, शिवाजी महाराज, महात्मा गांधी, सावित्रीबाई फुले असे अनेक व्यक्ती घडून गेल्या. त्यांना आपण समोर ठेवून किंवा त्यांचे अनुकरण करत असतो. तसेच दररोज रटाळवाणे तेचतेच काम करुन खूप कंटाळा येतो. तेच आपले आवडते क्षेत्र असेल, तर आपण ते खूप आवडीने जगतो आणि प्रत्येक गोष्टीतून काहीतरी नवीन शिकत असतो, आणि हेच तर आयुष्यामध्ये शिकायचे असते. जसे की, एखाद्या सुंदर मनसोक्त उडणाऱ्या फुलपाखराकडे बघून आपल्याला देखील तसेच वाटते की, आपले आयुष्य तसे असावे. या निसर्गरम्य वातावरणामध्ये मनसोक्त आनंद लुटावा. या फुलपाखरासारखे जिकडे मन होईल तिकडे जायचं. आणि या अमूल्य जीवनाचा मनसोक्त आनंद घ्यायचा, परंतु खरे पाहायला गेलो तर आयुष्य हे कधीच रटाळवाणे नसते. आपण त्याला त्या दृष्टीकोनातून पाहतो. महागड्या गाड्या, मोबाईल, दैनंदिन जीवनातील वेगवेगळ्या करमणुकीच्या वस्तू आपल्याडे दैनंदिन जीवनातील वेगवेगळ्या करमणुकीच्या वस्तू आपल्याकडे असल्याशिवाय आपण सुखी होऊच शकत नाही. हा आपला दृष्टीकोन असतो. आपण महागड्या वस्तूमध्ये आरामदायी जीवन जगण्याचा व त्या वस्तूचा शोध घेऊन आपले जीवन त्या वस्तूमध्ये गुंतवत असतो. तेच जर खेड्यात पाहिले तर तेथील व्यक्तीकडे या वस्तू नसतांना ही तेथील लोक खूप आनंदी असता. एव्हाना शहरातील व्यक्तीपैकी कितीतरी पहिले आनंदी असतात. मग आता तुम्हीच सांगा. या सर्व गोष्टी आपलं सुख, दुःख कसे काय ठरवू शकतात. ते जर आपल्या जगण्यावर अवलंबून असते की, आपण कसे जगणे



Scanned with CamScanner

पसंत करतो. आपण आयुष्यात प्रत्येक दिवसाचा विचार केला असता, प्रत्येक दिवसाचा आपला अनुभव वेगळा असतो. वेगळ्या व्यक्तीचे विचार ऐकू येतात. अनेक प्रसंग आपल्या बरोबरच घडत असतात. वेगवेगळे आव्हानं आपल्यासमोर असतात. प्रत्येक आव्हान आपण स्विकारले पाहिजे व त्यावर मात केली पाहिजे, तसेच आयुष्यात सुखापेक्षा दु:ख अधिक असतात.

'जीवनात फक्त काटेच नसतात,
फुलंसुध्दा हसत असतात.
अलगद काट्यांना बाजूला सारुन
फुलच तेवढी वेचायची असतात.

ज्याप्रमाणे गुलाब, मोगरा कोठेही ठेवले तरी त्यांचा सुगंध मात्र बदलत नाही. त्याचप्रमाणे आपल्यावर ही कोणत्याही वाईट वातावरणाचा फरक पडता कामा नये. दुसऱ्यांनी आपले गुण घेतले तरी हरकत नाही; परंतु आपल्या सद्गुणांची साथ कधीच सोडायची नाही.

आयुष्यात अनेक संकटांना सामोरे गेल्यावर आणि प्रत्येक परीक्षेत यश मिळेलच असे नाही, तर काही परीक्षेत अपयश आल्याने मागे न येता किंवा निराश न होता त्या अपयशामध्ये जो अनुभव येतो. तो आपल्याला योग्य वाट दाखवून जातो. जीवनातील परीक्षा खूप महत्त्वाच्या आहे. जो या परीक्षेत यशस्वी झाला. तो आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत पोहोचू शकतो. चांगल्याप्रकारे आयुष्य प्रत्येक वळणावर पळून जाईल, परंतु आपण आयुष्यापासून कधीही पळू नये. कारण आयुष्यात कधीकधी असे प्रसंग येतात की, त्यावेळेस आपल्या सोबत कोणी नसते. त्यावेळेस आपण पूर्ण धैर्याने त्या संकटांना सामोरे गेले पाहिजे.

Mind blowing quate by Martin Luther king - "If you want something which you never had before then do something which you have never done before."

याचा अर्थ असा की, 'अगर आप कुछ ऐसा पाना चाहते हो, जो आप अबतक नहीं पा सके । तो ऐसा काम करो जो आप अब तक नहीं कर सके ।

Never change your originality for sake of other, becaue, No one can play your role better than you, You are the best when you are you.

कधीही दुसऱ्याची कॉपी करु नका. दुसऱ्याची कॉपी करता करता आपण स्वत:ची अस्सलपणा/कल्पकता/ओरीजनॅलटी विसरुन जातो. देवाने आपल्याला प्रत्येकाला वेगवेगळे घडवले आहे. कारण प्रत्येक जण एक दुसऱ्यापेक्षा वेगळे जीवन जगतो. मग का आपण आपल्याला दुसऱ्यात पाहतो. प्रत्येकामध्ये काही ना काही चांगली एखादी गोष्ट किंवा गुड पॉईंटस् असतात. ज्याने त्याची ओळख बनते. त्याला ओळखा, स्वत:ला ओळखा आणि त्यामध्येच आपल्याला आपल्या प्रश्नांची उत्तरे भेटतील.

काहीच उपयोग झाला नाही
म्हणून थांबायचे नसते
प्रत्येक गोष्टीसाठी तर
धडपडायचे असते
फायदा झाला नाही तरी
आयुष्यातील देवाण-घेवाणमध्ये उतरायचे असते.
मार्ग चुकला, वाट भरकटली तर



Scanned with CamScanner

अखेरचे ध्येय साध्य करण्यासाठी तर
संकटांशी झटायचे असते.
संकटांशी झटायचे असते.
हेच तर जीवनाचे सार आहे.
म्हणूनच याचे नाव आयुष्य आहे.

आयुष्यातील प्रत्येक क्षण मोलाचा आहे. आहे त्याच मिनीटाला जीवन जगायचे असते. गेलेला क्षण परत येत नाही. त्यामुळे या जीवनाला सार्थक करण्यासाठी लागेल. तेवढे कष्ट व प्रयत्न आपण केले पाहिजे. आयुष्यात काहीतरी करुन दाखविणाऱ्या व ज्याचे विचार कृती व प्रत्येक संकटावर मात करुन यश प्राप्त केलेले असते, आपलेपणाची भावना असते, अशांचे कोणी ना कोणी नाव घेत असतात, किंवा स्मरणात ठेवत असतात.

----***----

## ओळख....

आईने बनवलं....बाबांनी घडवलं
आईने शब्दांची ओळख करुन दिली,
बाबांनी शब्दांचा अर्थ समजवला,
आईने विचार दिले बाबांनी स्वातंत्र्य दिले
आईने भक्ती शिकवली, बाबांनी वृत्ती शिकवली,
आईने लढण्यासाठी शक्ती दिली,
बाबांनी जिंकण्यासाठी नीती दिली,
त्याच्या परिश्रमामुळे यश माझ्या हाती आहे
म्हणून तर माझी आज ओळख आहे.

– पाचोरकर गायत्री बाळासाहेब,
तृतीय वर्ष (बी.कॉम)

## रक्षाबंधन....



धाग्याधाग्यात गुंतले
बंधन नात्याचे औक्षण केले
बहिणीने भाऊरायाचे
महत्त्व खूप आहे या महान दिवसाचे
वर्णन करते या बहिण भावाच्या नात्याचे ॥१॥
भाऊराया कृष्णाच्या रक्षणासाठी
त्याग द्रौपदीने भरजरी वस्त्राचा केला
त्रैलोक्यात महत्त्व प्राप्त झाले
या बहिण भावाच्या प्रेमळ नात्याला ॥ २॥
तो दिवस जस-जसा जवळ येऊ लागला
लगबग सुरु झाली माहेरी जाण्याला
राखी बांधण्याला भाऊरायाच्या मनगटाला
तो शुभ दिवस आला
रक्षाबंधन असे म्हणतात त्याला ॥३॥
चंदनाचा घेऊन पाट
हळदी, कुंकवाने भरुन ताट
मागणे देवा तुझ्याकडे एकच
भाऊरायाची होऊ दे भरभराट ॥ ४॥
इडा पिडा टळू दे, बळीचे राज्य येऊ दे
माझ्या या राखीने भाऊरायाच्या मनगटाला
पोलादाहून अधिक ताकद येऊ दे
देवा मागणे एकच पुढचे रक्षाबंधन
असेच येऊ दे.... ॥५॥
या एका धाग्याने जीवंत केले जाते
पाणाआड बसून कोकीळा गाणी गांते
वर्ण,भेद, जाती भेद नाही ज्या नात्याला
उठा मैत्रिणींनो करु साजरा
रक्षाबंधनाच्या दिवसाला.... ॥६॥

– पाचोरकर पूजा कोंडाजी,
तृतीय वर्ष (बी.कॉम)



Scanned with CamScanner

# आई वडीलांची सेवा - हेच खरे जीवनाचे सार्थक

पवार गायत्री एकनाथ, तृतीय वर्ष (बी.ए.)



जन्मतःच म्हणतो आई, उठताच म्हणतो आई,

आई म्हणजे वाळवंटात प्यावे असे थंडगार पाणी, आई म्हणजे आरतीतील लयबध्द टाळी, आई म्हणजे वेदनेनंतरची सर्वात पहिली आरोळी.

'आई' हा शब्द उच्चारताच ओढ लागते. ती तिच्या मातृत्वाची आ-म्हणजे 'आत्मा' ई - म्हणजे 'ईश्वर' म्हणजेच ईश्वराचे प्रतीक असलेले रुप म्हणजे आई आणि वडील होय. आई-वडीलाचा महिमा किती अगाध आहे आणि अशा आई वडीलांचे आपण पुत्र असल्याचे आपले भाग्य आहे आणि त्यांची सेवा करणे हे आपले परमभाग्य आहे.

आजच्या जीवनात सर्वत्र स्वार्थ लपलेला असतांना समाजात आपल्या जीवन मूल्यांची जोपासना करण्यासाठी आई-वडीलांची सेवा करणे हेच तर आपल्या जीवनाचे सार्थक आहे. आपल्या जन्मदात्या आई-वडीलांची सेवा करणे व सेवा करायला मिळणे हे त्या पुत्राचे तर परमभाग्यच आहे. आई-वडील हे देवापेक्षाही श्रेष्ठ आहे आणि अशा आई-बाबांची सेवा करण्याचे भाग्य जगात प्रत्येकालाच मिळत नाही. ते मात्र अजूनही दुःखी आहे. परंतु आजच्या आधुनिक जगात समाज हा अनैतिक मार्गाकडे वळलेला आहे. आई-वडीलांची महती कोणी जाणुनच घेत नाही. नऊ महिन्याच्या त्या वेदना सोसून आई आपल्याला जन्म देते. लहानाचं मोठं करते, लिहायला, वाचायला शिकवते. शाळेच्या गेटपर्यंत बोट धरुन शाळेत पोहोचोवायला येणारे ते बाबा. एवढेच नाही तर लहान मोठ्या संकटात स्वतःची पर्वा न करता धावून येणारे ते आई-वडीलच असतात. स्वतःच्या घासातला घास भरवणारे सुध्दा आई-वडीलच असतात. आपल्या लेकरांना यशाच्या उंच शिखरावर पोहोचवण्यासाठी ते नेहमी पराकाष्टा करतात. आणि या सर्वांची परतफेड म्हणून आपण त्यांना काय देतो ? आपल्या समजत्या वयात त्यांची सेवा करायची सोडून अनैतिक मार्गाकडे वळणारे तरुण मंडळी आजही आपणांस पहावयास मिळतात. उन्हात खेळणाऱ्या मुलाला काळजीपोटी आई म्हणते 'कारट्या सावलीत मर' असे म्हणणाऱ्या त्या आई वडीलांचा मोठेपणी मात्र बोजा होऊ लागतो. जमीन, जुमला, गाडी, बंगला अशी श्रीमंती आली की, ते आई वडीलांनादेखील विसरतात. खरे तर या अफाट संपत्तीचे मालक आई-वडीलच असतात. पण त्यांना काहीही नको असते. गरज असते ती फक्त प्रेमाची.

परंतु बायका, पोरं आल्यानंतर हे राक्षस आपल्या जन्मदात्या माता-पित्यांनाच विसरतात. प्रसंगी त्यांना वृद्धाश्रमाचीही वाट दाखवतात. इतक्या खोल पातळीला जाणारा तो माणूस नसतो. शेवटी त्यांना राक्षसच म्हणता येईल.

माझ्या तरुण मित्रांनो, माझी आपणांस कळकळून विनंती आहे की, आई-वडील हे आपले परमेश्वर आहे आणि त्यांची सेवा करणे आपल्या सर्वांचेच कर्तव्य आहे. जीवनात भरपूर नाती असतात, परंतु आई-वडील आणि मुलांचे नाते हे सर्वात श्रेष्ठ नाते आहे. आयुष्यात आपल्याला सुख-संपत्ती सर्व काही विकत घेता येईल, पण लक्षात ठेवा. आई-वडील हे पैसे देऊन विकत घेतांना आजवर मी पाहिलेले नाही. आई-वडीलांसारखे पावित्र्य कोणत्याही नात्यात नाही. आपल्यावर कधी संकट आले तर सर्व नात्यांपेक्षा आई-वडील हे आपला जीव पणाला लावतात. प्रसंगी स्वत:ची पर्वा न करता मुलांना आधार देतात. इतके पावित्र्य त्या माता-पित्यांमध्ये असते.

आज मला आठवण येते ती श्रावणबाळाची. खरंच पुत्र असावा तर तो श्रावण बाळासारखा. आपल्या खांद्यावर बोजा सोसून कावडीत बसवून आपल्या आई-वडीलांना यात्रेला नेणारा तो श्रावण बाळ खरेच किती भाग्यवान होता. काम करता करता आपल्या माता-पित्यांची तो सेवा करत असे. खरंच आदर्श घ्यावा तो श्रावणबाळाचा. आपणही किती भाग्यवान आहोत. आपल्याला परमेश्वरासमान माता-पिता मिळाले. ज्यांनी आपल्याला हे जग दाखवले आणि अशा माय-बापाची सेवा करण्याचे आपल्याला भाग्य मिळाले. जगात काही व्यक्ती अशाही असतात की, जे देवाची भक्ती करतात. मोठ मोठ्या तीर्थयात्रेला जातात. चारधाम, काशी, तीर्थक्षेत्र अशा मोठमोठ्या ठिकाणी वाऱ्या करतात. आणि आपल्या म्हाताऱ्या आई-वडीलांना घरी एकटेच सोडून जातात. त्यांच्या त्या उतारवयात, म्हातारपणात, आजारपणात गरज असते ती आधाराची. आणि अशा म्हाताऱ्या आई-वडीलांची सेवा करायचे सोडून दूर निघून जातात. बिचारे मात्र एकटेच दु:ख सोसत असतात, परंतु आई-वडील हेच आपले परमेश्वर आहे. बापाला सोडून तीर्थयात्रेला जाणे देवालाही पसंत पडणार नाही. परंतु हीच भक्ती जर आपण आई-वडीलांची, मता-पित्यांची सेवा करतांना केली. त्यांच्या म्हातारपणाची जर आपण काठी झालो आणि सेवा करता करता देवाचे स्मरण केले. तर देवही प्रसन्न होईल. म्हणूनच सांगावेसे वाटते की, माता-पित्यांची सेवा हीच खरी ईश्वरसेवा आणि जो-जो आपल्या माय-बापाला सांभाळेल, इतकेच नव्हे तर त्यांची आनंदाने सेवा करेल. त्यांचे जीवन सार्थक झाल्याशिवाय राहणार नाही. आयुष्यात सुख, शांती, वैभव, ऐश्वर्य हे सारं काही पुन्हा मिळविता येईल. पण एकदा मिळालेल्या आई-वडीलांची छाया परत मिळविता येणे शक्य नाही.

ज्या आई वडीलांनी आपल्याला हे सुंदर जग दाखवले. त्यांच्यावर भरपूर प्रेम करा, आयुष्यभर त्यांची सेवा करा आणि त्यांना नेहमी आनंदी ठेवण्याचा प्रयत्न करा. आणि शेवटी सांगावेसे वाटते की,

विसरु नको रे आई-बापाला,<br>
होईल अर्धशून्य रे, माय-बापाच्या सवेसारखे<br>
नाही जगती पुण्य रे

----***----

# आई-बापाची थोरवी

पाचोरकर प्रियंका रतन, तृतीय वर्ष (बी.ए.)

दुनियामध्ये तुम्हाला, आम्हाला सर्व भेटले, पण माय-बाप पुन्हा कधीही भेटू शकणार नाही. ज्याला हात नसेल, त्याला विचारा हाताचे दु:ख, ज्याला पाय नसेल त्याला विचारा पायचे दु:ख, ज्याला डोळा नाही त्याला विचारा डोळ्याचे दु:ख आणि ज्याला आई नसेल त्याला विचारा आई नसल्याचे दु:ख. आई काय असते? मायेचा सागर, समुद्राची घागर, चैतन्याचा जागर असते. आई म्हणजे भाजीतलं मीठ, शिक्षणाचे पहिले विद्यापीठ, दु:खाचे व्यासपीठ असते. आई पावसाच्या धारा, थंडगार वारा, मायेचा उबारा असते. दादा ! आई ही आईच असते, नसते सांभाळणारी दाई. अरे समुद्राची शाई, आकाशचा कागद, पर्वताची लेखणी व साक्षात सरस्वती माता, जरी आईचे उपकार लिहायला बसलो तरी लिहिता येणार नाही. 'स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी' अरे डोंगराच्या पलिकडे गेलेला सूर्य तुम्हाला परत दिसेल, पण एकदा मातीत गेलेली आई पुन्हा कधीही दिसू शकत नाही. म्हणून आईची सेवा करा म्हणून मी एवढेच म्हणेल की,

आई म्हणजे, मंदीराचा उंच कळस,
अंगणातील पवित्र तुळस,
भजनात गुणगुणावी अशी ती संतवाणी
वाळवंटात प्यावं, अस थंडगार पाणी
आरतीत वाजवावी, अशी लयबध्द टाळी
आणि वेदनेनंतरची
सर्वात..पहिली आरोळी आई....!

आईला जेवढे प्राधान्य आहे ना, तेवढेच वडीलांनाही आहे. त्यामुळे वडीलांना कमी समजू नका. वडीलांना कधीही कमी लेखू नका. आई घराचं मांगल्य आहे, तर बाप घराचे अस्तित्व आहे. पण आम्ही घरातल्या अस्तित्वाला कधी ओळखतच नाही, अरे जन्म देणारी आई तुम्हा आम्हाला सर्वांना न्यात आहे. सगळ्यांना माहीत आहे, पण रात्रभर दवाखान्यात चकरा मारणाऱ्या बापाला आपण विसरुन जातो. अरे शाळेमध्ये पोरगा जर पहिला आला तर आई सगळ्यांना सांगते. माझा पोरगा पहिला आला. पण गुपचूप हॉटेलमध्ये जाऊन पेढ्याचा बॉक्स आणणाऱ्या बापाला आम्ही सहज विसरतो. अरे तो बाप आपल्या पोरीला पन्नास रुपये देतो. पोराला वीस रुपये देतो. पोरगी पन्नास रुपये घेते व ब्युटीपार्लरमध्ये जाते. पोरगा वीस रुपये घेतो व सलुनमध्ये जातो.पण याच घरातला बाप दाढी करण्याचा साबण संपला म्हणून कपडे धुण्याच्या साबनाने दाढी करणारा तो बाप असतो. तो बाप आपल्या पोरीला नवे कपडे घेतो. पोराला नव्हे कपडे घेतो, पत्नीला नवी साडी आणेल, पण स्वत: बाप फाटकेच कपडे घालतो. आई रडून मोकळी होत असते, बिचाऱ्या बापाला रडता येत नाही, नाही रडता येत हो त्याला. अरे स्वत:चा बाप जरी मेला तरी त्याला रडता येत नाही. कारण लहान भावाचा सांभाळ करावा लागतो. स्वत:ची आई मेली तरी रडता येत नाही. कारण लहान बहिणीचा सांभाळ करावा लागतो. अरे छोटं संकट आला ना तर आई आठवते, पण मोठ्या वादळात तोंड देणारा तो बापच असतो. रस्त्याने

चालता चालता पायला ठेच जरी लागली ना आई गं ! हाच शब्द निघतो, पण पुढे गेल्यानंतर मोठा साप दिसू द्या... बाप रे...! हे वाक्य तोंडातून बाहेर निघते. आपल्याला वाटत असते बाप म्हणजे तापट स्वभावाचा म्हणजे मारझोड करणार असतो. अरे बापाला जर बघायचं असले तर नारळ बघा ते जसे वरुन कडक असते, पण ते नारळ फोडल्यानंतर अमृतासारखे गोड पाणी देणारा तो बापच असतो.

आई रडून मोकळी होते, पण बिचाऱ्या बापाला रडता येत नाही. माय बापानों छत्रपती शिवाजी महाराजांना घडवणारी जिजाऊ माता जरी होती. पण त्याच धावपळीच्या काळामध्ये शिवनेरी गडावर नेणाऱ्या शहाजी महाराजांना कधी विसरु नका. प्रभू रामचंद्राला जन्म देणारी आई जरुर होती. पण राम राम राम पुत्र पुत्र करणारा तडफडून मरणारा बाप दशरथच होता. यशोदेचे, देवकीचे गुणगान जरुर करा, पण यमुनेच्या पुरातून भगवान श्रीकृष्णाला नेणाऱ्या वासुदेवाला कधी विसरु नका. लग्न जमलं तर लग्न जमल्यापासून ती पोरगी आईला मिठी मारते. आई.. माझं कसं होईल गं आई, आई धीर देते, ती म्हणते, 'बाळां चांगल होईल तुझं' तो दुसरा दिवस मंडप टाकलेला आहे. मंडपात सगळे पाहुणे येतात. पाहुण्यांना नास्ता दिला जातो. नंतर सगळे पाहुणे पारावर जातात. नंतर नाचत नाचत मंडपाच्या गेटवर येतात. आतमध्ये गेल्यानंतर सगळ्यांच्या हातामध्ये अक्षदा दिल्या जातात. ब्राह्मण येतात ब्रह्मदेवता मंगलाष्टक म्हणायला सुरुवात होते. ताशांचा नाद होतो. सगळी बसलेली मंडळी त्यांच्या अंगावर अक्षदा टाकतात. पती-पत्नी एकमेकांच्या गळ्यात हार टाकतात. सगळे लोक जेवायला बसतात आणि एक एक पंगत उठायला सुरुवात होते. आणि बघता बघता संध्याकाळची वेळ होऊन जाते. भगवान सूर्यनारायण डुबण्याची वेळ आणि पोरगी माहेराला सोडून सासरी जाण्याची वेळ येते. आणि ज्यावेळी हे दृश्य आई बघते आई धावत धावत जाते पोरीला मिठी मारते, ताई तुझे कसे होईल गं ताई... आणि ते दृश्य त्या घरातला बाप बघतो आणि जवळ जाऊन आपल्या पत्नीला सांगतो, 'का गं, कशाला रडते गं, अगं आपली पोरगी पतीला चांगलं ठेवेल, अगं पोरगी म्हणजे परक्याचं धन असते ते आज ना उद्या जाणारच' आता कशाला रडते चल घरात. आणि सर्वांना घेऊन जातो घरामध्ये आणि सगळे पाहुणे गेल्यावर एका कोपऱ्यात हसमूस रडणारा तो बापच असतो. अरे एक बाप चार, पाच पोरांना पोसण्याची धमक ठेवतो, तर चार चार पोरं एका बापाला पोसू शकत नाही.

जीवनात एक काम करा माय बापांनो, माय बापाची सेवा करा. जगात सर्व मिळेल पण माय बाप मिळणार नाहीत. आई-वडीलांच्या डोळ्यात दोन वेळा अश्रू येतात. एक मुलगी घर सोडून सासरी जाते, तेव्हा आणि दुसऱ्यांदा मुलगा घर सोडून वेगळा राहतो तेव्हा. पसंतीने पत्नी मिळू शकते, परंतु आई मात्र पुण्याईने मिळते. म्हणून पसंतीने मिळणाऱ्या पत्नीसाठी पुण्याईने मिळणाऱ्या आईचा त्याग करु नका. जेव्हा तू लहान होतास तेव्हा आईची कूस ओली ठेवत होतास आता तू मोठा झालास तर आईचे डोळे ओले ठेवतो. तू कसा पुत्र आहेस. या भूतलावर तू पहिला श्वास घेतला तेव्हा तुझे आई-वडील तुझ्या जवळ होते आता तुझे कर्तव्य आहे की, अंतिम श्वासाच्या वेळी तू आई-वडीलांजवळ असावे. पृथ्वीपेक्षा श्रेष्ठ आई आणि स्वर्गापेक्षा उंच वडील आहे.

----***----



Scanned with CamScanner

# कठोर परिश्रम

वाढवणे दिपाली सुरेश, प्रथम वर्ष (बी.कॉम)

जाता जाता सहज असे यश मिळत नाही. त्यासाठी अंगी धडाडी लागते, चांगले गुण लागतात आणि खूप तयारीही करावी लागते. सर्वांनाच यशस्वी व्हावेसे वाटते, पण त्यासाठी लागणारे कष्ट उपसण्याची वेळ देण्याची तयारी किती जणांची असते ? यशासाठी त्यागाची आणि स्वयंशिस्तीची गरज असते. कठोर परिश्रमाला पर्याय नाही. हेन्री फोर्ड म्हणतात, 'जितके तुम्ही जास्त कष्ट कराल तितके तुम्ही जास्त नशीबवान व्हाल'. मग काम व्हायला पाहिजेत असे सगळ्यांना वाटत असते. काहीजण स्वत: काम करतात, तर बाकीचे त्यांना काम करु देण्यासाठी उत्सुक असतात. कॅमॉन्स विल्सन म्हणतात, 'मला अर्धा दिवस काम करायला आवडते, मग ते दिवसाचे पहिले बारा तास असतो किंवा नंतरचे बारा तास असोत.'

शब्दकोश डोक्यावर ठेवून कोणाला स्पेलिंगवर प्रभूत्व मिळणार नाही. त्याचप्रमाणे कष्ट न करता कोणती ही क्षमता अंगी येणार नाही. कसबी, वाक्‌बगार लोक एखादे अवघड काम सुध्दा बघणाऱ्याला सहज सोपे वाटावे इतक्या सहजतेने, सफाईने करताना आपण पाहतो. त्यांना हे जमते कारण त्या कामातील मूलभूत बारकावे त्यांनी परिश्रमपूर्वक आत्मसात केलेले असतात. मायकेल एंजेलो म्हणतात. ''आपली कला पूर्णत्वास नेण्यासाठी मी घेतलेल्या कष्टांची जर लोकांनी दखल घेतली तर माझ्या कलाकृती त्यांना अजिबात आश्चर्य वाटणार नाहीत.''

कठोर परिश्रमासाठीचे एक समर्पक उदाहरण एक उमेदवार नोकरीसाठी येतो तेव्हा त्याची माहिती घेण्यासाठी आणि त्याच्या आधीच्या कारखान्याच्या वरिष्ठाला व्यवस्थापक फोन करुन विचारतो. 'याने तुमच्याकडे किती वर्ष काम केलयं ?' उत्तर मिळते 'तीन दिवस' व्यवस्थापक आश्चर्यचकित होते. पण तो तर म्हणाला होता की तुमच्याकडे तीन वर्ष कामाला होता.' आधीच्या कारखान्याचा वरिष्ठ उत्तर देतो. 'हो होता. तीन वर्ष. पण त्याने काम केलय तीनच दिवस.'

अँड्र्यू कार्नेजी म्हणतात. 'सामान्य माणूस आपल्या शक्तीच्या आणि क्षमतेच्या फक्त एक चतुर्थांशच काम करतो. जी माणसं आपल्या क्षमतेच्या निम्म्याहून अधिक क्षमतेने काम करतात. त्यांना जग सलाम करते आणि जी मोजकीच माणसं आपल्या पूर्ण क्षमतेने म्हणजे १००% काम करतात त्यांना जग डोक्यावर घेते. ' काम जास्त नाही ना ?' फार वेळ लागणार नाही ना ? 'असा दृष्टिकोन कामाबाबत नसावा. त्यापेक्षा पूरेसे काम आहे ना ? किती वेळाचे आहे ? या प्रश्नांमागे असणारा दृष्टीकोन हा सकारात्मक आणि पर्यायाने यशाचा निदर्शक असतो. उत्तम संगीतकार रोज रियाज करतात. कारण जिंकण्यासाठी त्यांनी दीर्घकाळ कठोर परिश्रम केलेले असतात. हा विजय त्यांना सहजासहजी मिळालेला नसतो.

----***----



Scanned with CamScanner

# आनंदी जीवन

**चौरे कोमल रंगनाथ**, तृतीय वर्ष (बी.ए.)

आनंद या जीवनाचा ।
सुगंध परी दरवळावा ॥
मग झीजुनी स्वत: चंदनाने ।
दुसऱ्यास मधुगंध द्यावा ॥

प्रत्येकाच्या आयुष्यात जीवन प्रवास करीत असताना कडू-गोड क्षणांना सामोरे जावे लागते. या क्षणांमध्ये दुर्मीळ मोत्यासारखे काही क्षण असतात. त्यांना आयुष्याच्या शेवटापर्यंत विसरणे शक्य नसते. माणसाने जीवन असे जगावे की, जीवनाला ही जगण्याचा हेवा वाटावा. आपल्याकडे असणारी प्रबळ इच्छाशक्ती, कर्तव्यशक्ती आणि ईश्वरशक्ती या तिनीही शक्ती आहे. जगातील कोणतीही गोष्ट आपण मिळवू शकतो. आपल्या शक्तीनीच आपण आपले अस्तित्व निर्माण करु शकतो.

कोणतेही काम करत असताना स्वत:ला स्थीर ठेवण्याचा प्रयत्न करणे हे यशस्वी जीवन जगण्यासाठी आवश्यक आहे. विवेकानंद म्हणतात, 'जो पर्यंत आपण स्वत:ला बिघडून घेत नाही. तो पर्यंत जगातील कोणतीही शक्ती आपल्याला बिघडवू शकत नाही.' भगवंतावरील प्रबळ दृढ विश्वास, सकारात्मक दृष्टिकोन, जिद्द, उत्साह इतरांपेक्षा वेगळे काम करण्याची इच्छाशक्ती व्यक्तीला उंचावर नेऊन ठेवते. आणि जिवनातील खरी सार्थकता यातच आहे. आपल्याला मिळालेले आयुष्य खूपच थोडे आहे. या थोड्या आयुष्यात आपल्याला खूप काही करायचे आहे. अशी इच्छाशक्ती ठेवून जीवनातील सुंदरता वाढवता येईल.

'जीवन किती सुंदर आहे,
अनुभव तुम्हाला सांगत जाईल,
प्रयत्न करायला विसरु नका,
मार्ग तुम्हाला सापडत जाईल.

आपण जी मोठी माणसं पाहतो. त्यांना मोठी माणसे म्हणतो. खरं तर ती मोठी नसतात. त्यांच्यातील माणुसकी त्यांना मोठे करते. स्वत:तील माणुसकी हा गुण विकसित केला पाहिजे. व्यक्तीने आपल्या जीवनात पुढील प्रश्नांचा विचार केला पाहिजे. मी कोठून आलो आहे ? मला कोठे पोहचायचे आहे ? माझे जीवन कोण चालवतो ? या प्रश्नांचा सतत विचार करणे म्हणजे जीवन विकासाची पहिली पायरी चढण्यासारखी आहे. प्रत्येक माणसाच्या आयुष्यात दु:ख येत असतात, पण पाण्यात राहणाऱ्या माशाइतके दु:ख कोणालाच नसते.

॥ माशासारखे या जगात कोणीही दु:खी असत नाही, कारण त्याचे अश्रू कोणालाही दिसत नाही.॥

दु:ख भोगायचे की, त्याच्याकडे पहायचे हे प्रत्येकावर अवलंबून असते. शाहणी माणसे तटस्थ राहून दु:खाकडे बघत असतात. त्यांना माहीत आहे हा जीवनातील चढ थोड्या दिवसांचा आहे. माणसानां दु:ख वेदनेमुळे होत असते. वेदना म्हणजे तरी काय ? तर आपल्याला आवडणारी व्यक्ती आपल्याला न आवडेल असे वागते. आपणाच आपल्या माणसामुळे दु:खी होतो. वाटेवरुन जाणाऱ्या व्यक्तीमुळे आपर दु:खी होत नाही. आपल्याला आवडणारी गोष्ट आपल्या व्यक्तीने कराव्यात अशी आपली खुळचट अपेक्षा असते. पण आपल्याला आवडणारी प्रत्येक गोष्ट चांगली असते, असे नाही. कारण चांगल्या गोष्टी सर्वांनाच आवडत असतात असे नाही. त्यामुळे वेदना होतात आणि जिवनातील आनंद दूर जातो.

जीवनात अनेक माणसे भेटतात, काही दु:ख



Scanned with CamScanner

देतात तर काहीवर जीव ओवाळून टाकावा असे वाटते. आदर्श वाटणारी काही माणसे वाईट कार्य करताना खूप दिसतात. त्यातच दु:ख खूप असते, अपंगाने अपंगासारखे वागले तर वाईट वाटत नाही. पण चांगल्या माणसाने अपंगासारखे वागले तर त्याचे दु:ख सहन होत नाही.

अशा या सुख-दु:खाच्या लपंडावात भौतिक सुखाच्या मागे न धावता आनंद मिळविण्याचा प्रयत्न केला पाहिजे, सुख क्षणभंगूर असते, पण आनंद चिरकाल टिकणारा असतो. असा आनंद मिळविण्याचे प्रयत्न करुन जीवनाची सार्थकता ओळखू या !

----***----

## प्रश्नचिन्ह....?

सर्वांभोवती फुले असती तर,
स्वप्नात काय आले असते ?
सर्वांच्याच ओठावर हसू असते तर
हृदयाच्या हुंदक्यांनी काम केले असते ?
सर्वांच्या सोबत सुख असते तर
दु:ख कोठे गेले असते ?
सर्वांनाच आकाशात उडता आले तर
प्रयत्नांनी काय केले असते ?
मानवी जीवनातील सर्व प्रश्न सुटले असते तर
प्रश्नचिन्ह कोठे दिले असते ?
यासाठी प्रश्नचिन्ह हे हवे असते....

- चव्हाण अर्चना अनिल,
द्वितीय वर्ष (बी.कॉम.)

## आज आणि उद्या



आज आणि उद्या
फरक खूप असतो
आजची साथ उद्या
नसेल ही कदाचित
सुखात आहे, सोबती सर्व
दु:खात कुणी, नसेल ही कदाचित
आज आणि उद्या
किती-किती हे अंतर
युगे-युगे घडतील इथे
क्षणा-क्षणानंतर
आज आणि उद्या
कुणी हसतो, तर कुणी रडतो
मागे वळून बघता-बघता
पुढे चालता-चालता पडतो
आज आणि उद्या
कोण काय करतो
बघायचं फक्त उघड्या डोळ्यांनी
कोण कसं बदलतो.

- शेळके सोनाली संपत,
प्रथम वर्ष (बी.ए.)



Scanned with CamScanner

# आजचा स्वतंत्र भारत

हर्षल सिताराम भालेराव, प्रथम वर्ष (बी.ए.)

आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरची आणि आत्ताची परिस्थिती कशा प्रकारची आहे ? देशाला स्वातंत्र्य मिळूनही त्या स्वातंत्र्याचा खरा आस्वाद भारतीय जनतेला घेता येतो का ? हे या लेखात स्पष्ट केले आहे. तसेच समाजातील दु:ख अन्याय या गोष्टी स्पष्ट करण्याखेरीज आपला देश, आपल्या देशाविषयीचे प्रेम, त्याबद्दलची आस्था, एक नागरिक म्हणून स्वत:चे कर्तव्य व स्वातंत्र्याचा खरा अर्थ माणूस कसा विसरत चालला आहे. या गोष्टींबद्दलचे विचार या लेखात स्पष्ट केले आहे.

आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अनेकांनी अनेक प्रकारची बलिदाने दिली. स्वातंत्र्य मिळवण्याचा हेतू खूपच वेगळा होता. पण आजची परिस्थिती पहाता या गोष्टीचे गांभीर्य कोणतही आढळत नाही. ही वास्तव परिस्थिती आहे. देशाबद्दलची, स्वातंत्र्या बद्दलची जबाबदारी न घेता ती झटकून कशाप्रकारे दिली जाते हे दिसून येते. आज समाजात देशाबद्दल, व्यक्तीबद्दल प्रेम, जिव्हाळा व व्यक्तीने केलेल्या महान कार्याबद्दल कमी प्रमाणात दखल घेतलेली दिसून येते.

आजही आपल्या देशात असत्याचाच विजय होतो. गरीबांना न्याय मिळत नाही. माणसांचे जीवन चिंतांनी आणि भितीने ग्रासलेले आहे.

मनातल्या मनात वाटते ।<br>
तुमची निवांत भेट घ्यावी ॥<br>
निदान तुमच्या जयंतीला ।

म्हणजे कुठेतरी गांधीजींच्या आदर्शांचा विचारांचा प्रचार, प्रसार व कृती लोप पावत चाललेली दिसते. स्वतंत्र देशामध्ये राहूनही माणूस वाईट सवयींचा, पश्चिमात्य देशातील अंधानुकरणाचा कसा गुलाम होत राहीला आहे हे कवी बापट अत्यंत मार्मिक पद्धतीने सांगतात.''सनातन संस्कृती, वय वाढले आज वाढत्या वयात तरी थोडी कमीच वाटते लाज.'' यावरुन समाजातील प्रत्येक पिढीची वागणूक काळानुसार कशी बदलत चालली आहे हे समजते. आज प्रत्येक जण स्वार्थी आहे. स्वत:चाच विचार कसा करता येईल यासाठीच भारतीय जनता धडपड करीत आहे. स्वातंत्र्यासाठी अनेक समाजसुधारकांनी आपले उभे आयुष्य खर्च केले. त्यांच्या उपदेशांचे विस्मरण आजच्या पिढीला होत चालले आहे. माणूस म्हणून त्यांनी केलेले कार्य त्यांचे आदर्श जीवन समजून न घेता, त्यांना देवत्व देऊन फक्त नमस्कार करुन लोक आपल्या जबाबदाऱ्या बेजबाबदारपणे झटकतांना दिसतात. आजच्या या स्वतंत्र भारतात लोचटपणा, लबाडी, फसवणूक, व्याभीचार, अत्याचार, स्त्रियां संबंधीत असुरक्षितता या देशात घडताना दिसून येतात. मग खरोखरच या देशाला स्वतंत्र्य म्हणता येईल का? असा विचार आजच्या पिढीसमोर उभा राहिला आहे. या लेखात दु:खी पिडीत लोकांचे दु:ख वाचकांपर्यंत पोहोचवणे व सर्वांमध्ये जीवनमूल्य रुजवण्याचा प्रयत्न केला आहे.

----***----

# रंग मैत्रीचे....

वायकंडे पूजा नारायण, प्रथम वर्ष (बी.ए.)

दोन व्यक्तींची ओळख होते. ओळखीचे रुपांतर मैत्रीत होत आणि बऱ्याचदा या मैत्रीचे रुपांतर प्रेमात होते. प्रत्येक मैत्रीचे प्रेमात रुपांतर होत नसते. मैत्रीत मर्यादा नसतात. कारण मैत्री हीच एक मर्यादा आहे. मैत्री ही दोन मित्रामध्ये, दोन मैत्रीणींमध्ये, एका मुलामध्ये व एका मुलीमध्ये तसेच आई व मुलीमध्ये किंवा मुलामध्ये इत्यादींमध्ये होऊ शकते. कारण मैत्रीला वयाचे बंधन नसते.

प्रेम ही निरागस, निष्पाप भावना आहे. आईचे मुलावरील प्रेम जसे निष्पाप असते तसेच दोन मित्रांमधील प्रेमही निष्पापच असते. बालपणाची मैत्री, शाळेतील मैत्री, तारुण्यातील मैत्री हे मैत्रीचे प्रकार नसून ते मैत्रीचे स्वरुप आहे. जे वयानुसार बदलत जाते. बालपणीची मैत्री निरागस, निष्पाप, मैत्रीचा अर्थही न कळणारी. शाळेतील मैत्री म्हणजे एकमेकांची सोबत, तर तारुण्यातील मैत्री ही आयुष्यभराची शिदोरी असते. मैत्रीचा खरा अर्थ कळतो तो याच वयात. तारुण्याचे अविष्कार, स्पंदन आणि हुंकार व्यक्त करण्यासाठी मित्रासारखे दुसरे विश्वसनीय ठिकाण नाही आणि म्हणूनच या वयात गरज भासते ती एका मित्राची किंवा मैत्रीणीची ! जो आपला जाणारा तोल सांभाळू शकेल, असा की ज्याच्या मैत्रीत स्वार्थ नसेल, मत्सर नसेल.

कोणतेही नाते जोडण्यापेक्षा ते टिकविणे अधिक अवघड असते. मित्र आपली कर्तव्य पार पाडणारे असावेत. मैत्रीचे प्रकार व्यक्तीच्या स्वभावावरुन, परिस्थितीवरुन पडतात. १) सुखाचे सोबती – एकमेकांशी असलेले संबंध करमणुकीचे आणि मजेचे असतात. तोपर्यंत ही मैत्री टिकते. २) स्वार्थापुरते सोबती – जव्हा लोक काही विशिष्ट फायद्यासाठी मैत्री करतात, तेव्हा अशी मैत्री होते व गरज संपते. तेव्हा मैत्रीही संपते. म्हणतात ना, 'गरज सरो नी वैद्य मरो'. ३) खरी मैत्री – अशी मैत्री एकमेकांबद्दल आदर व कौतुक यावर आधारलेली असते. मैत्रीला आपल्या आयुष्यात खूप महत्त्व असते. ज्याप्रमाणे तप्त वाळवंटातील मनुष्याला पाण्याचे महत्त्व असते. तितकेच कदाचित त्याहूनही जास्त महत्त्व असते ते मैत्रीला. कारण त्यातूनच आपण एकमेकांची मने जपायला, नाती सांभाळायला, कर्तव्य पार पाडायला शिकत असतो. मैत्रीचे नाते हे विश्वासावर अवलंबून असते. त्या नात्याला मर्यादा नसतात. ''मैत्री'' ही मर्यादा ओलांडल्यास त्या नात्याला वेगळीच पालवी फुटते ती म्हणजे प्रेमाच्या नात्याची. मैत्री तोडणे खूप सोपे असते, पण ती निभावणे तितकेच अवघड असते आणि ते देखील एक कसब असते. मैत्री ही रेशमी बंधनासारखी असते. ती नाजूक, पवित्र, भावनिक, मार्मिकपण वेळेवर तितकेच कठीण, दृढ निश्चयी ! कारण ती आपल्या मनावर खोलवर रुजलेली असते. आजकालचे कॉलेज तरुण-तरुणी आपल्या सोबत असलेल्या आपल्या वर्गातील ज्यांच्याशी आपण रोज बोलतो, वेळ घालवतो त्यांनाच मित्र, मैत्रिणी म्हणतात. मैत्रीच्या कसोटीवर आपणही खरे उतरलो पाहिजे. आपल्याकडे कुणीतरी विश्वासाने

पुढील पानावर –



Scanned with CamScanner

# कर्तव्यदक्ष बाप.... !

हिंगे भारती, प्रथम वर्ष (बी.कॉम.)

'आई ! आई ! आई !' ही दोनच अक्षरे आपल्याला खूप काही सांगून जातात. या दोनच अक्षरात माधुर्याचा सागर आहे. चंद्राची शितलता, पृथ्वीची क्षमाशिलता, अशी अनेक महाकाव्ये आहेत. पण खरंच अनेकदा आईचेच गुणगान गायले जाते. मग या बापाने काय केले ? असा प्रश्न मनाला बाचत असतो.

खरे तर देवकी, यशोदाचे कौतूक अवश्य करावे, पण पुरातून पोराला डोक्यावर घेऊन जाणारा वासुदेव लक्षात ठेवावा. राम हा कौशल्येचा पुत्र अवश्य असेल पण पुत्र वियोगाने तडफडून मरण पावला तो पिता दशरथ होता. वडीलांच्या टाचा झिजलेल्या चपलांकडे बधितले की, त्यांचे प्रेम कळते, त्यांचे फाटके बनियन बधितले की कळते आमच्या नशिबाची भोक त्यांच्या बनियनला पडली, त्यांची दाढी वाढलेला चेहरा बधितला की, त्यांची काटकसर दाखवितो, मुलीला गाऊन घेतील, मुलाला लुंगी घेतील, पण स्वतःला मात्र जुनीच पॅन्ट वापरतील. मुलगा सलूनमध्ये वीस पंचवीस रु. खर्च करतो. मुलगी पार्लरमध्ये खर्च करते, पण त्यांच्या घरातला बाप दाढीचा साबण संपला म्हणून आंघोळीच्या साबणाने दाढी करतो. अनेकदा तो नुसते पाणी लावून दाढी करतो.

बाप आजारी पडला तर लगेच दवाखान्यात जात नाही. कारण डॉक्टर एखादा महिना आराम करायला लावतील याची त्याला भिती वाटते. कारण पोरीचे लग्न... पोराचे शिक्षण बाकी असते. घरात उत्पन्नाचे दुसरे साधन नसते. ऐपत नसते तरीही मुलाला मेडिकल, इंजिनियरींगला प्रवेश मिळवून दिला जातो. ओढाताण सहन करुन मुलाला दर महिन्याला पैसे पाठवले जातात. पण सर्वच नसतील तर काही मुले असेही असतात की, ज्या तारखेला पैसे येतात. मित्रांना परमीट रुममध्ये पार्टी देतात आणि ज्या बापाने पैसे पाठवले त्याच बापाची टिंगल करतात. एकमेकांना बापाच्या नावाने हाका मारतात.

आई घराचे मांगल्य असते, तर बाप घराचे अस्तित्व असतो. ज्या घरात बाप आहे. त्या घराकडे वाईट नजरेने कोणीही बघू शकत नाही. कारण घरातला

---

मागील पानावरुन - पाहिले पाहिजे. आपले मन मोकळे केले पाहिजे. हे नाते प्रत्येकालाच समजण्याइतके साधेही नसते. एकाच्या मनातील भावना दुसऱ्याला समजतात. यालाच 'मैत्री' म्हणतात. प्रेमापेक्षा पवित्र असते ती 'मैत्री'. 'भाऊ-बहिण' चे नाते पवित्र मानले जाते. परंतु कॉलेज जीवनात मानलेला भाऊ किंवा मानलेली बहिण अशा नात्यांना चुकीचे समजून त्यांच्यात 'नक्की काय आहे ?' याचा शोध सुरु होतो. एखादी मुलगी एखाद्या मुलाशी बोलताना मन मोकळेपणाने हसतांना दिसली की, जवळच्या व्यक्ती तिला दोष देतांना दिसतात. आज एकेमकांची मने कळण्यासाठी काळाची गरज म्हणून निःस्वार्थी मैत्री असणे आवश्यक आहे. यातूनच सहकार्याची भावना निर्माण होते.

कर्ता जिवंत असतो. तो जरी काहीही करत नसला तरी तो त्या पदावर असतो. आणि घराचेच काम बघत असतो. सांभाळत असतो. कोणाचा मुलगा होणे टाळता येते, पण बाप होणे टाळता येत नाही. पण बाप कधीच बाप होण्याचे टाळत नाही.

आई होण्याला बापामुळे अर्थ असतो. कोणत्याही परीक्षेचा निकाल लागल्यावर आई जवळची वाटते. कारण ती जवळ घेते, कवटाळते, कौतूक करते. पण गुपचूप जाऊन पेढ्याचा पुडा आणणारा बाप कोणाच्याच लक्षात राहत नाही. आईच खूप कौतूक होते, पण हॉस्पिटलच्या आवारात वावरणाऱ्या त्या बाळाच्या बापाची कोणीही दखल घेत नाही. चटका बसला, ठेच लागली, फटका मारला तर तोंडातून आई शब्द बाहेर येतो. छोट्या संकटांसाठी आई चालते, पण मोठमोठी वादळ पेलतांना बापच आठवतो, कोणत्याही मंगल प्रसंगी घरातील सर्वजण जातात, पण मृत्युच्या प्रसंगी बापालाच जावे लागते. कोणताही बाप श्रीमंत मुलीच्या घरी जास्त जात नसतो, पण गरीब लेकीच्या घरी उभ्या उभ्या का होईना चक्कर मारतो. तरुण मुलगा उशीरा घरी येतो, तेव्हा बाप जागा असतो. मुलाच्या नोकरीसाठी लाचार होणार बाप. मुलीच्या स्थळांसाठी उंबरठे झिजवणारा बाप किती ग्रेट आहे ना ?

वडिलांचे महत्त्व कोणाला कळतं ? लहानपणी वडील गेल्यावर अनेक जबाबदाऱ्या खूप लवकर पेलाव्या लागतात. त्यांना एकेका वस्तूसाठी तरसावे लागते. वडीलांना खऱ्या अर्थाने समजून घेते ती म्हणजे मुलगी. सासरी गेलेल्या मुलीला बापाशी फोनवर बोलतांना बापाचा बदललेला आवाज एका क्षणात कळतो. ती अनेक प्रश्न विचारते. त्या प्रश्नांना हसून उत्तरे देणारा तो बाप असतो.

# Thoughts of Swami Vivekananda

That man has reached immortality who is distrubed by nothing material.

The moment I have realized God sitting in the temple of every human body, the moment I stand in reverence before every human being & see God in him that moment. I am free from bondage, everything that binds vanishes, and I am free.

The more we come out and do good to others the more our hearts will be purified & god will be in them.

The Vendanta recognizes no, sin it only recognizes error. And the greatest error, says the vedanta is to say that you are weak, that you are a sinner, a miserable creature, and that you have no power and you cannot do this and that.

The will is not free. It is a phenomenon bound by cause and effect, but there is something behind the will which is free.

The world is the great gymnasium where we come to make ourselves, strong.

Truth can be stated in a thousand different ways yet each one can be true. (Thoughts live they travel far.)

----***----

Vadhavane Dipali Suresh - F.Y., B.Com.



Scanned with CamScanner

## स्वच्छता अभियान

मैं नहीं तू, तू नहीं मैं
सदा ही करते, तू तू मैं मैं
करो कभी, कोई अच्छा काम
बढाये जो, भारत देश का नाम
देश की धरोहर पर है, सबका अधिकार
फिर क्यूँ है इसकी सफाई से इन्कार
नहीं हैं कोई बहुत बडा उपकार
बस करना हैं जीवन में बदलाव
शहर को मानकर घर अपना
निर्मल स्वच्छ है उसे भी रखना
कूडे दान में फेंको कूडा
हर जगह ना फेंको पुडा
थुकने को नहीं है धरती मैय्या
बदलो अपनी आदत भैय्या
न करो किसी पडौसी का इंतजार
देश है सबका, बढाओ 'स्वच्छता अभियान'

– काळे योगेश निवृत्ती, प्रथम वर्ष (बी.कॉम)

## मनुष्य जगतो कशासाठी ?

मनुष्य जगतो कशासाठी
जो तो आपल्या स्वार्थासाठी
सगे–सोयरे आणि इष्टमित्र
असो कितीही जवळील गोत्र
प्रत्येकाचा मोठा स्वार्थ
जीवनात हा एकच अर्थ
श्रीमंतापुढे झुकवली मान
गरीबांना अन्नाची वाण
पैसा असाते मिळतो न्याय
गरीबांना मात्र सदा अन्याय
न्यायदेवतेची रित ही खोटी
डोळ्यावर तीने बांधिली पट्टी
ज्याला त्याला खुर्ची हवी,
खोटी आश्वासाने त्याने द्यावी
आश्वासनांच्या त्या आशेपोटी
मनुष्य जगतो स्वार्थासाठी

– कु. पाचोरकर पुजा अनिल,
द्वितीय वर्ष (बी.कॉम)



Scanned with CamScanner

## स्वच्छ भारत अभियान

जन्मलो या भारतात आम्ही,
भाग्य आमुचे छान...
आमच्या महाराष्ट्रात
शिवबाची मोठी शान...
शिवबाचे मावळे म्हणुनी,
आमुचा मोठा मान...
देशाच्या संरक्षणासाठी,
अनेकांनी दिले प्राणाचे बलिदान...
आजही सीमेवरती,
लढताय आमुचे जवान...
विकासाच्या मार्गाकडे,
आमुचे आहे ध्यान...
म्हणुन आमुची योजना,
स्वच्छ भारत अभियान... !!!

– कुटे मोनाली रामराव,
द्वितीय वर्ष (बी.ए.)

## आई....



आईसाठी काय लिहू,
आईसाठी काय लिहू
आईसाठी पुरतील एव
शब्द नाही कोठे
आईवरती लिहिण्या
इतपत नाही,
माझे व्यक्तीमत्व मोठे ।
जीवन हे शेत तर
आई म्हणजे विहीर.
आई तुझ्या कुशीत पुन्हा यावेसे वाटते ।
निर्दयी या जगापासून, दूर जावेसे वाटते ॥
कोणी न येथे कोणाचा, सारीच नाती खोटी ।
तुझ्यापाशी फक्त आता, नाते जपावेसे वाटते ॥
कोळून प्यायले मी, सुख-दुःख सारे ।
माते तुझ्या विरहास न प्यावेसे वाटते ॥
कित्येक रात्री ऐश्वर्यात लोळले मी ।
अखेरच्या क्षणाला तुझ्या कुशीत निजावेसे वाटते ॥
दगडातला तो देवही, आता नवसाविना पावेना ।
निस्वार्थ हृदय, माऊली तुलाच पूजावेसे वाटते ॥
असेल तर मजला, मानव जन्म कधी ।
आई तुझ्याच पोटी, पुन्हा जन्मावेसे वाटते ॥

– पटेल सोनम अयुब,
प्रथम वर्ष (बी.ए.)



Scanned with CamScanner

## बाबा....



आई, ताई, दादा
यांच्या पुढेही एक
अतूट नातं असतं.
त्या नात्याचं नाव असतं
**बाबा....**
हाताचे बोट धरुन चालायला शिकवणारे,
कामावरुन येतांना रोज खाऊ घेऊन येणारे,
पाठ दुखत असली तरी आपल्या मुलाला
घोडा बनून खेळवणारे
आजारी पडल्यावर काळजी पोटी उशाशी बसणारे...
आपल्याला हसवणारे आणि खेळवणारे,
आईने कधी मारले तर तिच्यावर रागावणारे,
आपली मुले मोठी व्हावीत म्हणून झटणारे,
आपल्या लेकरांसाठी उंच उंच अपेक्षा बाळगणारे...
वाईट वागल्यावर खूप ओरडणारे,
छोटी चूक झाल्यास ती पोटात घालून,
प्रोत्साहन देणारे, चांगले काम केल्यावर,
कौतूक करणारे, परीक्षेत कमी गुण
मिळवल्यावर तेवढेच रागावणारे....
सर्वांवर प्रेम करणारे व सर्वांना समजून घेणारे,
कधी वेळ आलीच, तर पाठिशी खंबीरपणे उभे राहणारे,
बालपणापासून खाल्ल्या त्यांनी परिस्थितीमुळे खस्ता,
कितीही संकटे आली गाठला उज्वल यशाचा रस्ता
आजपर्यंत आपल्या प्रेमळ वागण्याने किती मोठे कर्ज
दिले आम्हास मायेचे, कसे ऋण फेडू या जन्मदात्याचे...

– पटेल सोनम अयुब, प्रथम वर्ष (बी.ए.)

## गुरू....



हात धरुन चालायला
शिकविले ज्यांनी मला
गुरू म्हणतात,
जे शिक्षण देतात आम्हाला
पहिले गुरू ही आई असते,
तर दुसरे गुरू हे शिक्षक असतात
ज्ञान, कला, गुण दिले तुम्ही मला
दूर केले माझ्या अवगुणाला.... ॥१॥
रुपे दिसतात तीन तयाची
ब्रह्मा विष्णु महेश्वराची
गाते गाथा ही माझ्या गुरूची
लीला काय वर्णावी तयाची.. ॥२॥
अवतरली माऊली शिक्षणाच्या उदराला
आई होऊन माया लावली मजला
गुरू माऊली म्हणते मी तुम्हाला.. ॥३॥
शिक्षणाच्या चूका पदरात घेई
कारण माझे पहिले गुरू ही माझी आई
तुझ्या विन मजला कोणी नाही
म्हणून गुरू माऊली हा शिष्य
तुझेच गुणगाण गाई....
गुरु माझी आई...

– चव्हाण अर्चना अनिल, तृतीय वर्ष (बी.कॉम)



Scanned with CamScanner

## शब्दांचे महत्त्व....

कशी सुचली ही कविता कसा घातला हा मेळ
काही नाही शब्द शब्दात गुंतले सुरु झाला
हा खेळ
खेळ खेळताना शब्द मला सुचू लागले
मनात माझ्या काहीही येऊ लागले... ॥१॥
मग अक्षर अक्षर एकत्र आले
अक्षराचे शब्दात रुपांतर झाले
शब्दा शब्दांनी ओळ लिहिली
मनात रचनेची निर्मिती झाली... ॥२॥
बाकी उरले शब्द काही
त्या शब्दांमध्ये माझा जीव लई
पेनची संपत आली शाई
नाहीतर लिहायचे होते खूप काही...॥३॥
जरी पेनची संपत आली शाई
मनात राहिले खूप काही
पुन्हा लिहिण्याची केली घाई
शब्द सांगून जातात खूप काही.... ॥४॥

– चव्हाण अर्चना अनिल,
तृतीय वर्ष (बी.कॉम)

## जिवंतपणा

ज्या क्षणी तुम्ही मरण पावता
त्या क्षणी तुमची ओळख
एक बॉडी बनून जाते
बॉडीला आणा, बॉडीला झोपवा ॥१॥
लोक तुमच्या नावाने सुध्दा
हाक मारत नाही
म्हणून आव्हाने स्वीकारा
आवडत्या गोष्टीसाठी खर्च करा
आवडत्या लोकांना वेळ द्या ॥२॥
पोट दुखेपर्यंत हसा
कोणी बालिश
म्हणाले तरी चालेल
मनसोक्त नाचा लग्नात, वरातीत,
जिथे भेटेल तिथे नाचा ॥३॥
अगदी लहान बाळासारखे जगा
कारण,
मृत्यू हा जीवनातला सर्वात
मोठा लॉस नाही, लॉस तर
तो आहे जेव्हा तुम्ही जिवंत
असूनही तुमच्यातला जिवंतपणा
हा मेलेला असेल ॥४॥

– गांगुर्डे मोहिनी मोतीराम, प्रथम वर्ष (बी.ए.)



Scanned with CamScanner

# आई - बाबा

जगात विसरा सर्वांना पण
आई-वडीलांना कधी विसरु नका
अनंत उपकार आहेत त्यांचे
ही गाष्ट कधी विसरु नका ॥१॥
स्वतः राहून उपाशी
दोन वेळचे जेवण तुम्हाला दिले
तुम्हाला झोपवून सुखात
स्वतः ओल्या जागी झोपले ॥२॥
रक्ताचे पाणी करुन
घाम गाळून कष्ट तुमच्यासाठी केले
अंगावर टाकीचे घाव सोसून
सुखात तुम्हाला वाढविले ॥३॥
अशा पवित्र व्यक्तींची मने
कधी दुखवू नका
अमृत भरविले तुम्हाला त्यांनी
त्यांच्यासाठी विष ओतू नका ॥४॥
देव प्रत्येकाच्या घरी जाऊ
शकत नाही म्हणून
निर्माण केले त्याने
आई-बापाला ॥५॥
म्हणून भक्त बनून त्यांची
सेवा करा
दुखवा सर्वांना पण
आई-वडीलांना कधी दुखवू नका ॥६॥
अनंत उपकार आहेत त्यांचे ही गाष्ट कधी विसरु नका.

– गांगुर्डे निकिता लक्ष्मण, तृतीय वर्ष (बी.ए.)

# साम्य आईचे-गाईचे



इकडे पुण्य गाय, तिकडे पुण्य माय
तेहतीस कोटी देव, जीचे धरती पाय ॥धृ॥
जन्म देते जननी, मानवी रुपात
सुखविते माय, पशु स्वरुपात
साम्य आईचे, गाईचे कुणा कळेल काय ।
तेहतीस कोटी देव, जीचे धरती पांय ॥१॥
गाई ती गायत्री, आई ती सावित्री
शक्ती एक स्त्री, जणू काय छत्री
कृतज्ञ करी आणि जिच्या ठाई न्याय
तेहतीस कोटी देव, जीचे धरती पाय ॥२॥
प्रिय होते गो धन, हरी गोविंदाला
गाय जीव प्राण, असे मुकुंदाला
गो मातेची केव्हा, घेऊ नये हाय
तेहतीस कोटी देव, जीचे धरती पाय ॥३॥
गो रसाची शक्ती, अनंत प्रभावी
माता परोपकारी, पूजा जीची व्हावी
गोपाळांचा तिजवीण खुंटतो उपाय
तेहतीस कोटी देव जीचे धरती पाय ॥४॥

– पूजा भालेराव, प्रथम वर्ष (बी.कॉम.)



Scanned with CamScanner

# आनंदाने जगणं हक्क आहे माझा...!




नाही ना सहन होत, मग विचारा स्वत:ला
मी का ? सहन करतोय हे,
होतोय ना त्रास मग विचारा स्वत:ला की,
या त्रासाला जबाबदार कोण
चिड-चिड होतोय
खूप त्रास होतोय
कुणाचा कशामुळे
आणि हा सारा त्रास मी मुळात का
करुन घेतोय.
विचारा स्वत:ला
खूप उध्वस्त वाटतंय, खूप रडू येतेय
खूप असहाय्य वाटतेय
कुणामुळे, कशामुळे, कशासाठी ?
हे सारे प्रश्न विचारा स्वत:ला
की, कुणी केलीय माझी ही अवस्था
कोण खेळवतयं मला ।
आणि मी असं का ? दुसऱ्याच्या हातातील
बाहुली झालीय ?
हे आपण विचारावं स्वत:ला
खूप, खूप विचारलं की,
उत्तर ते मिळतं
आणि ते बोलतं
त्रास होतोय ना तुला
उदास वाटतय तुला
छळ तुझा होतोय
जीव तुझा तुटतोय
दु:ख तुला झालय
मुलगी म्हणून जन्माला आलीय
मग उपाय तूच कर...
बंद करुन घे, दुनियेचा त्रास करुन घेण
आनंदी रहा, तुझा अधिकार आहे
स्वत:साठी जगणं तुझा हक्क आहे
हक्क मिळवण आणि झुगारुन सारी ओझी
मला जगायचं. मी जगणार आहे.
आनंदाने स्वत:साठी
न कुढता.... न चिडता ।
जमेल तुला नक्की !

– पूजा भालेराव, प्रथम वर्ष (बी.कॉम.)



Scanned with CamScanner

## बाळाला शाळेत घाल...



तुझ्या बाळाला शाळेत घाल,
सहा वर्षाचा झाला तो काल ॥धृ॥
शाळेत नोंदवा ना त्याचं नाव,
जन्मतारीख, जात अन् गाव,
नित्यनेमे त्यास शाळेत धाडावं
जाईल शाळेत सांजसकाळ ॥१॥
शिकूण सवरुन होईल शहाणा,
होईल हुशार कसा पहा ना,
नाही करणार आळस, बहाणा,
सुखी जीवन त्याचं महान ॥२॥
लिहणं, वाचणं सारेच होईल
कुटूंब तुमचं शहाणं होईल
अज्ञान सारेच पळून जाईल
नवं शिक्षण तुम्ही घ्याल ॥३॥
गाणी, गोष्टीत रंगून जाणार
नाना क्षमता या विकसित होणार
नाही घराची आठवण येणार
सुरु जीवनाचं नवं हे साल ॥४॥
शिक्षणाला या पर्याय नाही
शाळेत जातील भाऊ अन् ताई
होईल ज्ञानांची त्यांच्या कमाई

– पूजा भालेराव, प्रथम वर्ष (बी.कॉम.)

## बहिणीची माया



माझ्या बांधवा वसंता तूच माझा पंचप्राण
जन्मभरी दादा तुला, पडू नये कसली वाण ॥ धृ ॥
बहिणींचा विसावा तू, चोळी बांगडीचं देणं
भगिनीला कोण जगी ? सख्या भावाच्या वाचून
जन्मभरी दादा तुला, पडू नये कसली वाण ॥१॥
रक्षा बंधनाच्या दिनी, राखी तुला मी बांधीन
रक्षण करण्याचे, वचन ते मी घेईन
जन्मभरी दादा तुला, पडू नये कसली वाण ॥२॥
भाऊबीजेच्या दिवसाला आनंदाने ओवाळीन
गोड गोड घास तुला हाताने भरवीन
जन्मभरी दादा तुला, पडू नये कसली वाण ॥३॥
जरी चोळी बांगडीचा, आज खरा आहे मान
चालेल ती नसली जरी, मला भेटावं प्रेमानं
जन्मभरी दादा तुला, पडू नये कसली वाण ॥४॥
भाऊ-बहिणीची माया, कृष्णा द्रौपदी समान
अनंत करील तुजला, जगी या आयुष्यमान
जन्मभरी दादा तुला, पडू नये कसली वाण ॥५॥

– पूजा भालेराव, प्रथम वर्ष (बी.कॉम.)



Scanned with CamScanner

# One Tree Less

One Tree Less means "Nothing?"
One Tree Less means
that much less shade
One Tree  Less means
that much less oxygen
One Tree Less means
that much move pollution
One Tree Less means
that many animals without shelter
One Tree Less means
that much less water
One Tree Less means
that much move heat
One Tree Less another tree less
anther less, less trees means
"Nothing in the end Nothing.."
"Plant more trees"
"Plant more trees"
"Grow more trees"
"Grow more trees"

- Jadhav Yogita sampat,
F.Y. B.Com.

# बहीण - भावाचे नाते

बहीण-भावाचे नाते सोनेरी साज असतो
प्रेमाच्या राशीवरचे चक्रवाढ व्याज असते,
बहीण-भावाचे नाते सावली देणारा वड असतो
आंबट गोड द्राक्षांचा लुसलुशीत घड असतो
बहीण-भावाचे नाते काहीसे अबोल असते
मनो अंगणी खेळणारे इवलेसे बाळ असते
बहीण-भावाचे नाते श्रावणातला झुला असतो
माझ्या आधी तुला तुझ्यानंतर मला असतो
बहीण-भावाचे नाते थोडेसे हट्टी असते
एका क्षणाला कट्टी तर, दुसऱ्या क्षणाला गट्टी असते
बहीण-भावाचे नाते एकमेकांच्या डोळ्यातले
अश्रू पुसणारे रुमाल असते
बहीण-भावाचे नाते हातात हात धरुन चालणारे
बालपणाचे सोबती असते.
बहीण-भावाचे नाते एकाच अनमोल रक्ताचे असते
बहीण-भावाचे नाते सुख-दु:खात साथ देणारे आधार
असते
बहीण-भावचे नाते आयुष्यभराचे सुरक्षा कवच असते
बहीण-भावाचे नाते आयुष्यात कधीतरी एकमेकांपासून
दूर जाणारे असते, परंतु एकमेकांच्या आठवणी
कायमच्या मनात ठेवणारे असते.
बहीण-भावाचे नाते अनमोल राखीचे एक पवित्र बंधन
असते.
बहीण-भावाचे नाते शब्दात व्यक्त करणे शक्यच नसते.
ते महासागराहून खोल असते
ते महासागराहून खोल असते....!

- कुंभार्डे गितांजली संजय, प्रथम वर्ष (बी.ए.)



Scanned with CamScanner

## जगण्याची आस...



मुलगी म्हणून मला इथे जगायचं आहे
माणसाचं सुंदर जग मलासुध्दा बघायचं आहे.
मुलगी होणार समजताच बाबा का गं बावरतात ?
कुस तुझी वांझ करण्या वैद्याच्या दारी वावरतात
मुलगी असेल तरी जन्म मला देशील का ?
आई, शप्पथ खरं सांग पदराआड घेशील का ?
जरी हवी असतील पत्नी, बहीण अन् माय
मग या जगी बाबा मुलीचा जन्म नको काय ?
''होय बाळा ! खरंच माझं चुकलं
अहिल्या, सावित्री, जिजाऊ, लक्ष्मीत
रुप तुझं मला दिसलं
मुली तुझ्या जन्माचा नाही करणार ऱ्हास
वचन देतो पूर्ण करेन तुझ्या जगण्याची आस....
वचन देतो पूर्ण करेन तुझ्या जगण्याची आस.....

– कुंभार्डे गितांजली संजय,
प्रथम वर्ष (बी.ए.)

## मैत्री....

मैत्री असावी पाण्यासारखी
निर्मळ, नितळ, स्वच्छ जशी ॥
मैत्री असावी समुद्रासारखी
उधाण आलेल्या बेधुंद लाटच जशी ॥
मैत्री असावी घनदाट वृक्षा सारखी
थकलेल्या जीवाला सावली देणारी ॥
मैत्री असी स्वच्छंदी
फुलपाखरा सारखी ॥
मैत्री असी नात्यां पलिकडची
जात, धर्म, वय, भाषा झुगारणारी ॥
मैत्री असावी अशी की, शब्दांत न मांडता येणारी
पण सुख–दु:खात नि:शब्द साथ देणारी अन् चिरंतन
टिकणारी....

– निकम निलम सुभाष,
द्वितीय वर्ष (बी.कॉम.)

# आई वडीलांना कधी विसरु नका....

विसरा सर्वांना पण आई-वडीलांना विसरु नका
अनंत उपकार आहेत त्यांचे ही गाष्ट कधी विसरु नका
अरे तुमच्या जन्मासाठी पाषाण बनून आई वडीलांनी
लहानाचे मोठे केले, त्यांचे हृदय कधी दुखवू नका.
मुखातील घास काढून अरे !
ज्यांनी तुम्हाला मोठे केले, अमृत पाजले,
तुम्ही त्यांच्यासाठी विष ओकू नका.
किती केले गोड कौतूक पूर्ण केल्या इच्छाही
आता तुम्ही पूर्ण करा त्यांच्या इच्छा
ही गोष्ट कधी विसरु नका
लाखो कमवीत असाल तुम्ही पण
आई-वडीलांपेक्षा जास्त नाही
सेवेवाचून सर्व राख आहे
तुम्ही गर्वाने कधी फुगू नका
मुलांकडून सेवा इच्छीत,
तर मुलगा बनून सेवा जसे करावे तसे भरावे
हा न्याय कधी विसरु नका
स्वतः ओल्यावर झोपूनही झोपविले तुम्हाला कोरड्या
जागी. आईच्या या प्रेमळ नेत्रामध्ये
चुकूनही अश्रू आणू नका.
जिने फुले आच्छादली होती क्षणोक्षणी तुमच्या मार्गात
त्या मार्गदर्शकाच्या मार्गातील
तुम्ही काटे कधी बनू नका.

– गुमणार कांचन माधवराव,
प्रथम वर्ष (बी.ए.)

# बलिदान....



स्वातंत्र्याच्या रक्षणार्थ
बलिदान ज्यांनी केले ॥
त्यांची आठवण होता
डोळे होती पुन्हा ओले ॥
ओलसर डोळ्यांपुढे
झुंझल्याचे चित्र पाही ॥
जखमांच्या पदकांनी
आठवण मनी राही ॥
कर्तव्याच्या भावनेने
दृढ त्यांनी झालेलं ॥
घरदार सोडतांना
प्रथापाश तोडतांना ॥
रण देवतेशी नाते नवे जोडलेले
कणखर ब्रीद त्यांचे ॥
रक्तामध्ये नाहलेले
हाच खरा 'परमार्थ' ॥
हीच खरी 'देशभक्ती'
'देव' 'देश' नाही दोन ॥
एकरुप त्यांची 'शक्ती'
देशरुप त्यांना आज ॥
जीवनात लाभलेले
स्वातंत्र्याच्या रक्षणार्थ ॥
बलिदान ज्यांनी केले

– पुरकर मोहिनी सुकदेव,
द्वितीय वर्ष (बी.कॉम.)



Scanned with CamScanner

# कोणाची चूक ....
# तर शिक्षा कोणाला ...



खरं सांगतो आई-बाबा
काय केलं मी कळलं नाही
तुम्ही काहीही म्हणा मला
पण मरत मरत जगणं मला
जमलंच नाही.

विचारायचे आहेत मला
प्रश्न काही मनातले माझ्या
आतातरी उत्तरे द्यायला
आहे का वेळापत्रकात वेळ तुमच्या

जगत होतो ओझ्याखाली
स्वप्न अपेक्षा अभ्यासाच्या
सगळं पाही भविष्यासाठी
टेन्शन फक्त माझ्यासाठी

आवडलं नाही तरी गेलो
ड्रॉईंग क्लास, तबला, कराटेला
वेळापत्रकाचा बैलच मी
कधी वेळ काढू स्व अभ्यासाला

लक्ष नाही म्हणून शाळेत
वर्गाबाहेर केला उभा
तेव्हाच एका भूताने घेतला
माझ्या मेंदूचा मनाचा ताबा

तुमच्या सोबत मी पाहिले
अनेक ढिशुम ढिशुम पिच्चर
मनात तयार झाले चांगले
वाईट असें मिक्चर

खरं सांगतो आई-बाबा
मरण खूप भयंकर आहे
किती वाजवतो जगाचे दार
जे माझ्यासाठी आता बंद आहे

कसा झाला गं सईचा
शाळा प्रवेशाचा इंटरव्ह्यूव
वाटतंय एकदा तिला पाहू
दोघ भावंड मजेत राहू

खेळू द्या तिला ती भातुकली
काढून द्या शोकेसमधील बाहुली
प्लिज जगू द्या मुलांना सहजतेने
उमल द्या फुलांना कोमलतेने

का ? का आहे घाई तुम्हाला
आम्हाला मोठे करण्याची
सांडत लवंडत आमची
इवलीशी ओजंळ भरण्याची

विद्यार्थी आत्महत्येची कारणं
आतातरी जाणा तुम्ही
अहो ! तुम्हीच आम्हाला शिकवलं ना ?
पुढच्यांस ढेच मागचा शहाणा

खूपच आठवण येते हो तुमची
तुमच्या या लाडक्या छकुल्याला
देवाघरी गेलो कसा ते
प्लिज सांगू नका कोणाला

सर्व विसरुन तुझ्याच पोटी
यायचं आहे पुन्हा आई
कुशीत शिरुन ऐकायची आहे
गुणी बाळाची ती अंगाई

– धनाईत योगिता कैलास, प्रथम वर्ष (बी.कॉम)



Scanned with CamScanner

## मुलींनी वागावे तरी कसे ?

मन मोकळे पणाने समाजात वावरले,
तर म्हणतात पोरीला घर बंधन नाही
शांत धीर गंभीरपणे वागले तर म्हणतात,
फेस करण्याची हिंमत नाही
लवकर लग्न केले तर म्हणतात
एखादं लफड लपवायच असेल,
लग्नाला उशीर होत असेल तर म्हणतात,
मुलीत एखादी खोड असेल
खूप शिकलेली असेल तर काय कामाची ?
डोक्यावर मिऱ्या वाटेल,
मित्र मंडळी जास्त असतील तर
टवाळखोर असेल
आणि मित्र कमी असतील तर
एकलकोंडी असेल
मुलींनी या दुतोंडी दुनियेत
जगावे तरी कसे ?
खरंच....
काय वाटत असेल त्या मनाला
जे हे अन्याय अत्याचार सहन करत असेल.

– निखाडे सोनाली कैलास,
प्रथम वर्ष (बी.कॉम.)

## परवड

आई बापाची लाडकी
लाडाकोडात वाढली
भाळी बाशिंग बांधून
लेक सासरा धाडली
सासरच्या उंबऱ्यात
तिनं ओलांडल मापं
नाही सुटलं बाशिंग
आठवले मायबाप
माझा संसाराचा गाडा
मीच नेईल ओढून
तिचं फुटकं नशीब
गेला भर्तार सोडून
धागे तुटले सुखाचे
उभा दु:खाचा डोंगर
गेलं उडून पाखरु
नाही उरला आधार
तेल असून दिव्यात
गेली मंदावून वात
झाला भूईलाच भार
दुखलं गणगोत
नाशिबाचे दोरदावे
जीणं झालं अवघड
उभ्या आयुष्याची तिच्या
अशी झाली परवड

– बाविस्कर सपना मोहन, प्रथम वर्ष (बी.कॉम.)



Scanned with CamScanner

# गांधीजींना पत्र....

हे पत्र वाचुन बापूजी
व्हाल तुम्ही थक्क
कारण माणसाला अजूनही मिळाला नाही
खरा जगण्याचा हक्क
तुम्ही सांगितलेली अहिंसा
कुणीच पाळत नाही
रोज हिंसा करण्याचं
कुणीच टाळत नाही

रोज इथे पडतात
कितीतरी मुडदे
शहाणे कावळेच त्यावर
टाकतात सदा पडदे
स्वार्थासाठी दिला जातो
दुसऱ्याचा नेहमी बळी
विकासाच्या नावाखाली
भाजतात आपलीच पोळी

राजकारण इथं
होऊन बसला धंदा
सत्तेसाठी पक्ष
बदलतात कितीदा
तुम्हीच सांगितले बापूजी
खेड्याकडे चला
पण खेड्यातला बळी मात्र
भावावाचून मेला

सुखाने मिळत नाही
त्याला दोन घास
कर्जासाठी घ्यावा लागतो
गळ्याभोवती फास
पेपरात छापून येते
केली आत्महत्या
दारावर सुरु होतात
पांढऱ्यांच्या खस्त्या

सांगून टाकतात कुटूंबाला
मदत दिली जाईल
पण तुम्हीच सांगा बापुजी
जो गेला तो का परत येईल ?

– बाविस्कर सपना मोहन, प्रथम वर्ष (बी.कॉम.)



## मैत्रीचा अर्थ

मैत्री म्हणजे उधान आलेल्या
समुद्राच्या बेधुंद लहरी लाटा
मैत्री म्हणजे वय, जात, धर्म, भाषा इ.
झुगारुन जोडलेल्या असंख्य वाटा
मैत्री म्हणजे शब्दांत न मांडता येणार सर्व नात्यांच्या
पलीकडचं नातं
मैत्री म्हणजे सर्व नात्यांना अंतर्मनातून जोडत जातं
मैत्री म्हणजे कॉलेज कट्ट्यावरील टिंगल टवाळकी
आणि कैफियत मैत्री म्हणजे माणुसकीचं
झाड उगवण्यासाठी प्रेमाचं टाकलेलं हळवं खत.
मैत्री म्हणजे समोरच्याला सुख-दुःखामध्ये साथ देणं
मैत्री म्हणजे प्रत्येक वेळी समोरच्याला हात देणे.
मैत्री म्हणजे प्रत्येकाच्या आयुष्याचा नसतो नुसता दोन
शब्दांचा खेळ
मैत्री म्हणजे प्रत्येकाच्या सुख-दुःखातील क्षणांत
साथ देण्याची असते ती वेळ.

– निकिता लक्ष्मण गांगुर्डे

## अतिरेक्यांनो...!

सांगा तुमचे थैमान
किती दिवस चालणार आहे
चिरडून टाकू चुटकीसरशी
आमच्या डाव्या हाताचा मळ आहे ॥
नक्षा सारा उतरवून टाकू
एक क्षण पुरेसा आहे
'सालो साल लढते रहना'
हा आमचा इतिहास आहे ॥
पिसाळलेल्या औलादीची
आता खरी खैर नाही
छातीवरती झेलू गोळ्या
तुला 'गाडणे' गैर नाही ॥
दुष्ट इरादे कितीक तुमचे
उधळून लावू हातासरशी
चौका चौकातून उघड्यावर
प्रत्येकाला देऊ 'फाशी' ॥
किती बहाणे कराल सांगा
किती पुरावे खोटे
टाचेखाली चिरडून टाकू
'पुरुन' उरु एकटे ॥

– पवार सौरभ संजय,
प्रथम वर्ष (बी.ए.)



Scanned with CamScanner

## शिक्षक

शिक्षक म्हणजे ज्ञानाचा दीप
दिवा जसा अंधकाराचा नाश करुन
संपूर्ण घराला प्रकाशमान बनवतो.
तसेच शिक्षक विद्यार्थ्यांचं अज्ञान
दूर करुन त्यांचं भविष्य प्रकाशमान बनवतात.
कुंभार जसा मातीच्या गोळ्याला आकार देतो
तसेच शिक्षक आकार देतात एका मुक्तपणे बागडणाऱ्या
निराकार चैतन्याला.
शिक्षकांच्या अस्तित्वाने महत्त्व येते शाळा, कॉलेजला
कारण तेच तर असतात अंधार भरलेल्या चिमुकल्या
गोळ्यातून सूर्याचे तेज बाहेर काढणारे
शिक्षक नसतात कुणाचे वैरी
विद्यार्थ्यांचे असतात सोबती
व्यवस्थित समजावणे मुद्देसूद बोलणे
हीच तर असतात शिक्षकांची सूत्रे
विद्यार्थी शिक्षकांना आपले आदर्श मानतात
कारण तेच तर विद्यार्थ्यांचे भविष्य घडवतात
विद्यार्थ्यांचे जीवन उज्ज्वल करणारे,
ज्ञानाचे अमृत पाजणारे शिक्षकच असतात
शिक्षकच असतात.

– जव्हेरी कांचन छबूसिंग,
तृतीय वर्ष (बी.कॉम.)

## गैरमार्गाशी लढा

उठा मुलांनो उठा
आता अभ्यासा लागा
यशोशिखरांवर ठामपणाने
तुम्ही मिळवा जागा
वाचन लेखन करुन वाढवा
जीवनास्तव ज्ञान
दीप पेटवा तिमिर स्थळावर
हाकला अज्ञान
मोह दांभिकता चोरी लबाडी
हाकला क्षितीजावरी
कधीच नाही करणार कॉपी
येऊ द्या वाचेवरी
कॉपी करणे खूपच वाईट
तोटे बहू आठवा
अभ्यासाचे यश खरोखर
स्नेही जना पेटवा
सत् इमानी नम्रपणाने
सोडवा तुम्हीच तिढा
मुलांनो गैरमार्गाशी लढा

– तिडके पूनम संजय,
प्रथम वर्ष (बी.कॉम)



Scanned with CamScanner

# मैत्री

मैत्री म्हणजे प्रेम, मनाच्या चौकटीत जपलेली फ्रेम
मैत्री असते दोन शब्दांचा खेळ,
नसते निव्वळ छेडाछेडीचा वेळ
मैत्री म्हणजे प्रत्येक क्षणा क्षणातील सुख दु:खात साथ
देण्याची असते ती वेळ...
मैत्री म्हणजे साखर झोप,
खतपाणी घालून वाढलेले रोप
मैत्री म्हणजे दाद, आपल्या हाकेला दिलेली साद
मैत्री म्हणजे विश्वास, मोकळ्या जागी घेतलेला श्वास
मैत्री म्हणजे ध्यास, हवाहवासा वाटणारा सहवास
मैत्री म्हणजे चिंतन, असे क्षण ज्यांचे मनात केले जतन
मैत्री म्हणजे छाया, अतूट नाते अतूट माया
मैत्री म्हणजे गर्व, कधी न संपणारे पर्व.....

– आहेर पूनम राजेंद्र,
प्रथम वर्ष (बी.कॉम.)

# My India



Kasmhir for looking
Tamilnadu for cooking
Kerala for dance
Mysore for romance
Ahmadabad for mills
nagaland for hills
Bombay for beauty
Uttar Pradesh for p.m.
Delhi for Majesty
Rajastan for heroism
Bengal for writing
Punjab for fighting
Bihar for mines
Himachal for pines
Gujrat for pines
Madhya Pradesh for Health
Andhra Pradesh for working
Maharashtra for learning.

- Dhanait Yogita Kailas, F.Y.B.Com.



Scanned with CamScanner

# मुलगी

अश्रूच्या थेंबासारख्या असतात मुली.
देवाचा स्पर्श असतात मुली
उज्वल करतो एका वंशाचे नाव मुलगा
दोन कुळांची लाज राखते ती एक मुलगी
कोणीही नाही ये एकमेकांपेक्षा कमी मित्रांनो
जर हिरा असेल मुलगा
तर मोती आहे मुलगी
विधीचे विधान आहे, का समाजाची रीत
का कोणाला भार असतात मुली
धिक्कार आहे त्या लोकांचा,
ज्यांना आवडत नाही मुली
सर्वांसाठी प्रेम साठवित असतात मुली
दररोज काट्याच्या रस्त्यावरुन चालतात मुली
कारण दुसऱ्यासाठी फुले वेचित असतात मुली
मुलींचे जीवन वाचवा.

– खैरनार प्रियंका सुरेश, प्रथम वर्ष (बी.ए.)



# दु:ख

दु:ख तर प्रत्येकाच्याच नशिबात लिहलेले असते
पण प्रत्येकाची त्या दु:खाला सामोरे जाण्याची
ते दु:ख पचवून घेण्याची पध्दत वेगवेगळी असते.
जो व्यक्ती त्याच्या दु:खाचा जास्त विचार करतो.
अन् सतत त्या दु:खाला बिलगून राहतो त्याला
त्या दु:खाचा खूप त्रास होतो.
म्हणून दु:ख किती मोठे आहे आणि त्याची
मर्यादा ठरवणे हे ही आपल्याच हातात असते
म्हणून सर्व दु:ख विसरुन हे आयुष्य
आपल्याला एकदाच मिळते...
आयुष्य खुप सुंदर आहे
फक्त तुम्ही ते जगायला शिका...

– जाधव जना संतोष

# जीवन

चालणारे दोन पाय किती विसंगत
एक मागे असतो एक पुढे असतो
पुढच्याला अभिमान नसतो
मागच्याला अपमान नसतो
कारण त्यांना माहीत असते
क्षणात हे सारं बदलणार असते
याचचं नाव जीवन असते
याचचं नाव जीवन असते.

– जाधव जना संतोष



Scanned with CamScanner

## बाप.....

आईचं गुणगान खूप झाले,
पण बिचाऱ्या बापाने काय केले,
बिकट प्रसंग बापच सदा सोडवी.
आपण कायम गातो आईचीच गोडवी
आईकडे असतील अश्रूंचे पाट तर,
बाप म्हणजे स्वप्नांचा घाट..
आठवते जेवण करणारी प्रेमळ आई
त्या शिदोरीची सोय ही बापच नाही.'
देवकी, यशोदेचे प्रेम मनात साठवा,
टोपलीतून बाळास नेणारा वासुदेवही आठवा
रामासाठी कौशल्येची झाली असेल कसरत
पुत्र वियोगाने मरण पावला बाप दशरथ
काटकसर करुन देतो मुलास पॉकेटमनी
स्वतः वापरी मात्र शर्ट-पॅन्ट जुनी
मुलीला हवे ब्युटीपार्लर, नवी साडी
तरी बाप आटपतो बीन साबणाची दाढी
वयात आल्यावर मुले असतात आपल्या विश्वात मग्न
बापाला दिसे मुलाचे शिक्षण, पोरीचे लग्न
मुलाच्या नोकरीसाठी जिना चढू शकतो,
बाप जीवनभर मुलांच्या पाठी बापाच्या सदिच्छा
त्यांनी समजून घ्याव्यात हीच माफक इच्छा.

– पवार दिपाली नामदेव,
प्रथम वर्ष (बी.ए.)

## जीवन एक संघर्ष...

मला सांगावेसे वाटले की,
'नशिबाने साथ सोडली म्हणून मरायचे नसते
स्वत:च्या हिमतीने जगायचे असते
मागील आठवणीने रडायचे नसते
भविष्याचा विचार करुन जगायचे असते
क्षुल्लक संकटांना घाबरायचे नसते
धैर्याने त्याच मार्गावर पुढे चालायचे असते
असे हे जीवन नकोसे वाटते,
पण ते जगावेच लागणार आहे.
हेच जीवनाचे अनमोल सत्य आहे.
'जीवन संपविण्यासी पुरते फक्त एक उडी
जीवन जगण्यासाठी मात्र ती धडाडी
जीवनामध्ये सुख हे नद्याएवढे,
पण दुखः मात्र पर्वताएवढे असते.
'या जिवनालाच मी म्हणते की ?'
जिवन ही एक आगगाडी आहे
'आशेच्या रुळांवर चालते निराशेचा धूर फेकते,
शेवटी मृत्यूच्या स्टेशनावर जाऊन थांबते.'
असे हे जीवन
फुलपाखरासारखे किती दिवस जगावे...

– पुरकर पूजा शिवाजी,
प्रथम वर्ष (बी.ए.)



Scanned with CamScanner

## नवीन वर्ष...

बघता-बघता वर्ष संपून गेले
जाताना अनुभवाचे दान देऊन गेले
कधी आनंदाने हसवले, तर कधी रागाने रडवले...
कधी अभिमानाने मान उंचावली
तर कधी शरमेने शिर झुकवले....
सगळी दु:ख, चिंता, वाईट आठवणी,
सरत्या वर्षाला देऊन,
सौख्य आणि समाधान सोबत घेऊन
नवीन वर्षाचे स्वागत करु या....
गेले वर्षामागून वर्ष
झाला नुतनास स्पर्श
वेदनांचा वेध सोडून द्या,
मनास हर्ष गाठू या शिखर यशाचे
हीच मनी ठेवा इच्छा
नवीन वर्षाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा...!

– पगार पूजा परशराम,
द्वितीय वर्ष (बी.कॉम.)

## आपल्या मैत्रीचा वृक्ष ...

वाटले नव्हते मला असे काही घडेल ।
आपल्या मैत्रीचा वृक्ष, असा कोलमडून पडेल ॥
याच मैत्रीला कधी काळी मधाचा गोडवा होता ।
त्या दिवसात रोजच दिवाळी पाडवा होता ॥
जेव्हा रडत होतो, तेव्हा मैत्रीने हसवले ।
नुकताच हसायला शिकलो, आणि पुन्हा मैत्रीनेच रडवले
चूक तुझी ही नसावी, किंवा माझी ही नसावी ।
काय सांगावे आपल्या दैवातच खोट असावी ॥
कारणा शिवाय दूरावलो, याचचं वाईट वाटते ।
रडून रडून शेवटी, डोळ्यात पाणी आटले ॥
विसरुन सारे दु:ख, मी मनाला हवे आवरायला ।
तू परतनार असशील तर, मी तयार आहे सावरायला
तू परते पर्यंत मी, तुझीच वाट पाहीन ।
आत्माच काय ? अजन्म तुझाच सखा राहील ॥
जपून पाऊले टाकत जा, चुकूनही घसरु नक्रोस ।
आठवण नाही काढलीस, तरी मला विसरु नकोस॥
वाटले नव्हते खरंच, कधी असे घडेल ।
आपल्या मैत्रीचा वृक्ष, असा कोलमडून पडेल ॥

– आहेर अनुराधा रमाकांत,
प्रथम वर्ष (बी.ए.)



Scanned with CamScanner

## काळीज...

तळहाताच्या फोडासारखे बापाने जपले
त्याचवेळी आईने शिव्या घालून स्वयंपाक घरात घातले
तुझं फक्त शिक्षण कोणत्याचं नाही कामाचे
बाईच आयुष्य फुकट किंवा
विकत त्या चुलीपर्यंत जाण्याचे
बापाच्या नावाने मोठा टाहो फोडायचा
आई ओरडली म्हणून सरळ गोंधळ घालायचा
अचानक या सुखाला कोणाची नजर लागली
मुलगी मोठी झाली अशी हुरहूर मनाला लागली
लागलेल्या हुरहुरीत दोघांची झोप कोण जाणे कोठे
लोप पावली.
जगा खातर का होईना बापानं पाउले
उचलून लेकीला मांडवाखाली आणली.
जगरहाटीच्या मैफलित धुमधडाक्या
सासर घरी पाठवली.
नव्याचे नऊ दिवस लवकरच संपले
आईच्या शिकवणीने त्यावरसुध्दा नाही रुसले
लेकीला काहीतरी भास होतो
हे आई आधी बापाला कळलं
का म्हणून बाप अन् लेकीचे असे नाते दैवाने विनलं
आईसारखं काळीज कठोर बापाचं का नाही विनलं

– आशा जाधव,
प्रथम वर्ष (बी.ए.)

## स्वप्न....

माणसांची स्वप्ने उडणाऱ्या
पाचोळ्याप्रमाणे असतात
सावकाश पळताना
हातातून निसटतात ॥१॥
जोरात पकडताना मात्र
कायमचीच तुटतात
एवढ्याशा या आयुष्यात
फार काही हवे असते
पाहिजे ते मिळत नसते
पाहिजे ते मिळूनही
आपलं चांदण्यांनी भरलेलं
आकाश रिकामच असतं
खूप येते आठवण पण,
मी तुला भेटू शकत नाही
अश्रू येतात नयनी पण,
मी ते टिपू शकत नाही.
मी समजावे मनाला पण,
ते समजूनच घेत नाही
तुझ्याशिवाय जगण्याचा आता
अर्थच कळत नाही....

– कुंभार्डे गितांजली संजय,
प्रथम वर्ष (बी.ए.)



Scanned with CamScanner

## वेळ...

कामासाठी वेळ द्या, कारण ती यशाची किंमत आहे....
विचार करण्यासाठी वेळ द्या,
कारण ते शक्तीचे उगमस्थान आहे....
खेळण्यासाठी वेळ द्या,
कारण ते तारुण्याचे गुपित आहे....
वाचनासाठी वेळ द्या,
कारण तो ज्ञानाचा पाया आहे....
स्वप्नांसाठी वेळ द्या,
कारण ती ध्येयाकडे जाण्यास सोबत आहे
स्नेहासाठी वेळ द्या
कारण तो ध्येयाकडे जाणारा सोबती आहे.
हास्यविनोदासाठी वेळ द्या
कारण ते तर खरे जीवनसंगीत आहे....

– पगार पूजा परशराम,
द्वितीय वर्ष (बी.कॉम)

## आयुष्य...

जिवनात प्रत्येकजण आयुष्य जगत असतो,
जगता जगता अनेक अनुभव अनुभवत असतो,
का कुणास ठाऊक नकळतपणे
प्रत्येकाला स्वप्न पडते
आणि त्यातचं आयुष्याचे गणित दडते,
पण, मला असे मनापासून वाटते,
जे स्वप्न आपल्याला झोपू देत नाही,
तेच खरं स्वप्न असते.
आयुष्य तर प्रत्येकजण जगत असतो...
मात्र गणित अपूर्णच ठेवत असतो.
अधुरे गणित सुटत नाही,
जगण्याचे मात्र भान रहात नाही....
तेव्हाच मनं विचार करु लागते
आणि मनाशी निर्धार करते
या जगात कुणीच कुणाच नसतं.
त्यासाठीच देवानं आपल्याला पाठवलेलं असतं
आणि, नळकतपणे आनंदाचा वर्षाव होतो,
आपण सर्वांचा मान राखतो,
तेव्हा आपण जीवनाला सॅल्युट करतो,
तेव्हा जीवन ही आपल्याला सॅल्युट करत असते.

– आवारे वैष्णवी बाळासाहेब,
द्वितीय वर्ष (बी.कॉम.)



Scanned with CamScanner

# .... म्हणूनच देश चालतोय

भारताची लोकसंख्या १२५ कोटी आहे

त्यातले २४ कोटी रिटायर झाले आहे

उरले १०१ कोटी जे काम करतात

त्यापैकी ३५ कोटी तर शाळेत जातात

उरले ६६ कोटी, जे काम करतात

त्यापैकी ३२ कोटी केंद्र सरकार कर्मचारी आहेत

उरले ३४ कोटी, जे काम करतात

त्यापैकी ४ कोटी सैन्यात आहेत.

उरले ३० कोटी, जे काम करतात

त्यापैकी २० कोटी राज्य सरकारी कर्मचारी आहेत

उरले १० कोटी, जे काम करतात

देशात ८ कोटी बेरोजगार आहेत

पण १ कोटी २० लाख तर नहमी

हॉस्पिटलमध्ये असतात.

उरले ८० लाख, जे काम करतात

त्यापैकी ७९,९९,९९८ लोक जेलमध्ये आहेत

उरले फक्त २ लोक, जे काम करतात

ते दोघेही आहेत, तुम्ही आणि मी !

पण तुम्ही तर आता, हा मजकूर वाचताय,

म्हणजे याक्षणी संपूर्ण देशात मी एकच

व्यक्ती अशी आहे, जी काम करतेय

आणि म्हणूनच देश चालतोय ... !

– वाढवणे दिपाली सुरेश,
प्रथम वर्ष (बी.कॉम)



Scanned with CamScanner

# * मराठी विभाग *

**प्रा. सोमनाथ दत्तात्रेय फुगट**

(एम.ए.बी.एड.सेट)

मराठी विभाग प्रमुख – अध्यापन अनुभव – ६ वर्षे

– चर्चासत्र सहभाग – राष्ट्रीय – ५,

राज्यस्तरी – ७

– सांस्कृतिक कला मंडळ प्रमुख

– बहि:शाल शिक्षण मंडळ प्रमुख

सा. फुले पुणे विद्यापीठ व बहि:शाल शिक्षण मंडळ या उपक्रमांतर्गत डॉ बाबासाहेब जयकर व्याख्यानमाला व यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला याद्वारा विद्यापीठाने नियुक्त केलेल्या तज्ञ व्यक्ती विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात.

**प्रा. रामेश्वर भिकाजी उगले**

(एम.ए.सेट., एम.एड.)

– अध्यापन अनुभव – ४ वर्षे

– चर्चासत्र सहभाग – राष्ट्रीय – २,

राज्यस्तरीय – २

राष्ट्रीय व राज्यस्तरीय चर्चासत्रांमध्ये शोधनिबंधाचे वाचन

' मराठी' हा विषय महाविद्यालयाच्या स्थापनेपासून विशेषस्तरावरती शिकविला जातो. कला शाखेतील ३० विद्यार्थी मराठी हा विषय विशेषस्तरावर घेवून पदवीचे शिक्षण घेत आहेत.

वाणिज्य शाखेत 'प्रथम वर्ष वाणिज्य' या वर्गासाठी 'व्यवहारिक व आयोजित मराठी' या अनिवार्य विषयाद्वारे विद्यार्थी मराठी भाषेचे अध्ययन करत आहेत.

मराठी विभागातंर्गत 'मराठी वाङ्:मय मंडळाचे उद्‌घाटन प्रख्यात साहित्यिकाच्या हस्ते करुन वर्षभर विद्यार्थ्यांच्या साहित्य गुणांची जोपासना करण्यासाठी भित्तीपत्रके, निबंध, वक्तृत्व स्पर्धा, काव्य वाचन स्पर्धा यांचे आयोजन केले जाते.

कविवर्य कुसूमाग्रज यांचा जन्मदिन दि. २७ फेब्रुवारी 'मराठी दिन' म्हणून मराठी विभागाच्या वतीने उत्साहात साजरा केला जातो.

विविध महाविद्यालय, जिल्हा, राज्य स्तरांवरील निबंध व वक्तृत्व स्पर्धांत मराठी विभागातील विद्यार्थी सक्रिय सहभाग नोंदवतात.

----***----



Scanned with CamScanner

# The Department of English

Prof. K. L. Shinde
M.A.B.Ed., Set

Research - 12 research papers are published.

2 Research papers published in International Journals. Participated and presented papers in 10 seminars.

1) Our department organised The Soft Skill Development programme. Some lectures have been organising for effective communication skill.

2) Remedial course have been organising for slow learners or poor students in English.

3) In specail guidance lecture scheme some lectures were arranged on The Personality Development and Interview skills.

4) Optional English subject has been starting for F.Y.B.A. This subject has started for the purpose to develope English Competence among rural students. The knowledge of English language and communication skill is the need of present hour.

----***----



Scanned with CamScanner

# * अर्थशास्त्र विभाग *

**प्रा. डी. डी. गव्हाणे**
(विभागप्रमुख व सहा. प्राध्यापक)
M.A., Net, Ph.D (ongoing)
राष्ट्रीय व राज्यस्तरीय चर्चासत्रात शोधनिबंधाचे वाचन, १३ शोधनिबंध, विविध नियतकालिकांत प्रकाशित 'महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या आर्थिक व सामाजिक परिणामांचा अभ्यास' (नाशिक जिल्ह्याचा विशेष अभ्यास) या विषयावर पुणे विद्यापीठात पी.एचडी. चे कार्य चालू आहे.

**प्रा. एम. एम. भोसले**
(सहा. प्राध्यापक)
M.A., B.Ed.
राज्यस्तरीय चर्चासत्रात शोधनिबंधाचे वाचन

महाविद्यालयाच्या स्थापनेपासून अर्थशासत्र हा विषय विशेषस्रावर शिकविला जातो. कला शाखेतील २८ विद्यार्थी अर्थशास्त्राचा विशेषस्तरावर अभ्यास करीत आहे. वाणिज्य विभागासाठी अर्थशास्त्र हा अनिवार्य असल्याने सर्वच विद्यार्थी अर्थशास्त्राचे अध्ययन करतात.

महाविद्यालयाच्या स्थापनेपासून प्रथमच अर्थशास्त्र विभागाच्या वतीने राज्यस्तरीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आलेले होते. 'ब्रेक्झीटचे भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम' या विषयावरील चर्चासत्र ३ डिसेंबर २०१६ रोजी झाले. यात संशोधकांनी आपल्या शोधनिबंधाचे वाचन केले, तर ९० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. शोधनिबंधाचे संकलन करुन एक पुस्तक प्रकाशित करण्यात आले.

अर्थशास्त्र विभागाच्या वतीने 'इंटरनेट बँकिंग व कॅशलेश व्यवहार' या विषयावर ९ डिसेंबर २०१६ रोजी कार्यशाळेचे आयोजन.

----***----



Scanned with CamScanner

# * भूगोल विभाग *

**प्रा. ए. एल. भगत**
एम.ए./एम.एस्सी, नेट, पी.एचडी.

- सेवेचा अनुभव २.९ वर्षे, सहा. प्राध्यापक एम.व्ही.पी. समाज नाशिक.

- २.३ वर्षे प्रभारी प्राचार्य, वडनेर भैरव महाविद्यालय.

- विविध राज्यस्तरीय, राष्ट्रीय चर्चासत्रात सहभाग. एक राज्यस्तरीय रिसर्च पेपर प्रकाशित.

- जी. आय. एस. व आर. एस. मध्ये २१ दिवसाचा कोर्स वर्क व ८ दिवसाचा ॲडव्हान्स सर्व्हिंग कोर्स वर्क पूर्ण.

- "Climatic variabitity and It's impact in Agriculture in Nasik and Jalgaon District of Maharashtra" या विषयावर पी.एचडी. सुरु आहे.

महाविद्यालयात भूगोल हा विषय एफ. वाय./एस.वाय/टी.वाय बी.ए. या वर्गाना सामान्य स्तरावर शिकविला जातो. एफ.वाय. बी.ए.साठी भुरुपशास्त्राची मुलत्त्वे, एस.वाय.बी.ए. साठी. 'वातावरण व सायगशास्त्र, तर टी.वाय.बी.ए.साठी 'भारताचा प्रादेशिक भूगोल' हे विषय शिकवले जातात. शिकवितांना पॉवर पॉईट प्रेझेंटेशन, भूगोल विभागाअंतर्गत 'भूगोल दिन, पर्यावरण दिन, ओझोन दिन' जागतिक लोकसंख्या दिन या सारखे कार्यक्रम घेतले जातात. भूगोल विषयामध्ये विद्यार्थ्यांची मार्क परंपरा देखील चांगली आहे. भविष्यात हा विषय स्पेशल स्तरावर शिकवण्यासाठी महाविद्यालय प्रयत्नशील असते व विद्यार्थ्यांना सर्वांगिण विकासासाठी नेहमी प्रयत्नशील असते.

----***----



Scanned with CamScanner

# * राज्यशास्त्र विभाग *

**प्रा. एस. एस. कावळे**

सहा. प्राध्यापक

एम.ए., बी.एड सेट.

- राज्यस्तरीय चर्चासत्रात सहभाग.
- अभ्यासक्रम बदलासंदर्भातील कार्यशाळेतील सहभाग.
- जिल्हास्तरीय चर्चासत्राचे आयोजन.
- महाविद्यालयीन स्तरावर 'मतदार दिन, संविधान दिन, मानवी हक्क दिन' या कार्यक्रमाचे आयोजन.
- दिंडोरी महाविद्यालयात बँक संदर्भातील 'आयक्यूसी' कमिटीत सदस्य म्हणून सहभाग.

**प्रा. एस. व्ही. कोल्हे**

सहा. प्राध्यापक

एम.ए., बी.एड.

- राज्यस्तरीय चर्चासत्रात सहभाग.
- महाविद्यालयीन अनेक उपक्रमांमध्ये सहभाग.

वडनेर भैरव महाविद्यालयात राज्यशास्त्र विभाग प्रमुख म्हणून कार्यरत. शैक्षणिक वर्ष २०१६-१७ अंतर्गत महाविद्यालयात राज्यशास्त्रांतर्गत अनेक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यात मतदार दिन, संविधान दिन, मानवी हक्क दिन साजरा केला. मानवी हक्क दिनानिमित्त वडनेर पोलीस स्टेशनमध्ये ए.पी.आय.मा. श्री. नितीन पाटील यांनी मानवी हक्क दिनानिमित्त विद्यार्थ्यांना उद्बोधन केले. तर संविधान दिनानिमित्त महाविद्यालयास अॅड. श्री. पोपटराव पवार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. दि. २८ सप्टेंबर २०१६ रोजी महाविद्यालयाने राज्यशास्त्र विभाग व राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत 'मतदार जागृती अभियान' राबविण्यात आले. त्यानिमित्त वडनेरभैरव गावामध्ये विद्यार्थ्यांची रॅली काढून मतदारांमध्ये जनजागृती घडविण्याचे काम करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. ए. एल. भगत यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यशास्त्र विभागाने या सर्व कार्यक्रमाचे आयोजन केले.

----***----



Scanned with CamScanner

# * वाणिज्य विभाग *

**प्रा. एन. डी. वडघुले**

एम. कॉम, नेट, सेट

सहाय्यक प्राध्यापक, वाणिज्य विभाग प्रमुख

महाविद्यालय परिक्षा नियंत्रक (सीईओ)

– राष्ट्रीय तसेच राज्यस्तरीय चर्चासत्रात सहभाग व शोधनिबंध सादर.

सहभाग – २ राष्ट्रीय, शोधनिंबध सादर – ३ राज्यस्तरीय

**प्रा. एम. आर. धेबडे**

एम.कॉम., बी.एड.

सहाय्यक प्राध्यापक

– राष्ट्रीय तसेच राज्यस्तरीय चर्चासत्रात सहभाग

सहभाग – ४ राज्यस्तरीय, २ राष्ट्रीय,

शोधनिबंध –१ राज्यस्तरीय

– महाविद्यालयात 'राष्ट्रीय सेवा योजना' अंतर्गत कार्यक्रम अधिकारी म्हणून कामकाज.

**प्रा. डी. एच. भगुरे**

एम.कॉम, नेट, सेट, जी.डी.सी.ॲण्ड ए.

सहाय्यक प्राध्यापक

– राष्ट्रीय तसेच राज्यस्तरीय चर्धासत्रात सहभाग
  शोधनिबंध वाचन (सहभाग – १०, राज्यस्तरीय, ६ राष्ट्रीय, शोधनिबंध – ९, राज्यस्तरीय, ६ राष्ट्रीय)
– शिवजयंती तसेच विविध उत्सवप्रसंगी विविध गावात सामाजिक विषयांवर व्याख्याने.
– महाविद्यालयात 'वाणिज्य मंडळ' अंतर्गत विविध व्याख्यानांचे आयोजन.
– औद्योगिक सहलींचे आयोजन.

- Departmet of Commerce -

We offerce quality education in commerce from the opening of college (200g). Now in 2016. 10g. students are geting education in B.Com course. We have mainfained the departmental result from last 7 years.

First Three Students

**F. Y. B.Com.**

| No. | Name of Student | % (persentage) |
|---|---|---|
| 01. | Aher Priyanka Arunra | 76% |
| 02. | Salade Varsha Subhash | 73.43% |
| 03. | Chaudhari Priyanka Sharad | 68.86% |



Scanned with CamScanner

**S.Y.B.Com**

| | | |
|---|---|---|
| 01. | Nikam Neelam Subhash | 66.50% |
| 02. | Shirsat Gulab Vishwanath | 65.33% |
| 03. | Aher Madhuri Prakash | 63.05% |

**T.Y. B.Com**

| | | |
|---|---|---|
| 01. | Pachorkar Gayatri Balasaheb | 78.25% |
| 02. | Chaudhari Jayashri Dattatray | 74.41% |
| 03. | Watpade Survaṇa Rangnath | 71.58% |

**OTHER**

**Industrial Visit :-**

1) We were organized a study tour of S.Y.B.Com & T.Y. B.Com students was taken of Malegaon M.I.D.C., Sinnar at Jindal Comp. Pvt. Ltd. on ..............

2) Commerce Association
We have an active sell named as commerce association which organizes various usefull programs relating to commercial education. Marketing research & economical development of society.

----***----

# * जिमखाना विभाग *

**प्रा. सारिका जगताप**
शारीरिक शिक्षण संचालक
बी.कॉम., बी.पी.एड., एम.पी.इडी, सेट

– चर्चासत्र –

राष्ट्रीय व राज्यस्तरीय चर्चासत्रात सहभाग.

शोधनिबंधाचे वाचन – ५ शोधनिबंधक प्रकाशित.

मविप्र मॅरेथॉन स्पर्धेत विद्यार्थ्यांचा सहभाग (मुले/मुली) आंतरवर्गीय क्रिकेट व मैदानी स्पर्धेचे आयोजन.

विविध आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत विद्यार्थ्यांचा सहभाग. योगा, मैदानी स्पर्धा, क्रिकेट.

----***----



Scanned with CamScanner

# * ग्रंथालय विभाग *

**प्रा. संदीप लोखंडे**

ग्रंथपाल

एम.कॉम, एमलीप, इन्फरमेशन ॲण्ड सायन्स, नेट ॲण्ड सेट, पीजीडी लॅन.

**श्री. गंगाधर रमेश आहेर**

ग्रंथालय सहाय्यक

मराठा विद्या प्रसारक समाजाच्या बहुजन हिताय बहुजन सुखाय या ब्रीद वाक्याप्रमाणे ग्रामीण भागात शिक्षणाचे पवित्र कार्य करतांना म.वि.प्र. समाजाचे कला व वाणिज्य महाविद्यालय, वडनेर भैरव स्थापना २००९ साली झाली. महाविद्यालयाच्या स्थापनेपासून महाविद्यालयात ग्रंथालय, महाविद्यालयीन विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांना विविध पुस्तकांद्वारे माहिती व सेवा पुरविण्याचे कार्य करत आहे.

**ग्रंथालय संग्रह :-**

महाविद्यालयीन ग्रंथ संग्रहालयाचा ग्रंथ संग्रह हा उत्तमरित्या विविध ज्ञानशाखांनी विकसित केलेला आहे. ग्रंथालयात मोठ्या प्रमाणावर विद्यापीठांच्या अभ्यासक्रमावर आधारित ग्रंथांबरोबरच स्पर्धा परीक्षांसाठी आवश्यक असणारे संर्दभ ग्रंथ तसेच जीवन विषयक विविध शास्त्रीय ग्रंथांचा सहभाग आहे.

**संदर्भ ग्रंथ :-**

१,५०,०००, क्रमीक ग्रंथ - २५००, नियतकालिके - १०, सीडी व डिव्हीडी - १०५,
नकाशे - १०, वर्तमान पत्रे - ७.

**ग्रंथालय सभासद :-**

महाविद्यालयातील ग्रंथालयामध्ये विद्यार्थी वर्ग, सभासद संख्या ३५० तसेच महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि स्थानिक व्यवस्थापन समिती. त्याचबरोबर संस्थेचे पदाधिकारी हे ग्रंथालयाचे सभासद आहेत.

**ग्रंथालय सेवा :-**

१) ग्रंथालयातून ग्रंथ देवघेव सेवा, २) संदर्भ सेवा
३) निवडक माहिती प्रसारण सेवा, ४) झेरॉक्स सेवा
५) इंटरनेट सेवा, ६) वर्तमानपत्र कात्रण सेवा इ. सेवा पुरविल्या जातात.

----***----



Scanned with CamScanner

# * महाविद्यालयीन कर्मचारी *

| कर्मचाऱ्याचे नाव | पद |
|---|---|
| श्री. राजेंद्र प्रभाकर कुशारे | ज्यु. क्लार्क |
| श्री. संदीप भास्कर शिंदे | ज्यु. क्लार्क |
| श्री. शरद कारभारी शिंदे | ज्यु. क्लार्क |
| श्री. बाला दादा गांगुर्डे | शिपाई |
| श्री. संदीप अशोक बच्छाव | शिपाई |
| श्री. गंगाधर रमेश आहेर | शिपाई |
| श्री. शशिकांत शंकर वाटपाडे | शिपाई |
| श्री. मनोज केदू चौधरी | बस चालक |



Scanned with CamScanner

# मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक

शिवाजीनगर, गंगापूर रोड, नाशिक - ४२२ ००२.

## * संस्था दृष्टिक्षेपात *

| | |
|---|---|
| स्थापना | सन १९१४ |
| सार्वजनिक ट्रस्ट | रजि. नं. ए- ४३६/१९५४ |
| आजीव सभासद संख्या (जनरल) | ९८७६ |
| आजीव सभासद संख्या (सेवक) | ४०१ |
| शाखांची संख्या | ४५१ |
| विद्यार्थ्यांची संख्या | २०६५५३ |
| सेवक संख्या | ८६४७ |
| अंदाजपत्रक | सुमारे रु. ५८६ कोटी ९२ लाख (२०१६-१७) |

## * शाखा विस्तार *

| | |
|---|---|
| पूर्व प्राथमिक शाळा (मराठी माध्यम) | ६२ |
| पूर्व प्राथमिक शाळा (इंग्रजी माध्यम) | १५ |
| प्राथमिक शाळा (मराठी माध्यम) | ५५ |
| प्राथमिक शाळा (इंग्रजी माध्यम) | १६ |
| आश्रमशाळा (प्राथमिक) | ०३ |
| आश्रमशाळा (माध्यमिक) | ०२ |
| माध्यमिक शाळा (मराठी माध्यम) | १५८ |
| माध्यमिक शाळा (इंग्रजी माध्यम) | ०३ |
| उच्च माध्यमिक विद्यालये | ५४ |
| अध्यापक विद्यालये | ०५ |
| शिक्षणशास्त्र महाविद्यालये | ०२ |
| कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये | २२ |
| फार्मसी कॉलेज | ०१ |
| आर्किटेक्चर कॉलेज | ०१ |
| बॅचलर ऑफ डिझाईन | ०१ |
| नर्सिंग कॉलेज | ०१ |
| व्यवस्थापन संस्था (आय.एम.आर.टी.) | ०१ |
| मविप्रचे प्रशिक्षण व विकास केंद्र | ०१ |
| प्रिंटींग प्रेस | ०१ |
| आय.टी.आय. | ०८ |
| मेडिकल कॉलेज | ०१ |
| मेडिकल कॉलेज हॉस्पिटल अॅण्ड रिसर्च सेंटर | ०१ |
| विद्यार्थी वसतिगृहे | २४ |
| शेतकी शाळा | ०१ |
| ललितकला महाविद्यालय | ०१ |
| जनशिक्षण संस्थान | ०१ |
| पदविका फार्मसी महाविद्यालय (डी फार्म) | ०१ |
| पारिचारिका प्रशिक्षण महाविद्यालय | ०१ |
| अभियांत्रिकी महाविद्यालय | ०१ |
| कृषी महाविद्यालय | ०१ |
| भौतिकोपचार महाविद्यालय | ०१ |
| विधी महाविद्यालय | ०१ |
| कॉलेज ऑफ सोशल वर्क | ०१ |
| पॉलिटेक्निक कॉलेज | ०१ |
| नागरी आरोग्य केंद्र | ०१ |
| ग्रामिण आरोग्य केंद्र | ०१ |
| एकूण | ४५१ |

Scanned with CamScanner



Scanned with CamScanner